**THE BOOK WAS DRENCHED**

**TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY**

UNIVERSAL LIBRARY
OU_192741
UNIVERSAL LIBRARY

विचारप्रवर्तक सामाजिक कादंबरी

# कल्पना

लेखिका :

कुमुदिनी शंकर प्रभावळकर (बी. ए.)

किंमत १॥ रु. ] [ १९३८

प्रकाशक—

वि. ग. ताम्हणकर,

आधुनिक कादंबरी मंडळ—१२ बुधवार—पुणें

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रकः—

ग. गो. दिवाकर.

'इंदिरा' प्रेस. सदाशीव, पुणें २.

क

ल्प

ना

# अनुक्रमणिका.


| | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रकरण १ लें | पहिला पगार | १ |
| प्रकरण २ रें | कल्पनेचीं तत्त्वें | ९ |
| प्रकरण ३ रें | प्रिय मैत्रिणहि दुरावली ! | २० |
| प्रकरण ४ थें | दादा—वहिनी. | २७ |
| प्रकरण ५ वें | मिलिंदकुमार ! | ३४ |
| प्रकरण ६ वें | निर्हेतुक मैत्री ? | ४२ |
| प्रकरण ७ वें | अपेक्षा ढांसळली ! | ५२ |
| प्रकरण ८ वें | दुःख सहजीं गिळत नसतं. | ६१ |
| प्रकरण ९ वें | अपूर्णतेची हुरहूर ! | ६९ |
| प्रकरण १० वें | विद्यार्थिदशेचा काळ सुखाचा ! | ७६ |
| प्रकरण ११ वें | मैत्रिणींचा पाठलाग. | ८२ |
| प्रकरण १२ वें | 'बालक व्हावें, मौजेंत पुन्हां खेळावें' | ९१ |
| प्रकरण १३ वें | मोहिनीनें केलेला मैत्रीचा प्रयोग. | ९९ |
| प्रकरण १४ वें | शिळ्या कढीला ऊत. | १०५ |
| प्रकरण १५ वें | स्वतंत्र रहाणी ! | ११४ |
| प्रकरण १६ वें | एका हृदयाची तळमळ ! | ११९ |
| प्रकरण १७ वें | तळमळणारें दुसरें हृदय. | १२५ |
| प्रकरण १८ वें | एकाचा खुंभ जळला ! | १३३ |
| प्रकरण १९ वें | मकरंदाचें मानस शास्त्रावरील लेक्चर ! | १३९ |
| प्रकरण २० वें | पण दुसऱ्याचा पीळ कायम ? | १४७ |
| प्रकरण २१ वें | कल्पनेची भरारी ! | १५३ |

कु. कुमुदिनी प्रभावळकर

## ह्यांचें आजपर्यंतचें प्रकाशन.

१ शकुनी मोहोर ( विजय साहित्य संस्था )
२ कर्तव्याची जाणीव ( भारत गौरव ग्रंथमाला )
३ निसर्गाचा नियम ( मनोरंजनांतून क्रमशः प्रसिद्ध )
४ निर्माल्यांतील कळी (समाज सुधारकांतून क्रमशः प्र.)
५ अनियमित जग
६ एकेरी गांठ ( भारत गौरव ग्रंथमाला )
७ कुस्करलेलें हृदय ( महाराष्ट्र कुटुंबमाला )

" कल्पनासृष्टींतील ही

" कल्पना "

जिच्यावरून मीं रंगविली

त्या माझ्या प्रियमैत्रिणीस—

सत्यसृष्टींतील ' कल्पने ' स

प्रेमपूर्वक

# अर्पण

—कुमुदिनी

# कल्पना

## प्रकरण १ लें .... .... .... .... पहिला पगार

" हें काय ? साडेसहा वाजायला आले. अद्यापि कल्पना कशी बरं घरीं आली नाहीं ?" चिंताव्यंजक स्वरांत उमाबाई पतिराजांना म्हणाल्या.

हातांतील 'इव्हिनिंग न्यूज' वरील दृष्टि दूर न करतां अण्णासाहेबांनी हंसून उत्तर केलें, " मला तुझी मोठी गंमत वाटते. अग, आपली कल्पना आतां लहान कां आहे ? ती शाळेंत जाणारी परकरी पोर होती तेव्हां तिला घरीं यावयाला पांचाचे साडेपांच झाले कीं तुझे पंचप्राण व्याकूळ होत आणि तें योग्यच होतें. पण आतां कल्पना २०।२१ वर्षांची तरुणी आहे. बी. ए. होऊन आतां महिनाभर ती त्या ×× मिशन स्कूलमध्यें शिक्षकिणीचा स्वतंत्र उद्योग करीत आहे, ती आतां मिळवती आहे. आणि तरीही तूं तिच्याबद्दल, काळजी करतेस ?"

" पण कल्पना कितीहि मोठी झाली तरी मला ती लहानच वाटते ना ?"

" अग, पण, तूं जशी तिची आई आहेस तसा मी नाहीं कां तिचा बाप ? पण आपण नाहीं बुवा अशी उठल्या सुटल्या काळजी वहात—"

अण्णासाहेबांच्या ह्या चेष्टेवर उमाबाई कांहीं बोलणार इतक्यांत जिन्यावर पावलें वाजल्याचा आवाज त्यांच्या कानीं पडला व निश्चित स्वरांत त्या म्हणाल्या, " चला, आली एकदांची पोर—"

" आली ? कुठें आहे बुवा ?"

" अशी काय ती सारा वेळ चेष्टाच करावयाची ? आतां वर येईल अशा अर्थानें मी आली म्हटलं हो. खालच्या जिन्यावरचा तिचा पायरव ऐकला मी."

" अरे बापरे ! लेकीच्या पाऊलांचा आवाज ओळखतेस तूं ?"

" मग आईचं हृदय आहे माझं —"

" अस्सं अस्सं ! हा आम्हांला टोमणा वाटतं ! ठीक— काय, कल्पनाताई, आलीस ? ये, ये, लौकर. ही तुझी आई—"

पण अण्णासाहेबांना पुरतें बोलावयाला सांपडलेंच नाहीं.

कारण कागदांत बांधलेलीं कांहीं पुडकीं सोडीतच कल्पना आंत आली होती. व एक सुंदरसे पार्करचें फाउटंन पेन अण्णासाहेबांच्या पुढें करून ती म्हणाली, "हं, अण्णा, ही घ्या तुम्हाला माझ्या पहिल्या पगाराची आठवण."

# प हि ला प गा र

" वाः वा, पोरी, थँक यू, थँक यू " अण्णासाहेबांनीं इंग्रजी-मध्यें आभार प्रदर्शन केलें.

नंतर सोनेरी नक्षीचा एक चांदीचा डबा उमाबाईच्या हातीं देत कल्पना म्हणाली, " आणि आई, ही तुला आठवण हं. तुझी मसाल्याची सुपारी ह्यांत ठेवायची."

" हं." एवढाच एकाक्षरी उद्‌गार उमाबाईनीं ह्यावर काढला.

" आणि अण्णा," कल्पना पुढें म्हणाली, " ही बघा मी दादासाठीं आणलेली सिगारेट केस. दादा बाकी, आला नसेलच अजून क्लबांतून—आला आहे कां ग तो आई ?"

" अं हं, नाहीं आला अजून मकरद घरीं. बर, चहा घेणार ना तूं ? सांगते मी नारायणाला करायला."

" बस तूं. उगीच कां खेप घालतेस ? मी जाते आहे माझ्या खोलींत तेव्हा मीच सांगीन नारायणाला. लेकीला घरीं यावयाला उशीर झाल्यामुळे काळजी करून तूं आधींच थकली आहेस त्यांत आणखी ही उठबस कशाला ?"

" इश्श ! आई, मी काय आतां लहान आहे ग ? झाला एक दिवस मला थोडा उशीर तर त्यांत काळजी काय करीत बसतेस ? कल्पनेनें रुसक्या स्वरांत म्हटलें व तें ऐकतांच, दारापर्यंत गेलेले अण्णासाहेब मागें वळून म्हणाले, " कल्पने, तूं केवढीहि मोठी झालीस तरी आपल्या आईला लहानच वाटतेस ! पोरी, तूं स्वतः आई झाल्याशिवाय ह्यांतली मजा तुला नाहीं बरं कळणार."

अण्णासाहेबांच्या म्हणण्यानुसार ही मजा कल्पनेला सध्यां कळत नसली तरी त्यांच्या ह्या बोलण्याची मात्र तिला नेहमींच मजा वाटे.

अण्णासाहेब व उमाबाई ह्या उभयतांत कल्पनेवरून व उमाबाई तिला अद्यापि लहान समजून वागवितात ह्यावरून नेहमीं विनोद चालत असे. अण्णासाहेब ह्याबद्दल उमाबाईंना नेहमीं चिडवीत. पण आईच्या ह्या वागण्याबद्दल कल्पनेनें उमाबाईकडे अशी कुरकूर केली किंवा अण्णासाहेबांकडे तक्रार नेली तर ते लगेच उमाबाईची बाजू घेत व कल्पनेला ह्याचीच मौज वाटे.

कल्पना व तिचा दादा मकरंद हीं दोघेंही अण्णासाहेबांची फार लाडकी होती. आपल्या चेष्टेखोर, पोरकट स्वभावानुसार ते त्यांच्याशीं समवयस्कासारखा थट्टाविनोद करीत. पण मुलें व त्यांची आई ह्यांपैकीं कुणाची तरी एकाची बाजू घेण्याचा प्रसंग आला कीं, अण्णासाहेब हटकून मुलांच्या आईची बाजू घेत. व त्या त्या वेळीं कल्पनेला भारी चमत्कार वाटे.

लग्न म्हणजे स्त्रीच्या नशिबीं अपमान, कमीपणा, पारतंत्र्य असें कल्पनेचें मत होतें. आणि तिच्या ह्या मताला अशा प्रसंगीं चांगलाच धक्का बसे. पण तो तेवढ्याच पुरता. पुनः लगेच तिची अविवाहित स्त्रीस्वातंत्र्याची आवड उसळी मारी.

आतांही तसेंच झालें. वडिलांचा हा आईबद्दलचा सादर अभिमान पाहून तिला वाटलेला विस्मय क्षणभरच टिकला.

दुसऱ्याच क्षणीं तिचें अंतःकरण स्वाभिमानानें फुललें. ज्या × ×

# पहिला पगार

मिशन स्कूलमधून ती मॅट्रिक झाली होती त्याच शाळेंत आतां तिला दरमहा ८० रुपयांची नोकरी मिळाली होती.

कल्पना फार तल्लख बुद्धीची होती. बी. ए. च्या परीक्षेत तिला उच्च सेकंड क्लास मिळाला होता. पण आर्थिक स्वातंत्र्याची दांडगी हौस असल्यामुळें पुढें एम्. ए. च्या भरीला न पडतां तिनें ही नौकरी पत्करली. व आज तिला पहिला पगार मिळाला होता. व त्या जाणीवेनें तिचें सुंदर मुखमंडल आनंदित आणि गर्वभरित दिसत होतें.

सकाळीं १०॥ पासून आतां संध्याकाळीं ६॥ वाजेपर्यंत दगदग पडल्यामुळें तिचें मुख सहाजिकच कोमेजले होतें तरी तो म्लान भावहि तिला शोभून दिसत होता.

कल्पनेचा सुगौर वर्णसुद्धां ह्यावेळीं किंचित् मलीन दिसत होता. तिचे काळेभोर टपोरे नेत्र श्रमामुळें कांहींसे आकुंचित व आरक्त झाले होते. तिच्या नाजूक जिवणीचे कोंपरेही जरा खालीं उतरल्यागत भासत होते. सकाळीं सुव्यवस्थित विंचरलेला तिचा केशकलाप विस्कळीत झाला होता. त्याचप्रमाणें सकाळीं चोपून चोपून नेसलेलें पातळहि चुरगळलें होतें. पण हा एकंदर विगलित भावसुद्धां कल्पनेला शोभून दिसत होता.

पक्क्या आठ तासानंतर दृष्टीला पडलेल्या लाडक्या लेकीकडे टक लावून पहाणाऱ्या उमाबाईंना असें तर वाटलेंच. पण कां कोण जाणें तिच्याकडे पहातां पहातां त्यांनीं एक सुस्कारा सोडला.

त्याबरोबर किंचित् चिडक्या स्वरांत कल्पना म्हणाली, " आई,

मला तुझं भारी आश्चर्य वाटतं ग. दादा एंजिनिअर होऊन त्याला नौकरी लागली तेव्हां त्यानें आपल्या पहिल्या पगारांतून आपणां तिघांना अशाच कांहीं वस्तू आणून दिल्या. स्वतःला उंची सर्जचा सूट करण्यांतच त्याचा पहिला पगार बहुतेक संपल्यामुळें त्यानें आपल्याला अगदीं अल्प किंमतीच्या वस्तू दिल्या. तुला त्यानें एक साधा चंदनी कंगवा दिला पण तुला त्याबद्दल केवढा साभिमान आनंद वाटला. आणि तुम्हां तिघांना छानदार वस्तू घेण्यांत माझा पहिला पगार मी बहुतेक संपविला. सोनेरी नक्षीचा हा सुंदर चांदीचा करंडा मी मोठ्या आवडीनें तुझ्यासाठीं आणला. पण दादानें तो कंगवा दिल्यावेळीं तुला झालेल्या आनंदाच्या निम्म्यानेंसुद्धां आनंद तुला झाला नाहीं. असा भेद कां करतेस तूं ?"

" काय सांगू बाळ ? पोरी, हा चांदीचा डबा तूं जर आपल्या नवऱ्याच्या मिळकतींतून मला दिला असतास तर मला ह्याच्या कितीतरी पट अधिक आनंद झाला असता ! कल्पने, तुझा हा पुरुषी थाटाचा स्वतंत्र बाणा मला गोड वाटत नाहीं. घरची परिस्थिति गरिबीची असल्यामुळें संसाराला आधार व्हायला कांहीं स्त्रिया नौकरी करितात आणि तें योग्यच आहे. पण संपन्न पित्याची एकटी एक कन्या तूं. तुला पैशाची काय कमतरता आहे ? पण आपल्याला मुळीं लग्नच करावयाचें नाहीं असा भलता हेका धरून तूं जो हा नौकरपेशा पत्करला आहेस तो मला गैर वाटतो. त्यामुळें मकरंदाच्या पहिल्या पगाराचें जसें मला कौतुक वाटलें तसें तुझ्या पहिल्या पगाराचें वाटूं शकलें नाहीं. "

कल्पना ह्यावर कांहींच बोलली नाहीं. तरी त्यावरून आपले बोल तिला पटले असें उमाबाईना कांहीं वाटलें नाहीं. कारण कल्पनेचा स्वभाव जात्या गोड व प्रेमळ असल्यामुळें वडील माणसाकडे ती सदोदित वाद घालीत बसत नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. तेव्हां कल्पनेचें मौन संमतिदर्शक नाहीं असें वाटलें असूनहि आल्या संधीचा पूर्ण उपयोग करून घेण्याच्या उद्देशानें त्या म्हणाल्या, " कल्पने, तुझ्या बुद्धिमत्तेचा हा प्रभाव पाहून मला आनंद वाटला तरी समाधान वाटत नाहीं. तुझें लग्न होऊन तुला संसार करितांना पाहिल्यानेंच मला खरें समाधान वाटणार आहे. आणि केवळ माझेंच नव्हे तर तुझ्या वडिलांचें व भावाचें मतहि असेंच आहे. "

" वाः म्हणजे ! पुरुषांनाच तेवढं आर्थिक स्वातंत्र्य असावं वाटतं. आणि स्त्रियांना..."

" कल्पने, आर्थिक स्वातंत्र्य हें पुरुषांचें ध्येय आहे, स्त्रियांचें नव्हे. "

" आई, तुमच्या वेळीं संसार नि मुलंबाळं हेंच स्त्रियांचें ध्येय असेल. पण आतां काळ खूप सुधारला आहे. आतां स्त्रियांचें क्षेत्र खूप विस्तृत झालें आहे व त्यांचें ध्येयहि बदललें आहे. मग आतां त्या घरांत डांबून कशा राहतील ? "

" तुझी ही मतें नि तत्वें मला कशी बाई कळणार ? मी थोडीच तुझ्यासारखी सुशिक्षित, पदवीधर आहे ? पण तुझे वडील आणि भाऊ शिकलेले आहेत तरी त्यांना सुद्धां हीं तुझीं मतें पटत नाहींत ना ? "

" मीं त्यांना तीं एकदां पटवून देणार आहे. "

" दे बाई. पण आतां हा चहा घेतेस ना आधीं ! "

चहाच्या निमित्तानें कल्पनेनेंहि हा वाद इथेंच थांबविला. कारण तिला आज तर फारच थकल्यासारखें वाटत होतें.

आर्थिक स्वातंत्र्यापायीं हुरळून गेल्यामुळें तिच्या मनाला कितीहि उल्हास वाटला, पुरुषांच्या बुद्धीच्या बरोबरीनें तिची बुद्धि कितीहि प्रगल्भ झाली असली तरी निसर्गाच्या रचनेनुसार तिचें शरीर नाजुकच होतें. पुरुषांच्या काटक, दणकट शरीराला सहजी झेंपणारी दिवसभराची यातायात तिच्या शरीराला झेंपत नव्हती. नुसत्या इच्छा-शक्तीच्या जोरावरच कां कुठें कामें होतात !

गेल्या महिन्याभरांत कल्पनेलाही हें बऱ्याच वेळां समजून आलें होतें. पण तें उमजत नव्हतें. नव्हे तीं तें उमजून घेऊं इच्छित नव्हती, हेंच खरें !

## प्रकरण २ रें .... .... .... .... कल्पनेचीं तत्त्वें

कल्पना साधारण ८।१० वर्षांची असतांना " तूं मोठी झाल्यावर काय करणार " असें कुणी विचारलें असतां, आपण डॉक्टर होणार व आजन्म अविवाहित राहणार असें दुहेरी मत ती सांगून टाकी.

पुढें ती मॅट्रिक झाल्यावर लहानपणींच्या तिच्या ह्या मतानुसार ती मेडिकल लाइन खरोखरीच घेणार कीं काय असें अण्णासाहेबांनीं तिला विचारलें. त्याबरोबर अंग शिरशिरवीत कल्पना उत्तरली, " शीः, शीः, झुरळांची, बेडकांची आणि प्रेतांची चिरफाड करण्याचें तें शिक्षण नको ग बाई मला ! मी आपली बी. ए. होणार. "

त्याच सुमाराला उमाबाईनीं कल्पनेचें लग्न उरकून टाकण्याची घाई अण्णासाहेबांच्या मागें सुरू केली व अण्णासाहेब वरसंशोधनाला लागले. पण हें कल्पनेच्या कानांवर जातांच तिनें स्पष्ट उत्तर दिलें कीं, " मला मुळीं लग्नच करावयाचें नाहीं तेव्हां त्या भानगडींत तुम्ही पडूं नका. "

अण्णासाहेब उदारमतवादी असल्यामुळें जबरदस्तीनें मुलीचें लग्न करावें असें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं. पण आजन्म अविवाहित राहण्याची तिची प्रतिज्ञा ऐकून त्यांना गंमत वाटली. त्यांच्या मनांत

आलें, " प्रेताची चिरफाड करण्याइतका कठोर धीटपणा जिच्या अंगीं नाहीं ती आजन्म अविवाहित राहून दोषैक्यदृष्टि समाजापुढें एकटीच काय टिकाव धरणार ? " मात्र त्यांनीं आपल्या मनांतील ह्या विचाराचा उघड उच्चार केला नाहीं.

पण बरोबर तोच मुद्दा उचलून मकरंद चेष्टेनें म्हणाला, " म्हणे लग्नच करावयाचें नाहीं. ए भागूबाई, चिरफाडीचा धंदा करण्याची धमक अंगांत नाहीं नि लग्न न करितां एकटी कशी ग राहणार तूं !"

" दादा, आजन्म अविवाहित राहण्याला शारीरिक धैर्याची गरज नसते कांहीं. त्याला मानसिक धैर्य हवं असतं नि तें माझ्याकडे भरपूर आहे. समजलास दादा ? " आणि मॅट्रिक झाल्यानंतर कल्पनेनें जें हें उत्तर दिलें तेंच आतांही बी. ए. झाल्यानंतर ती देत होती.

आजकालच्या शिकलेल्या, स्वतंत्र वृत्तीच्या तरुणींना लग्नाचें पारतंत्र्य स्वीकारावें असें मुळींच वाटत नाहीं; लग्न केल्यानें त्यांचें कार्यक्षेत्र अतिशय आकुंचित होतें, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य व तज्जन्य व्यक्तिमत्व मिळविणें अशक्य होतें वगैरे ठाम तत्वें कल्पनेनें ठरवून टाकलीं होतीं. व अधूनमधून त्या तत्त्वांचा ती घरांत उच्चार करीत असली तरी आजवर ती विद्यार्थीदशेंत असल्यामुळें ह्याबद्दल विशेष जोरानें किंवा अधिकारानें तिला बोलतां येत नव्हतें. पण आतां गेल्या महिन्यापासून तिला नोकरी लागल्यामुळें ह्या बाबतींत कायमचें स्पष्टीकरण करवयाचें असें तिनें आतां ठरवून टाकलें होतें.

परंतु पहिल्या पगाराच्या दिवशीं तिला घरीं यावयाला उशीर झाल्यावरून उमाबाईनीं हा विषय काढला तरी तिला आई, वडील

व भाऊ ह्या तिघांच्या समक्ष एकदांच शहानिशा करावयाचा असल्यामुळें व त्या वेळीं ती फार थकून गेल्यामुळें तिनें तो विषय तिथेंच थांबविला.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं जेवणें आटोपल्यावर हिराबाईचें रेडिओवरील गाणें ऐकण्याच्या निमित्तानें सर्व मंडळी दिवाणखान्यांत जमल्यावर कल्पनेनें मुद्दाम तो विषय काढला.

तिनें आदल्या दिवशीं मकरंदासाठीं आणलेली सिगारेट केस त्याला आतां देत म्हटलें, " हं, दादा, ही घे तुला माझ्या पहिल्या पगाराची आठवण. "

" वाः ग पोरी, सिगारेट केस मला बक्षीस देऊन माझ्या धूम्रपानाची ग्वाही फिरविण्याची तुझी युक्ति आहे वाटतं ही ? "

" तर तर ! जणू कांहीं तूं सिगारेट ओढतोस ते आई, अण्णांना ठाऊकच नाहीं जसं ! म्हटलं, दादा, तूं मुलगा असल्यामुळें तुला सर्व माफ आहे. "

" हें नाहीं हं मी कबूल करणार कल्पने. मी तर म्हणतों कीं, आई, अण्णा माझ्यापेक्षां तुझेच अधिक लाड करितात. "

" लाड करीत असतील रे. पण लाड करणं वेगळं नि अभिमान बाळगणं वेगळं ! तुझ्याविषयीं आई, अण्णांना अभिमान वाटतो नि म्हणून तुला हवी ती स्वतंत्रता देतात तीं. "

" आणि तुला काय कमी स्वतंत्रता आहे ग ? " बहीणभावंडाच्या ह्या संवादांत भाग घेत अण्णासाहेबांनीं प्रश्न केला.

" हो तर ! कालचंच पहा कीं, मला यावयाला जरा उशीर होतांच आई अगदीं घाबरून गेली ना ? "

" मग ? बरोबरच आहे तें. १०॥ वाजल्यापासून शाळेच्या त्या घाण्याला जुंपल्यामुळें थकून जातेस तूं आणि कधीं एकदां घरीं येतें असें होतें तुला. मग असें असतां काल तुला एवढा उशीर झाल्यावर तुझ्या आईला काळजी नाहीं कां वाटणार ? "

" बरं, तें राहूं दे. पण अण्णा, काल माझ्या पहिल्या पगारांतून किती आवडीनें मीं तुम्हां तिघांसाठीं वस्तू विकत आणल्या. नि आईला त्याबद्दल कांहींच कौतुक वाटलें नाहीं. "

" अंहं, कल्पने, कौतुक वाटलें नाहीं असें नव्हे. कौतुक वाटलें पण समाधान झालें नाहीं. नि तें रास्तच आहे. तुझा हा स्वतंत्र बाणा कांहीं मला पसंत नाहीं. " उमाबाईनीं स्पष्ट उत्तर दिलें.

" पसंत नाहीं ? कां पसंत नाहीं ग ? "

" कल्पने, आम्ही दोघं आहोंत तोंवर ठीक आहे. पण आमच्या मागें हें तुझं पुरुषी थाटाचं, एकलकोंडं जिणं कंटाळवाणं होईल बरं."

" तें कां आई ? दादा आहे कीं माझ्या आधाराला. "

" दादा ! हं ! वेडे, दादाची वहिनी आली नाहीं तोंवर त्याचा आधार मिळेल तुला. एकदां त्याचा संसार सुरू झाला कीं, तो त्यांतच गुरफटून जाईल. समजलीस ? "

" मग माझे मित्र आणि मैत्रिणी आहेत कीं. "

" अग, तसले शाळूसोबती काय कामाचे ? ते आपापल्या संसारांत गुंतले नाहींत तोंवरच त्यांची मैत्री तुझ्या वांट्याला यावयाची. "

" कां बरं आई ? मोहिनीची आणि माझी मैत्री किती गाढ आहे हें तुला ठाऊक आहेच. शिवाय तिची मतंसुद्धां थेट माझ्या-सारखींच आहेत. तीसुद्धां आजन्म अविवाहित रहाणार आहे ! "

" तें नको सांगूं मला. त्या मोहिनीला मोहिनी घालणारा एकादा भेटला कीं, तुझी मैत्री नि बैत्री चट्‌ सारं राहील जाग्यावर."

" असं असेल तर मला असल्या मित्रांची, मैत्रिणींची, कुण्णा कुण्णाची पर्वा नाहीं ! "

" कल्पने, तूं वयानें वाढलीस, तुझी बुद्धीहि वाढली तरी केवळ अनुभवानेंच प्राप्त होणाऱ्या व्यवहारज्ञानाचा लाभ तुला अद्यापि झालेला नसल्यामुळें आपल्याला कुणाचीच पर्वा नाहीं असें तुला वाटतें आहे. बेपर्वा वृत्ति हा तारुण्याचा स्वभावधर्मच असतो. पण बाळ, पुढें, कांहीं वर्षानंतर असा एक काळ येईल कीं त्यावेळीं तुला आपल्या माणसांची गरज वाटेल !" अण्णासाहेबांनीं सौम्यपणें सांगितलें.

ह्यावर कल्पना म्हणाली, " अण्णा, खरं असेल हें तुमचं सांगणं. पण ' वसुधैव कुटुम्बकम् ' अशी वृत्ति ठेविल्यावर आपल्याला सर्वत्र आपुलकीच नाहीं कां आढळणार ? "

" वेडे पोरी, ' वसुधैव कुटुम्बकम् ' हे शब्द उच्चारावयाला सोपे आहेत. पण ते आचरणांत आणणें फार कठीण आहे बरं. अग, मोठमोठ्या ज्ञानवृद्ध वयोवृद्ध तपस्व्यानांसुद्धां तें जुळत नाहीं. मग सर्व-साधारण माणसाची दृष्टि इतकी उदार व व्यापक कुठून होणार ? "

" पण खरं सांगूं अण्णा, मला किनई, आपलं घर व तुम्हीं तिघं ह्या पलीकडे कशाचीच गरज वाटत नाहीं. "

" होय, होय ग, तें सारं ठीक आहे. पण उद्यां मकरंदाचा स्वतंत्र संसार झाला, कालक्रमानुसार आम्ही दोघं मृत झालों म्हणजे तुला कुठलं घर आणि कुणाचा आधार ? "

कल्पना कितीहि धीट असली, बोलकी असली तरी अतिशय प्रेमळ व कोमल अंतःकरणाची तरुणी होती. आपल्याला अत्यंत प्रिय असलेले आपले आई, वडील पुढें मागें आपल्याला कायमचे सोडून जाणार ह्याविषयींचा अण्णासाहेबांनीं केलेला हा ओझरता उल्लेखसुद्धां तिला असह्य झाला.

तिचें तोंड गोरेंमोरें झालें—

व तें पाहून अण्णासाहेब म्हणाले, " पाहिलंस पोरी, आईबापाविना निराधार होण्याची नुसती कल्पनासुद्धां तुला एवढी असह्य वाटते मग तसली प्रत्यक्ष परिस्थिति तुला कशी सहन करवेल ? "

आपल्या मृदु अंतःकरणाला ताण देऊन अण्णासाहेब स्वतःचा मुद्दा प्रस्थापित करूं पहात आहेत असें वाटून, क्षणापूर्वीं मातृपितृवियोगाच्या कुशंकेनें हळवी झालेली कल्पना आतां कांहींशी चिडली. व उत्तेजित स्वरांत म्हणाली, " तें कांहीं नाहीं अण्णा, परिस्थितीच सारं चालवून नेते. परिस्थितीच्या सांच्यानुरूप मानवी मनोवृत्ति बनत असते ! "

" पण परिस्थितीचा सांचा चांगला, सुखकारक बनविणें आपल्या हातीं असून तो मुद्दाम त्रासदायक कां घडवावयाचा ? "

" परंतु मला तो त्रासदायक वाटेल हें कशावरून ? "

कल्पनेच्या त्या प्रत्युत्तरावर उमाबाई मृदु स्वरांत म्हणाल्या,

" बाळ, तारुण्याच्या मस्तीमुळें तुला आतां हें सारं गोड वाटत आहे. पण पुढें थकल्या भागल्यावेळीं मायेच्या स्पर्शासाठीं तूं व्याकुळ होशील बरं. नवरा व मुलं ह्या अतिनिकटच्या माणसांच्या प्रेमळ सहवासाचा आधार कांहीं वेगळाच असतो.

" मुलं ! " आपल्या काळ्याभोर, रेखीव भिंवया वर चढवीत कल्पनेनें प्रश्न केला, " मुलं ! आई, निसर्गतःच स्त्रियांना मुलांची आवड असते तशी मला मुळींसुद्धां नाहीं असें तूंच नेहमीं म्हणतेसना ! मग मला मुलांचें आकर्षण वाटेल असें गृहीत धरून कशी चालतेस तूं ? "

" कल्पने, असं बघ, तळाशीं जिवंत झरे असलेल्या विहीरी बाराहि महिने पाण्यानें तुडुंब भरलेल्या असतात. पण म्हणजे ज्यांच्या तळाशीं असे झरे नसतात त्या विहिरी कोरड्या ठणठणीत असतात असें थोडेंच आहे ? "

उमाबाईनीं योजलेली ही सुंदर, सार्थ उपमा ऐकून कल्पना विस्मित झाली; कौतुकानें ती आईकडे पहातच राहिली.

पण दुसऱ्याच क्षणीं स्वतंत्रतेची तिची आवड जागृत होऊन तिनें म्हटलें,

" बरं बाई, वात्सल्याच्या बाबतींत माझं हृदय कोरडं ठणठणीत नसेल कदाचित्—पण आई, स्त्रीस्वातंत्र्याच्या आवडीनें मात्र माझं हृदय कांठोकांठ भरलं आहे हो. "

" हा तुझा निव्वळ भ्रम आहे कल्पने. तुझीं हीं तत्त्वं मला कांहीं पटत नाहींत. तूं माझं ऐक. तुझ्या योग्यतेच्या तरूणाबरोबर लग्न करून तूं सुखी हो आणि आम्हांलाहि सुखी कर. "

" मीं विवाह केल्यानें तुम्हांला सुख होईल कदाचित् पण मला कधींच होणार नाहीं ! कर्तृत्वशून्य स्त्रियांनींच विवाहाच्या पारतंत्र्याची बेडी आपल्या पायांत अडकवून घ्यावी. "

" अग, पण विवाह म्हणजे पारतंत्र्य हें कुठलं पोरकट तर्कशान ?"

" हो, बरं असेल पोरकट तर्कशान ! आई, मनुसारख्या पुरातन काळच्या कायदेकारांनींच मुळीं ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' ह्या व असल्या वाक्यांनीं स्त्रियांना आणि विशेषतः विवाहित स्त्रियांना आमरण बंधनांत ठेविलें आहे ना ? "

" मीं म्हणतो कल्पने, ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' ह्या मनूच्या वचनाचा अर्थ असा नाहींच मुळीं. " किती तरी वेळानें मकरंदानें संभाषणांत भाग घेतला व कल्पनेला त्यामुळें फार बरें वाटलें. कारण वादांतसुद्धां आईवडिलांचा अपमान होऊं नये म्हणून ती नेहमीं जपत असे. व त्यामुळें तिला आपली मतें मोकळेपणानें सांगतां येत नसत. आतां मकरंदानें वादांत भाग घेतांच, आतां गरज पडल्यास त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें बोलतां, भांडतांसुद्धां येईल असें वाटून कल्पनेला समाधान वाटलें.

व त्या भरांत ती मिस्किलपणें म्हणाली, " अस्सं ! मग मनूच्या त्या वचनाचा अर्थ कसा लावावयाचा दादासाहेब ? "

' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' म्हणजे कोणत्याहि स्त्रीची योग्यता एवढी असते कीं, पुरुषांनीं तिला कधींहि स्वतंत्र ठेवितां कामा नये. म्हणजे तिला एकटी टाकतां कामा नये. असाच त्या वचनाचा अर्थ घेतला पाहिजे. "

मकरंदाचें हें अर्थीकरण ऐकून कल्पनेला हंसू आलें पण त्या हंसण्यांत सादर विस्मयाचा भाग बराच होता. मकरंदानें आतां सांगितलेल्या अर्थानें मनूनें स्त्रियांबद्दलचा हा दंडक लिहिला असो वा नसो पण असा अर्थ काढणें हें निःसंशय बुद्धिमत्तेचें द्योतक होतें. व संस्कृत विषयामध्यें कधींच विशेष पारंगत नसलेल्या आपल्या दादानें हा अर्थ लावावा ह्याचें कल्पनेला कौतुक वाटून ती म्हणाली, " वाः रे दादा! पुण्याला एंजिनिअरिंगचा अभ्यास करितांना संस्कृतचा पंडित झालास वाटतं ? तूं लाविलेला अर्थ मला आवडला. "

" होय ना ? मग ठीक आहे. पण कल्पने, त्या अर्थाचें जनकत्व माझ्याकडे नाहीं हं. उगीच मोठेपणा कशाला घेऊं ? हें बघ, विल्सन् कॉलेजमध्यें मिलिंदकुमार ह्या नांवाचा माझा एक मित्र होता त्यानें हा अर्थ शोधून काढला. "

" अस्सं ! तरी म्हटलं आमचे दादासाहेब ह्या नसत्या फंदांत कसे पडणार ! पण काय रे, हे मिलिंदकुमार कोण ? तुझ्या तोंडून मीं त्यांचें नांव नाहीं तें कधीं ऐकलें ! "

" अग, कसं ऐकणार तूं ! त्यावेळेला एवढीशी पोर होतीस तूं. शिवाय, मिलिंदाची आणि माझी प्रीव्हियसमधील एका वर्षाचीच मैत्री. पुढें तो बी. ए., एल्.एल्. बी. होऊन सबजज्ज झाला व अस्मादिकांची स्वारी पुण्याच्या कॉलेजांतून एंजिनिअर होऊन मुंबई म्युनिसिपॅलिटीमध्यें लागली. मिलिंदाची आणि माझी मैत्री वर्षभराचीच खरी पण आमचं फार जमत असे. गृहस्थ भारी हुषार पण तितकाच चक्रम. मीं पुण्याच्या कॉलेजात गेल्यानंतर सुट्टीमध्ये मुंबईला

आल्यावेळीं त्याची व माझी २।४ वेळां भेट झाली असेल तेवढीच. आतां गेल्या २ वर्षांत तर बिलकूल पत्ता नाहीं बेट्याचा. ”

“ जातीनें कोण रे हे मिलिंदकुमार ? ” उमाबाईनीं मध्येंच प्रश्न केला.

“ अगं, आपल्यांतलाच तो. कोंकणस्थच आहे. शिवाय अविवाहित पण उपयोग काय ? ” तिरक्या नजरेनें कल्पनेकडे पहात मकरंद म्हणाला. त्यावर मानेला झटका देत कल्पना उत्तरली, “ हं. दादा, मला मुळीं लग्नच करावयाचें नाहीं. ”

“ आणि अहो ताईसाहेब, आपल्याला लग्न करावयाचें असतें तरी कांऽऽहीं उपयोग नव्हता. कारण मिलिंद पक्का स्त्रीद्वेष्टा आहे. तो कधींच लग्न करणें शक्य नाहीं. बाकी, तुम्ही दोघं एका मताचीं आहांत तेव्हां त्या दृष्टीनें जोडा बरा जमेल. ”

अनुरूप वराबरोबर कल्पनेचा कधीं एकदां विवाह होईल ह्या चिंतेनें भारावलेल्या उमाबाईंच्या मातृहृदयाला मकरंदान केलेली ही चेष्टासुद्धां गोड वाटली. त्या कल्पनेला म्हणाल्या, “ खरंच ग पोरी, तुझा नि तुझ्या नवऱ्याचा लक्ष्मीनारायणासारखा जोडा डोळे भरून कधीं पाहीन असं झालं आहे मला. कल्पने, सोड बाई हें वेड नि माझ्या-साठीं तरी लग्नाला तयार हो. ”

“ हा काय आई तुझा जुलूम ? दादा माझ्यापेक्षां चांगला सहा वर्षांनीं वडील असून त्यानें नाहीं ते कुठं अद्यापि लग्न केलें ! ”

“ अग, दादा मुलगा आहे नि तूं मुलगी आहेस ! ”

उमाबाईंच्या ह्या वस्तुस्थितिनिदर्शक उत्तरानें कल्पना किंचित्

चिडली व चिडक्या स्वरात म्हणाली, " बरं झालं तर ! मी मुलगी नसून मुलगाच आहे असं समज कीं तूं ! मला हवं तेव्हां मीं लग्न करीन. पण तसं कशाला ! मीं मुळीं लग्नच करणार नाहीं. तूं ह्या बाबतींत मला आग्रह करूं नकोस. "

कल्पना एवढें निक्षून बोलली तरी उमाबाई पुनः कांहींतरी अनुनयाचें बोलणार होत्या. पण अण्णासाहेबांनीं तेवढ्यांत त्यांना गप्प रहाण्याची सूचना केली. व ते संथपणें कल्पनेला म्हणाले, " ठीक आहे कल्पने, आम्ही ह्यापुढें तुला ह्या बाबतींत कांहीं एक बोलणार नाहीं तुला जें योग्य वाटेल तें तूं कर. "

आणि मौज अशी कीं अण्णासाहेब असे बोलतांच कल्पनेचा जोर बराच थंडावला.

कल्पनेचा स्वभाव बराच हेकेखोर होता. आई, वडील, विशेषतः आई, लग्न करण्याबद्दल आग्रह करीत असल्यामुळें ती लग्न न करण्याच्या हेक्याला विशेषच चिकटून होती. तिच्या त्या हेक्याचा वडील माणसांकडून जसजसा प्रतिकार होई तसतसा तिचा हेका वाढत जाई ! पण आज अण्णासाहेबांनीं आपल्या वागणुकीचें धोरण बदललें. कल्पनेला त्यांनीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें. व त्या स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीहि अंगावर आल्यामुळें कल्पनेची हेकेखोर वृत्ति बरीच थंडावली !

कल्पनेनें विचारपूर्वक ठरविलेल्या तत्त्वांना आज पहिल्यादांच किंचित् धक्का बसून तीं थोडीशीं डळमळीत झालीं !

## प्रकरण ३ रें .... .... .... प्रिय मैत्रिणहि दुरावली

त्या दिवसापासून अण्णासाहेबांनीं व त्यांच्या सतत सांगण्यावर हुकूम उमाबाईनीं कल्पनेच्या लग्नाचा विषय अजिबात सोडून दिला.

अण्णासाहेबांनीं मानसशास्त्राचा अभ्यास केला असल्यामुळें आपण प्रतिकाराचें धोरण सोडून देतांच विवाह न करण्याचा कल्पनेचा हेका किंचित् दूर होईल अशी त्यांची अपेक्षा होती व त्यामुळें ते निश्चिंत होते. पण उमाबाईंची ही अपेक्षा नव्हती व अण्णासाहेबांनीं त्यांना कितीहि समजावून सांगितलें तरी तें त्यांना पटत नव्हतें. त्यामुळें दिवसानुदिवस त्यांचें मन हिरमुसलें होऊं लागलें व कल्पनेवरील त्यांच्या मायेवर त्याचा नकळत परिणाम होऊं लागला. म्हणजे त्या कोणत्या बाबतींत कल्पनेची हयगय करीत असे नव्हे तर त्यांच्या अंतःकरणालाच एक प्रकारची रूक्षता आली होती. वस्तुतः कोमल हृदयी असणाऱ्या कल्पनेच्या हृदयाची ही कठीणता त्यांना कडू वाटूं लागली. पूर्वीं कल्पनेविषयीं त्यांना जी आतुर काळजी व लाडिक वत्सलता वाटत होती ती आतां वाटेनाशी झाली.

आणि आईमध्यें झालेला हा बदल कल्पनेला चांगलाच जाणवूं

लागला. पूर्वी तिला घरीं यावयाला उशीर झाला तर उमाबाई तिची उत्कंठेनें वाट पहात बसत व ती घरीं आल्यानंतर तिची प्रेमळ रागानें हजेरी घेत. व त्याबद्दल कल्पना आईवर रुसे, रागावे.

पण आतां तिला घरीं यावयाला कितीहि उशीर झाला तरी उमाबाई तिची वाट पहात बसतच. परंतु त्याबद्दल तिला कधींहि बोलत नसत. आणि मौज अशी कीं, आतां ह्यामुळेंच कल्पना आई-वर मनांतल्या मनांत रुसे, रागावे.

अर्थातच हा रुसवा व रोष उघड करावयाला तिला अधिकारच नव्हता. तरी पण आईच्या ह्या वेगळ्या वागणुकामुळं तिला चुकल्या-चुकल्यासारखें होई.

त्याचप्रमाणें नोकरीच्या २।३ महिन्यांच्या नवलाईनंतर त्या रोजच्या दगदगीचा तिला हल्लीं कंटाळा येऊं लागला.बरोबरच आहे तें.

परिस्थितीपायीं नोकरी करणें प्राप्त झालें म्हणजे व्यावहारिक दृष्टि उत्तेजन देत असते. पण कल्पनेला पैशाची वास्तविक गरज नसल्या-मुळें तिच्या मनाला तशी ओढ नव्हती. आर्थिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाला बळी पडून तिनें नोकरीचें हें लोढणें गळ्यांत अडकवून घेतलें होतें. त्यामुळें कधीं कधीं तिला ह्या जखडबंदीचा मनस्वी कंटाळा येई.

ऐषारामांत वाढलेल्या तिच्या नाजुक देहाला बी. ए. पर्यंतचा अभ्यास झेंपला. कारण त्या वेळीं परीक्षा पास होण्याची आकांक्षा तिला उद्युक्त करीत होती. शिवाय एकाद्या दिवशीं जरा डोकें दुखलें म्हणून किंवा असल्या अन्य, क्षुल्लक कारणामुळें ती खुशाल शाळेला व नंतर कॉलेजलाही टाळा देऊं शकत होती.

पण आतां परिस्थिति वेगळी होती. आतां ती शाळेची बांधील होती. शाळेकडून ती पगार घेत असल्यामुळें कामांत चुकारपणा करणें तिला शक्य नव्हतें. म्हणजे आर्थिक स्वातंत्र्याच्या भरीला पडून ती आतां आपल्या आचार स्वातंत्र्यालाहि मुकली होती !

शनिवार, रविवारच्या सुट्टीनंतर एकाद्या सोमवारीं तिला शाळेंत जाऊं नयेसें वाटे. पण हें सांगणार कुणाला आणि कसें ?

आपलें हितगुज निवेदन करावयाला तिला आतां एकच स्थान होतें. व तें म्हणजे तिची प्रिय मैत्रीण मोहिनी.

कल्पना व मोहिनी यंदा बरोबरच बी. ए. झाल्या. शाळा–कॉलेजांतील सहवासापेक्षां मतसादृश्यामुळें त्यांच्या मैत्रीला अधिक दृढता आली होती.

मोहिनीचें कल्पनेच्या घरीं बरेंच येणें जाणें असलें तरी कल्पनेप्रमाणें आजन्म अविवाहित रहावयाचें असेंच 'बेफाट' मत तिचेंहि असल्यामुळें एरवीं ती सुस्वभावी व सुस्वरूप असूनही उमाबाईंना तिचा राग येई.

कल्पनेप्रमाणें मोहिनीनेंहि हल्लीं एका शाळेमध्यें नोकरी पत्करली असल्यामुळें त्या दोघींची पूर्वींप्रमाणें वारंवार भेट होत नसे. बाकी खरं सांगावयाचं म्हणजे कल्पनाच हल्लीं मोहिनीची भेट घेऊं इच्छित नव्हती.

आजवर त्या दोघीही स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याची घोषणा व विवाहित पारतंत्र्याची निंदा करीत होत्या. तरी त्यांतल्या त्यांत कल्पनेचा सूर विशेष चढा असे. पण आर्थिक स्वातंत्र्याकरितां गेले २।३

महिने कराव्या लागलेल्या आट्यापिटयामुळें तिचा सूर हल्लीं बराच मंदावला होता.

मनुष्यस्वभावानुसार मोहिनीकडे तें कबूल करावयाची तिची इच्छा नव्हती. आणि तिची भेट झाल्या वेळीं आपल्या भाषणामधून कदाचित् तिला वस्तुस्थिति कळून येईल असें वाटल्यामुळें तिनें हल्लीं मोहिनीकडे जाणेंच बंद केलें होतें.

त्यामुळें त्यानंतर८।१० दिवसांनीं मोहिनी स्वतःच तिच्या घरीं आली तरी, बऱ्याच दिवसांनीं त्यांची ही भेट झाली असूनही कल्पनेला पूर्वींप्रमाणें आनंद झाला नाहीं.

स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य ही स्तुत्य घटना असली तरी चांगल्या गोष्टींचा सुद्धां अतिरेक होऊं शकतो हें कल्पनेला हल्लीं पटूं लागलें होतें. व आतां मोहिनी आली आहे तेव्हां आपल्याला तिच्याकडे हें कबूल करणें भाग पडणार अशा विचारांत कल्पना गढून गेल्यामुळें मोहिनीचा नूर आज कांहीं वेगळाच दिसतो .आहे हें तिच्या लक्ष्यांतहि आलें नाहीं.

५।१० मिनिटें दोघीहि स्तब्धच होत्या. नंतर मोहिनी अर्ध-स्फुट आवाजांत म्हणाली, " कल्पने, तुला एक गोष्ट सांगावयाची आहे. पण तूं चेष्टा करशील म्हणून भीति वाटते गडे. "

आतां कुठें कल्पनेचें मोहिनीच्या चर्येकडे लक्ष गेलें. व क्वचितच हंसरी दिसणारी मोहिनीची मुद्रा आज फारच स्मितोज्वल दिसते आहे हें तिच्या नजरेला आलें. व स्वभावतः आनंदी असणाऱ्या पण अलीकडे त्रासिक बनलेल्या स्वतःच्या मुखमंडलाच्या अरशांतील

प्रतिबिंबाकडे पहात तिनें विस्मयानें विचारलें, " मी चेष्टा करीन म्हणून तुला भीति वाटते आहे ! म्हणजे ? असली कसली गोष्ट तूं सांगणार आहेस ? "

ओठांना बारीकशी मुरड घालीत मोहिनी उत्तरली, " कल्पने, माझा आज विवाह ठरला. "

" काय ! खरंच ?" विस्मयोच्च स्वरांत कल्पना म्हणाली, "आणि तो कुणाबरोबर ? "

" तूं ओळख कीं. "

" मी ओळखूं ? म्हणजे, आपल्या कॉलेजांतील कुणा तरुणा-बरोबर कीं काय ? "

" अंहं, " एकवार गालांत जीभ घालून मोहिनीनें उत्तर केलें. " तुझ्या दादाबरोबर. "

"अगबाई ! म्हणतेस तरी काय ? आणि मग दादानें आम्हांला कशी दाद लागूं दिली नाहीं ? "

" अग, आतां अर्ध्या तासापूर्वी आमच्या घरीं हें ठरलं. नि मग तशीच—आम्ही—आम्हीं दोघं इकडे आलों. "

ह्यावर कल्पना कांहींच बोलली नाहीं.

किंचित् थांबून मोहिनी म्हणाली, " कल्पने, आज ४।५ वर्षें तुझ्या घरीं माझं येणंजाणं असल्यामुळें करीन तर त्यांच्याशींच लग्न करीन असा त्याच वेळीं मी निश्चय केला. पण त्यांचा विचार मला कळून न आल्यामुळें माझी अपेक्षा व्यर्थ आहे असेंच मला वाटूं लागलें व मी आजन्म अविवाहितच राहणार अशी तुझ्या-

प्रमाणें बडबड सुरू केली. नि-नि-म्हणे त्यांना ती खरी वाटली व म्हणून आजवर माझ्याकडे तो विषयच काढला नाहीं. आज सहजच ते आमच्या घरीं आले होते. त्या वेळीं नौकरीच्या ह्या बेडीचा मला अगदीं कंटाळा आला आहे असें मी सहज म्हटलें. त्याबरोबर त्यांनीं त्या बेडीऐवजीं विवाहाची बेडी पत्करून शाळेंतील मुली-ऐवजीं पतिराजांचा पत्कर घेण्याबद्दल मला सुचविलें. नि गडे, इतक्या दिवसांचा माझा हेतू सिद्धीस गेला."

वास्तविक कल्पनेला जसा नौकरीच्या बेडीचा कंटाळा आला होता तसाच आपल्यालाहि आला असल्याचें मोहिनीनें स्वतःच आतां कबूल केल्यामुळें कल्पनेलाहि तें कबूल करावयास हरकत नव्हती. पण तसें न करितां ती गप्प राहिली.

तेव्हां मृदु स्वरांत मोहिनी म्हणाली, "कल्पने, रागावलीस माझ्यावर ? आजन्म अविवाहित रहाण्याची प्रतिज्ञा आपण जोडीनें केली असून आतां त्याच्या उलट मीं वागलें ह्याचा राग आला तुला ? पण कल्पने, बघ, जगामध्यें सर्व गोष्टींची जोडी आपल्याला आढळून येते. तेव्हां स्त्रीनेंहि आपल्या आवडीचा जोडीदार निवडून आपल्या जन्माचें सार्थक करावें, आपलें आयुष्य एकलकोंडें, निष्फळ करूं नये अशीच ईश्वराची योजना असते ! आणि कल्पने, हें तुलाहि एक दिवस पटेल. तूंहि--"

पण मोहिनीनें आपला पराभव कबूल करितांच कल्पनेला जोर चढला. तुच्छतेच्या स्वरांत ती म्हणाली, "हं, हं, मोहिनीबाई, लांड्या कोल्ह्याचें अनुकरण करून मला नका तसलं कांहीं शिकवूं.

मी विचारपूर्वक माझीं तत्वें बनविलीं आहेत तीं आजन्म आचरणांत आणण्यासाठीं. मध्येंच सोडून देण्यासाठीं नव्हे ! ”

काय मनुष्यस्वभावाची मौज तरी ! ज्या तत्त्वांच्या सत्यतेविषयीं कल्पनेलाहि अलीकडे शंका येऊं लागली होती त्याच तत्त्वांना चिकटून रहाण्याचा आपला निश्चय तिनें आतां मोठ्या निकरानें प्रकट केला.

आपल्या प्रिय मैत्रिणीनें आपल्या तत्त्वांचा त्याग केल्यामुळें ती आतां आपल्याला दुरावली हें कळत असूनहि कल्पना त्या तत्त्वांना आणखीच कवटाळूं लागली.

ह्या तिच्या नव्या जोमामुळें तिचे आईबाप तर फसलेच पण कल्पनेनें स्वतःलाहि फसविलें. आणि आपल्या तत्त्वांची विशेषच जोरानें घोषणा करीत राहिल्यामुळें त्यांचें तेवढ्याच कसोशीनें आपल्या आचरणांत पालन करण्याची स्वतःवरील जबाबदारी तिनें आणखीच वाढविली.

## प्रकरण ४ थें .... .... .... .... दादा–वहिनी

आणि ही जबाबदारी कल्पनेला दिवसानुदिवस अधिकाधिकच जड वाटूं लागली.

अण्णासाहेबांनीं मकरंद मोहिनीचा विवाह लगेच उरकून टाकला. कल्पनेची जिवलग मैत्रीण आतां तिची वहिनी झाली व कल्पना वन्सं बनली, पण कॉलेजांतील वर्ग संपल्यावर जिला सोडून घरीं येण्याचे कल्पनेच्या जिवावर येत असे ती मोहिनी आतां रात्रंदिवस तिच्या घरीं असतांहि तिच्या जिवाला त्यामुळें समाधान वाटेना.

कारण त्या दोघींचा आतां चांगलाच मतभेद झाला होता. व मोहिनीला न पटणाऱ्या आपल्या मतांच्या–तत्त्वांच्या—सत्यतेविषयीं कल्पनेलाहि हल्लीं जरा शंका वाटत असली तरी ती उघड तसें बोलूं इच्छित नव्हती.

बरं, आपण स्वीकारलेला मार्गच योग्य आहे अशी मोहिनीची दृढ खात्री असल्यामुळें ती स्वतःच्या इच्छेनें व उमाबाईच्या सांगण्यावरून कल्पनेचें मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करी.

आणि थकल्या भागल्या वेळीं कल्पनेला मोहिनीचें सांगणें मनांतून

पटे. पण तें कबूल करणें तिच्या मानी मनाला पटत नसे. व मग त्याबद्दल तिला स्वतःचाच राग येई व ती दुप्पट जोरानें आपल्या मतांचा पुरस्कार करी.

अशी कांहीं विचित्रच मनःस्थिति झाली होती तिची!

शिवाय पूर्वी सदोदित तिच्या आंवतीभोंवती असणारा, येतांजातां तिची खोडी काढणारा, तिला चिडविणारा, रुसविणारा, हंसविणारा तिचा लाडका दादा आतां सर्वस्वी मोहिनीमध्यें गुरफटून गेला होता; अशा वेळीं "दादाची वहिनी आली नाहीं तोंवर त्याचा आधार मिळेल तुला. एकदां त्याचा संसार सुरू झाला कीं तो त्यांतच गुरफटून जाईल." हे उमाबाईचे शब्द तिला आठवत व तिचे मन खिन्न होऊन जाई.

आपल्याला एकटेंच फिरावयास जाणें आवडत नाहीं म्हणून कल्पनेला रोज जबरदस्तीनें बरोबर नेणारा तिचा दादा आतां रोज मोहिनीला घेऊन फिरावयास जाई. आणि पूर्वी हवीहवीशीं वाटणारी लाडकी बहीण आतां दोघांत तिसरी म्हणून त्याला नकोशी वाटूं लागली.

कल्पनेचें मकरंदावर निरतिशय प्रेम असल्यामुळें त्याच्या वर्तनांत नकळत व निसर्गाला अनुसरून आलेला हा दूरीभाव तिच्या कोमल हृदयाला भारी जाचूं लागला.

व अभिमानाला बळी पडून ती होऊनच आपल्या दादा वहिनीपासून दूर दूर राहूं लागली.

कल्पना व मोहिनी एवढ्या प्रिय मैत्रिणी. पण 'मोहिनीच्या

लग्नापासून त्या दोघींमध्यें अढी आली होतीच. आणि त्यांत कल्पनेचें हें आपल्या मतें अकारण तुटक वर्तन पाहून मोहिनीहि तिच्याकडे जरा परकीपणानें वागूं लागली.

मकरंदाचें व आपलें प्रेम कल्पनेला कौतुकास्पद वाटत नाहीं, तिला आपल्याबद्दल सहानुभूति नाहीं असें वाटून मोहिनी फार नाराज झाली.

म्हणजे उमाबाईंचें भविष्य तंतोतंत खरें झालें. मकरंदाचा विवाह झाल्यामुळें कल्पना दादाच्या प्रेमाला मुकली आणि मोहिनीला हा मोहनराव भेटल्यामुळें ती मैत्रिणीच्या स्नेहालाहि मुकली.

त्यांतच उपवर मुलगी घरांत असतां मुलाचे लग्न करून टाकल्याबद्दल शेजारच्या आयाबायांनीं उमाबाईंना बोलून बोलून पुरेसें केलें. व कल्पनेच्या हट्टापायीं मुलीच्या लग्नांत येणाऱ्या खऱ्या अहेराऐवजीं हे असले शालजोडींतील अहेर आपल्याला मिळताहेत असें वाटून उमाबाई मुलीवर हल्लीं नाखूष होत्या.

मोहिनीनें शहाण्यासारखें लग्न करून घेतलें आणि कल्पनेच्या डोक्यांतील भूत निघत नाहीं असें वाटून उमाबाईंना खेद होई व मग त्या आपल्या हृदयांतील अपत्यवात्सल्याचा वर्षाव मोहिनीवर करीत आणि तें पाहून कल्पनेला भारी वाईट वाटे.

एकटी एक लेक व तीहि सुस्वभावी, मर्यादशील असल्यामुळें कल्पना आईवडिलांची फार लाडकी होती. व ह्या कोडाकौतुकाची ती आजवर एकटीच उपभोक्त्री होती. आतां त्यामध्यें मोहिनी भागिदार झाली तरी त्याबद्दल कल्पनेला मुळींच वैषम्य वाटलें नाहीं.

आपल्या समाजांतील स्त्रिया लेकी, सुनेंत फार भेदभाव करतात हें तिला गैर वाटे. व उमाबाईनीं जर मोहिनीला सासूरवास केला असता तर मोहिनीची बाजू घेऊन तीच आईबरोबर भांडली असती. पण उमाबाई फार प्रेमळ होत्या. व मोहिनीहि गोड लाघवी तरुणी होती. मकरंदानें ह्या मोहिनीच्या गुणांबद्दल पूर्ण निर्वाळा दिला असताच ! तेव्हां ह्या सासूसुनेचें अगदी मायलेकीसारखें प्रेम जुळलें. आणि कल्पनेच्या हेकेखोरपणामुळें मनाला वाटणाऱ्या निराशेचा प्रत्याघात म्हणून कीं काय त्यांना मोहिनीचें विशेषच कौतुक वाटूं लागलें.

कल्पना सुसंस्कृत होती, सुशिक्षित होती व सुस्वभावी होती. त्यामुळें आईच्या ह्या वागण्यांत गैर कांहीं नाहीं, असें होणें नैसर्गिकच आहे हें तिला कळत होतें पण तरी सुद्धां आईच्या प्रेमावर आपला अधिक हक्क असूनहि आपल्याला तें मिळत नाहीं असें वाटून तिच्या अंतःकरणाला दुःख होई. पण त्याला उपाय काय! तिनें आपण होऊन हें संकट ओढून घेतलें होतें.

कल्पनेचें लग्नाविषयींचें मत आतां बदललें होतें असें नव्हे. तिचें मत, तिचीं तत्वें, कायम होतीं पण त्यापायीं तिच्या प्रिय व्यक्तींना तिच्याविषयीं हल्लीं जो उदासीन भाव वाटत होता तो तिला जाचक होई.

कल्पनेनें आपल्या वडिलांना सांगितल्याप्रमाणें तिचें मानसिक बल भरपूर होते. पण शारीरिक बल तितकें नसल्यामुळें शाळेतील घसाफोडीच्या उद्योगानें शरीर थकल्यावेळीं तिचें मनहि कमकुवत बने. व आपल्या ह्या कमकुवतपणाचा राग येऊन ती उसन्या जोरानें

आपलीं तत्वें मुद्दाम ऐकवून दाखवी. पूर्वी तिच्या ह्या तत्वप्रतिपादनांत आत्मविश्वासाचा जोर होता. हल्लीं हा जोर कमी झाला असून त्या-जागीं पोकळ आंव ती आणीत असे.

आपल्या तत्त्वांचा त्याग न करण्यांतच आपला मोठेपणा आहे असें तिला वाटत होतें. परंतु त्यासाठीं ती तत्त्वांना चिकटून असत्याचा जो आंव आणीत होती त्यामुळें तिचे आईवडील फसले पण मकरंद फसला नाहीं.

व म्हणून एक दिवस–म्हणजे त्याचे लग्न झाल्यानंतर ४-५ महिन्यांनीं त्यानें कल्पनेला म्हटलें, " आज संध्याकाळीं माझा मित्र मिलिंदकुमार आपल्या घरीं येणार आहे तेव्हां तुझी व त्याची ओळख करून देणार आहे हं मी."

मकरंदाच्या पहिल्या वाक्यासरशीं किंचित संभ्रमित झालेली आपली चित्तवृत्ति सांवरीत कल्पनेनें विचारलें, " माझी ओळख करून देणार ?"

" अग, त्याला काय हरकत आहे ? एका पंथांचीच आहांत कीं तुम्ही दोघं. तुला लग्न करायचं नाहीं. त्यालाहि करायचं नाहीं तेव्हां तुम्हाला एकमेकांपासून कांहीं धास्ती नाहीं. खुशाल एकमेकांच्या मतांचा उदोउदो करीत बसा तुम्हीं –काय, खरं ना ?"

कल्पना ह्यावर काय उत्तर देते तें पहाण्यासाठीं मकरंदनें मुद्दाम असें म्हटलें. पण कल्पना कसें उत्तर देणार ?

कारण घरांतील परिस्थितीचा तिला हल्लीं फार कंटाळा आला होता. जिथें फुलें वेंचलीं तिथें गोवऱ्या लावणें अतिशय अवघड व

अपमानकारक वाटतें. कल्पनेची स्थिति थेट अशी झाली होती. ह्या घरांत अवघ्या एका वर्षापूर्वीं ती सर्वांच्या प्रेमाचा, कौतुकाचा विषय होती. आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या ह्याच माणसांच्या प्रेमळ शब्दालासुद्धां ती आज पारखी झाली होती.

अण्णासाहेब दिवसभर आपल्या कामांत दंग असत. उमाबाई गृहकृत्यांवर देखरेख करण्यांत व सुनेला आपल्या घरची शिस्त शिकविण्यांत नि तिनें ती लगेच ग्रहण केली म्हणजे तिचें कौतुक करण्यांत गुंग असत. मकरंद आपल्या उद्योगांत आणि मोहिनीमध्यें गर्क असे. व मोहिनी घरकामांत व पतिराजामध्यें गुंतलेली असे.

मिळून घरांत एक म्हातारें व एक तरुण अशीं दोन जोडपीं होती व कल्पना बिचारी एकटी पडली होती.

ह्या स्वतःच्याच सतत सहचर्याचा कल्पनेला हल्लीं कंटाळा आला होता. त्यामुळें आजवर मकरंदानें आपल्या इतर मित्रांच्या ओळखी करून दिल्यावेळीं वाटणारा राग व औदासिन्य तिला आतां वाटलें नाहीं.

संध्याकाळीं मिलिंदकुमाराशीं आपली ओळख होणार ह्याबद्दल तिला सोत्सुक आनंद झाला.

आपल्या कायम ठशाच्या ह्या हल्लींच्या आयुःक्रमांत आतां एक वैचित्र्य येणार असें वाटून तिच्या हृदयाला कितीतरी दिवसांनीं आज हुरूप वाटूं लागला.

संध्याकाळीं शाळेंतून आल्याबरोबर तोंड वगैरे धुवून तीं आपल्या आवडीचा जरीकांठी निळा रास्ता नेसली. तिच्या सुगौर वर्णाला

व गोंडस देहयष्टीला हें तलम लुगडें व फिक्या निळसर जॉर्जेटचा फुगीर बाह्यांचा ब्लाऊज फार शोभत होता.

सैल झाल्यामुळें मानेवर रुळणाऱ्या आंबाड्यावर निळ्या विलायती फुलांचा गुच्छ कलता बसवितांना कल्पनेची नजर स्वतःच्या मोहक प्रतिबिंबाकडे गेली व कांहींशी तटस्थ होऊन ती तिकडे पहातच राहिली.

हल्लींच्या आपल्या कंटाळलेल्या, त्रासिक मुद्राविर्भावाशीं अवि-विसंगत दिसणारी ही आतांची प्रसन्न, मधुर मुद्रा पाहून तिला सानंद विस्मय वाटला व मग कां कोण जाणें–त्याचवेळीं तिला आपल्या आवडत्या तत्त्वांची आठवण आली.

क्षणभर ती स्तब्ध राहिली.

व नंतर मंद स्मित करीत आपल्या प्रतिबिंबाला उद्देशून ती पुटपुटली, “ त्यांत काय हरकत आहे ? मला लग्न करावयाचें नाहीं. मिलिंदकुमारांनाहि विवाह कर्तव्य नाहीं. तेव्हां मतसादृश्यामुळें आमची खात्रीनें मैत्री जुळेल. नि म्हणूनच ते येणार ह्याबद्दल मला एवढा आनंद वाटतो आहे.”

जणूं कांहीं दुसऱ्या कुणा व्यक्तीकडे कैफियत सादर करावी, त्या-प्रमाणें कल्पना आपल्या प्रतिबिंबाला उद्देशून हें बोलली. व मग त्याची मौज वाटून गंमतीनें एक गाणें गुणगुणत ती खोलीबाहेर पडली.

## प्रकरण ९ वें .... .... .... .... मिलिंदकुमार

कुणाहि माणसाला त्यांच्याविषयीं सादर आकर्षण वाटावें असेच मिलिंदकुमार होते. त्यांची उंची उणीपुरी सहा फूट असून बळकट कसदार अवयवांची शोभादायक रुंदीहि तिच्या जोडीला होती.

त्यांचें रूप कांहीं रेखीव नव्हतें. पण मुद्रा तल्लख व तेजस्वी असून डोळे काळेभोर व अतिशय पाणीदार होते. त्यांच्या पातळ निमूळत्या ओठावरून त्यांचा स्वभाव मितभाषणी होता हें दिसून येत होतें. त्यांच्या भिंवया बारीक, लांब व कमानदार होत्या पण त्या बहुशः नेहमीं आकुंचित झालेल्या असत व त्यांच्या भव्य कपाळावर मध्य-भागीं एकादी दुसरी आंठी असेच. त्यामुळें त्यांची मुद्रा हंसतमुख असूनही विचारी दिसे. प्रथमदर्शनींच त्यांच्या विद्वत्तेची छाप लोकांवर पडत असे व त्याचवेळीं त्यांच्याविषयीं सादर भीति वाटे.

कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांशीं खेळीमेळीनें वागणारी व अधिक प्रसंग करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रसंगीं चांगली हजेरी घेणारी कल्पना जात्या धीट होती. पण तिलासुद्धां मिलिंदकुमाराविषयीं अशी सादर भीति

वाटली. शिवाय ते स्त्रीद्वेष्टे आहेत असें मकरंदानें सांगितलें होतें त्याचीहि तिला आठवण होतीच.

परंतु तासाभराच्या संभाषणानंतर तिला कळून आलें कीं, मिलिंद-कुमार मितभाषणी असले, स्त्रीद्वेष्टे असले, बडे विद्वान असले तरी तुटक वृत्तीचे नाहींत किंवा गर्विष्ठहि नाहींत, मात्र बरेच संकोची आहेत. त्यांच्या आवडीचा विषय निघाला म्हणजे ते सुंदर, अस्खलित मुद्देसूद बोलूं शकतात हेंहि कल्पनेला समजून आलें. हा चमत्कार बरीक तिला मकरंदामुळें समजून आला.

बोलतां बोलतां मकरंदानें मध्येंच म्हटलें, " मिलिंद, मनुस्मृति मधील ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' ह्या वचनावर तूं जें भाष्य लढविलें आहेस तें सांग बघूं कल्पनेला सविस्तर. मी एकदां तिला थोडेसें सांगितलें पण तुझ्या सांगण्यांतील गंमत और असते. हं सांग कीं,"

मकरंद असें म्हणाला तरी आपल्या भिडस्त स्वभावानुसार मिलिंद-कुमार कांहींसें संकोचले. व तें पाहून मधूर स्मित करीत कल्पना म्हणाली, " खरंच, आपण अगदीं नवीन अर्थ लाविला हं. विचाराला खूप चालना देण्यासारखा आहे तो अर्थ."

" तुम्हांला असं वाटलं होय ! मी म्हटलं, हा मकरंद आपल्या स्वभावानुसार उगीच अतिशयोक्ति करीत असणार " व एवढ्या प्रस्तावनेनंतर मिलिंदानीं आपल्या मंद, गंभीर आवाजांत तो अर्थ सोप्या शब्दांत सांगून म्हटलें, " हाच अर्थ सयुक्तिक नाहीं कां वाटत ? स्त्रिया स्वतंत्र, एकट्या राहूं शकतील, पण त्यांना एकटं टाकणं हें पुरुषांचें कर्तव्य नव्हे, स्त्रिया स्वतंत्र राहूं शक-

णार नाहींत, त्यांची तेवढी हिंमत नाहीं, किंवा योग्यता नाहीं, त्यांच्या-वर सदैव नजर ठेवायला कुणीतरी पुरुषप्राणी हजर हवाच असाच अर्थ मनुनें सूचित केला आहे हें कशावरून? अर्ह ह्याचा अर्थ योग्यता असणें असा होतो, तेव्हां स्त्रियांची योग्यता एवढी थोर आहे कीं त्यांना एकटे कधीं टाकूं नये. पिता, पति वा पुत्र ह्यांपैकीं कुणी तरी त्यांच्या हांकेला सादर असावें हा अर्थच मला तरी अधिक योग्य वाटतो."

"पण काय रे मिलिन, तूं तर पक्का स्त्रीद्वेष्टा आहेस! आणि असें असून स्त्रियांना मोठेपणा मिळावा म्हणून मनुस्मृतींतील वचनाच्या अर्थाची अशी ओढाताण करण्या इतपत आस्था तुला कशी बुवा वाटली?" मकरंदानें चेष्टा केली.

परंतु ह्यावर गंभीर स्वरांत मिलिंदकुमार उत्तरले, "मकरंदा, तिखट पदार्थांच्या सेवनाचीच आवड असल्यामुळें जर एकाद्याला गोड पक्कानें रुचत नसलीं तर त्यानें त्या गोड पक्कान्नांना कडु म्हटलें पाहिजे असा अट्टाहास धरणें योग्य होईल काय?"

मिलिंदकुमारानें दिलेल्या ह्या उत्तरांतील उपमा व त्यामध्यें ध्वनित केलेली स्त्रियांविषयींची उच्च भावना कल्पनेला फार आवडली, पण ती त्यावर कांहीं बोलली नाहीं.

परंतु मकरंद थोडाच असा गप्प बसणार? त्यानें प्रश्न केला, "म्हणजे? मिलिन, तुला स्त्रियांविषयीं आदर वाटतो तर?"

"अर्थातच! माझ्या परमपूज्य प्रेमळ मातेची स्मृति

जोंवर माझ्या हृदयांत आहे तोंवर स्त्रीजात आदरणीय आहे असेंच मी मानीन."

"मग असें जर आहे तर त्या आदरणीय स्त्रीजातींतील तरुणींवर तुझा एवढा कटाक्ष कां ? तूं विवाह कां करीत नाहींस ?"

मकरंदाचा हा स्पष्ट प्रश्न ऐकून मिलिंदकुमारानें आपले ओंठ गच्च दाबून धरले, त्यांच्या कपाळावरील आंठी आणखीच उठून दिसूं लागली व त्यांच्या भिंवयाहि आणखी आकुंचित झाल्या.

कल्पना त्यांच्याकडेच लक्षपूर्वक पहात असल्यामुळें त्यांच्या मुद्रे-वरील हे फेरफार तिच्या लगेच लक्ष्यांत आले. आतां रागानें ते कांहीं तरी बोलणार कीं काय अशी तिला भीति वाटली.

आणि तिची ही भीति अकारण नव्हती. आज प्रथमच भेट झालेल्या एका अविवाहित तरुणीसमोर कल्पनेसमोर मकरंदानें आपल्या विवाहाचा असा ऊहापोह करावा हें मिलिंदाना मुळींच आवडलें नाहीं, पण ते खरे सुसंस्कृत व सभ्य होते. त्यांनीं चट्दिशीं आपला राग आंवरला व हंसल्यासारखें करीत म्हटलें, "मकरंद, विवाहा-सारख्या वैयक्तिक विषयाची चर्चा चार मंडळींत कधीं करूं नये."

एवढेंच बोलून ते झट्दिशीं कल्पनेकडे वळून म्हणाले, "आपण शाळेंत कोणते विषय शिकवितां बरं ?"

मृदु स्मित करीत कल्पना उत्तरली, "मीं इंग्रजी, संस्कृत व मराठी ह्या तिन्ही भाषा शिकविते."

मकरंदाला मिलिंदांनीं आतां दिलेलें उत्तर ऐकून आपल्याला अवघडल्यासारखें झालें असल्यास ती भावना दूर व्हावी म्हणून त्यांनीं

आतां मुद्दाम आपल्याशीं प्रत्यक्ष बोलावयाला सुरुवात केली हें ओळखून कल्पनेला मौज वाटली. त्यांच्या वागण्यांतील हें मनो-दाक्षिण्य तिला मोहक वाटलें.

तिनें मग बऱ्याच मोकळेपणानें मिलिंदांना आपल्या शाळेविषयीं माहिती सांगितली. लहान मुलींना शिकवितांना कांहीं वेळां किती कमालीची शांत, धिम्मी वृत्ति राखावी लागते हें सांगतेवेळीं त्या आठवणीनें कल्पनेची मुद्रा इतकी मजेशीर दिसली कीं मिलिंदकुमार खूप मोठ्यांदा हंसले व हंसतच म्हणाले, " आणि पहिल्या दिवशीं शिकवितांना खूप तारांबळ उडाली कीं नाहीं तुमची ! "

आपल्या हंसऱ्या ओंठांवर उजव्या हाताचीं दोन बोटें टेंकवीत कल्पना उत्तरली, " होय ना, पहिल्या दिवशीं इंग्रजी चौथ्या इयत्तेला शिकवावें लागलें तरी केवढी घाबरून गेलें होतें मीं. पण आपल्याला हें बरोबर कसं कळून आलं ! "

" मीं शिक्षकाचा धंदा केला आहे कीं दोन महिने. पुण्याला XXX हायस्कुलमध्यें मॅट्रिकच्या वर्गाला इंग्रजी शिकविण्याचा प्रसंग माझ्यावर आला. आणि, अरे बापरे ! पहिल्या दिवशीं माझी अशी त्रेधा उडाली म्हणतां ! त्यांना शिकविण्याचा धडा मीं घरीं दोन वेळां वाचला होता. त्यांत एक शब्दहि मला कठीण वाटत नव्हता. पण तरीसुद्धां वर्गांत पाऊल ठेवितांच मीं कमालीचा घाबरून गेलों. मुलांना माझें शिकविणें फार आवडलें म्हणे ! पण त्या दिवशीं शिकवून मीं वर्गाबाहेर पडलों तेव्हां माझा शर्ट घामानें ओलाचिंब झाला होता म्हणजे बघा ! "

मिलिंदकुमारांच्या ह्या अनुभवानें व तो सांगतेवेळीं त्यांनीं केलेल्या भयभीत आविर्भावानें कल्पनेला मनस्वी हंसू कोसळलें.

मकरंदालाहि अर्थात्च हंसू आलें. पण त्याच्या हास्यांत विस्मयाचा अंश अधिक होता. मिलिंदकुमाराला इतकें सहजां हंसतां बोलतांना व तेंहि एका नूतन परिचित, अविवाहित तरूणिकडे हंसतां बोलतांना पाहून मकरंदाला अतिशय नवल वाटलें. पण त्याला तितकाच आनंदहि झाल्यामुळें तो त्याबद्दल उघड कांहींच बोलला नाहीं.

कल्पनेशीं लग्न करूं इच्छिणाऱ्या कांहीं चांगल्या, चांगल्या तरूणांची त्यानें आजपर्यंत तिच्याशीं ओळख करून दिली होती. पण त्यापासून कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण ते तरूण विवाहेच्छु होते. तरी कल्पना अविवाहेच्छू होती.

आतां कल्पना व मिलिंदकुमार हीं दोघेंहि अविवाहेच्छू असल्यामुळें कदाचित् त्यांचा विवाह जमेलहि असा विचार मनांत आल्याकारणानें तो त्या बाबतींत गप्प राहिला तरी शक्य असल्यास मिलिंदाचे आपल्या घरीं दळणवळण वाढावें ह्या हेतूनें तो म्हणाला, " मिलिंद, आज एम्पायरमध्यें रोनाल्ड कोलमन्‌ची प्रिझनर ऑफ झेंडा ही सुंदर फिल्म लागली आहे, चलायचं काय ? अं ! जाऊं या सगळी मजेनें. "

मकरंदाच्या ह्या निमंत्रणावर मिलिंद कांहींच बोलले नाहींत. ते स्वतःशींच कांहींतरी विचार करीत होते. त्यांच्या कपाळावरील आंठ्यांत आणखी एकाद्या दुसऱ्या आंठीची भर पडली व त्यांनीं

आपले ओंठहि शक्य तर आणखीच दाबून धरले असें कल्पनेला वाटलें.

दोन, चार क्षण स्तब्ध राहून मिलिंद दिलगिरीच्या स्वरांत उत्तरले, " सॉरी, मकरंद, मला नाहीं बुवा येतां येणार. मला आज जरा दुसरीकडे काम आहे. पण तुम्ही मंडळी जा कीं अवश्य. "

मिलिंद हें बोलत असतां कल्पनेची त्यांच्या चर्येकडे नजर होती. बोलतांना मध्येंच क्षणभर त्यांची चर्या निर्विकार, कठोर बनली हें तिनें पाहिलें. व तिच्या मनांत आलें, श्मश्रुविहीन चेहरा असूनहि एकाद्या वेळीं ह्यांची मुद्रा इतकी कठोर, उग्र दिसते, मग ओंठावर मिशा विराजल्या असल्या तर अशा वेळीं मुद्रा किती उग्र, भीति-दायक वाटली असती ?—

पण असा विचार मनांत आला असूनहि ती मिलिंदांना चट्-दिशीं म्हणाली, " आजच सिनेमाला जायचं काय नडलंय् ? उद्यां, परवां जाऊं या कीं. उद्यां याल आपण ? "

कल्पना मिलिंदांना असा आग्रह करील असें मकरंदाला मुळींच वाटलें नव्हतें. त्यामुळें तो फार चकित झाला. मात्र आतां ते राजश्री ह्यावर काय उत्तर देतात अशी त्याला थोडी धाकधूक वाटली.

पण मिलिंदकुमारांची ह्या बाबतींत खरी इच्छा काय असेल ती असो. त्यांनीं कांहींशा रुक्ष स्वरांत कां होईना, पण दुसऱ्या दिवशीं सिनेमाला जाण्याचें कबूल केलें. व तें ऐकून मकरंदाला फार गंमत वाटली. परंतु मिलिंदाकुमारांचा कांहींसा तऱ्हेवाईक, हेकट स्वभाव

तो ओळखीत असल्यामुळें त्यानें आत्मसंयमन करून मिलिंदांना चिडविण्याचा मोह दूर सारला.

व्यक्ति तितक्या प्रकृति अशी म्हण कांहीं उगीच नाहीं पडलेली ! खरोखरीच प्रत्येक व्यक्तीची प्रकृति म्हणजे मानसिक प्रकृति भिन्न, भिन्न असते !—

कांहीं माणसांना मुळीं स्वतःची बुद्धीच नसते. 'परप्रत्ययनेय-बुद्धि'वाले, दुसऱ्याच्या बुद्धीनें चालणारे असतात हे लोक ! तर कांहीं व्यक्ति 'ऐकावें जनाचें पण करावें मनाचें' ह्या सदरांतील असतात. आणि तिसरे कांहीं 'कर–न करी' वृत्तीचे असतात !

मिलिंदकुमार आणि कल्पना ही दोघेंहि ह्या शेवटल्या सदरांतील होती. व मकरंदानें हें ओळखलें असल्यामुळें त्यांच्या बाबतींत तटस्थ-वृत्ति धारण करण्याचें त्यानें ठरविलें. व आपल्या आई, वडिलांना आणि मोहिनीलाहि हेंच धोरण स्वीकारण्याबद्दल बजाविलें.

## प्रकरण ६ वें : .... .... .... निर्हेतुक मैत्री !

आणि मकरंदानें एवढी काळजी घेतली म्हणूनच कल्पनेची व मिलिंदकुमाराची मैत्री भराभर वाढली.

कारण आपल्या ह्या मैत्रींत विवाहाचा कांहीं संबंध नाहीं; तरुण-तरुणामध्यें किंवा तरुणी-तरुणीमध्यें असतें तशी ही निर्हेतुक मैत्री आहे असेंच हीं दोघें आपापल्या हृदयांना बजावीत होतीं.

मिलिंदकुमारांचा विवाह करावयाचा विचारच नाहीं अशी मकरंदानें कल्पनेला खात्री दिली होती व कल्पना आजन्म अविवाहित रहाणार आहे असा त्यानें मिलिंदांना निर्वाळा दिला होता. तेव्हां ह्या मैत्रीपासून आपल्या तत्वांना मुळींच धोका नाहीं अशा समजुतीनें कल्पना व मिलिंद निर्धास्त होतीं.

त्या दोघांनीं एकदां सुद्धां आपल्या अंतःकरणांतील भावनांची छाननी केली नाहीं. आपल्या बुद्धीनें विवाह न करण्याचें ठरविलें आहे ह्या विश्वासावर त्यांनीं आपल्या हृदयांकडे लक्षहि दिलें नाहीं.

परंतु अशा रीतीनें हीं दोघें आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळत असलीं तरी मकरंद उघड्या डोळ्यांनीं वस्तुस्थिति पहात

असल्यामुळें एकमेकांच्या आवडीनावडी हीं दोघें कशीं तत्परतेनें झेलत असतात हें त्याला नीट दिसत होतें. व तें पाहून त्याला फार मजा वाटे.

वेळोवेळीं त्या दोघांना चिडविण्याचा मोह त्याला अनावर होई. पण दोघांच्याही लहरी वृत्तीची माहिती असल्यामुळें तो अगदीं गप्प राही. मात्र असले प्रसंग मुद्दाम घडवून आणण्याची आवड त्याला दूर सारतां येत नसे.

असेंच एक दिवस मिलिंदकुमाराची व कल्पनेची ओळख झाल्यानंतर सुमारें महिन्याभरानें मिलिंदकुमार संध्याकाळीं त्यांच्या घरीं आले होते. त्याच्या जरा आधीं मोहिनीकडे बोलतांना कशा-वरून तरी गोष्ट निघून मिलिंदांना तिखटमीठाच्या पदार्थांपेक्षां गोडाचे पदार्थ जास्ती आवडतात असें मकरंदानें सहज म्हटलें होतें. व आतां त्याची आठवण येऊन त्यानें कल्पनेला म्हटलें, " काय ग, चहाबरोबर खावयाला काय करतो आहे नारायण ? "

" सुंदरसे बटाटेपोहे करावयाला सांगितलें आहे मी."

नाक खळवटून मकरंद उद्गारला, "उं: ! तिखटमीठाचा पदार्थ?"

त्यावर कल्पना म्हणाली, " मग काय तर, शामळू गुजराथ्या-प्रमाणें सदा गोडच खावयाचं ! तिखटमीठाचे पदार्थ गोड पदार्था-पेक्षां कितीतरी खमंग व स्वादिष्ट लागतात. " व मिलिंदाकडे वळून तिनें विचारलें, " तुम्हाला काय वाटतं ? तिखट जिनसाच अधिक रुचकर असंच माझ्याप्रमाणें वाटतं ना तुम्हांला ? "

त्यावर मिलिंदकुमारांनीं चटदिशीं उत्तर दिलें, " होय तर,

तिखट जिनसाच अधिक स्वादिष्ट. मला गोडापेक्षां तिखटाचीच आवड अधिक आहे."

आणि त्याचें हें अजब उत्तर ऐकून मकरंद थक्कच झाला. हाच मिलिंदकुमार स्त्रीद्वेष्टा म्हणून प्रसिद्ध होता ना ? आणि स्वतःला वस्तुतः मुळींच न रुचणाऱ्या वस्तूंबद्दल त्यानें स्त्रीदाक्षिण्याखातर आवड व्यक्त करावी ! कल्पनेच्या आवडीनावडीविषयीं त्याला इतकी कदर वाटावी !

जेवणाला चपातीबरोबर केळ्यांची शिकरण, मुरंबा किंवा निदान तूपसाखर तरी असल्याशिवाय ज्याचें चालत नाहीं त्या मिलिंदानें कल्पनेसारख्या गोड तरुणीवर भुलून गेल्यामुळें गोड पदार्थांबद्दल अशी अनासक्ति व्यक्त केली काय !

मिलिंदाचें हें उत्तर ऐकून मकरंदाला जेवढें आश्चर्य तेवढीच मौज वाटली.

हीच नव्हे तर अशा कित्येक मौजा मकरंदाला हल्लीं रोज आढळूं लागल्या. हल्लीं मिलिंदकुमार रोज संध्याकाळीं त्यांच्या घरीं येत व मग चहापान झाल्यावर तीं दोघें व मकरंद अशीं तिघें पायीं फिरावयास जात.

अण्णासाहेब रहात होते तो बंगला चौपाटीवर समुद्राभिमुख होता. चौपाटीवर गर्दी फार व फिरण्याची ती जागाहि फार नजी-कची म्हणून हीं तिघें रोज हँगिंग गार्डनस्मध्यें जात.

मोहिनी गर्भवती असून तिला सध्यां सातवा महिना अस-ल्यामुळें उमाबाईनीं तिला डोंगरावर फिरावयास जाण्याची मनाई

केली होती. त्यामुळें मकरंदहि आपलें फिरणें बंद करणार होता. पण मोहिनीनें म्हटलें, " हें काय ? आपण जर फिरावयाला बरोबर नसला तर वन्सं नि मिलिंदकुमार कसे जातील ? "

" न जावयाला काय झालं ! बरी तासन् तास गप्पा मारीत असतात. परस्परांच्या आवडीनुसार तोलून, मापून बोलण्यामध्यें इतकीं गढून जातात तीं कीं, माझ्या अस्तित्वाची त्यांना जणूं जाणीवच नसते. "

" तरी पण, मी सागतें तें ऐकावं. आपण बरोबर नसलां तर तीं दोघं बाहेर पडणार नाहींत. तेव्हां आपण जात जावं. हवं असल्यास रात्रीं जेवण झाल्यावर आपण दोघं समुद्रकिनाऱ्यावर हिंडूं जरा. "

इतक्या गोड रीतीनें मोहिनीनें सांगितल्यामुळें मकरंदाची समजूत पडली. शिवाय, एक दिवस ऑफिसांतून यावयाला आपल्याला खूपच उशीर झाल्यामुळें कल्पना व मिलिंद फिरावयास न जातां तशींच घरीं घुटमळत राहिलीं होतीं हेंहि त्याच्या लक्षांत आलें. व कल्पनेवर त्याचें फार प्रेम असल्यामुळें मोहिनी घरीं असतां आपण फिरावयास जाण्याचें दिव्य करावयास तो तयार झाला.

बाकी कल्पना व मिलिंद यांच्याबरोबर फिरावयास जाण्यांत किंवा त्यांच्या गप्पा ऐकण्यांत मकरंदाच्या विनोदी स्वभावाला खूप गंमत वाटे. कारण कल्पना व मिलिंद एकमेकांचा मनोनुनय करण्यामध्यें गुंतल्यामुळें इतका मजेशीर धरसोडपणा करीत व परस्परविरोधी बोलत कीं, त्यामुळें मकरंदाचें खूपच मनोरंजन होई.

असेंच एकदां शेक्सपिअरच्या सुखान्त व दुःखान्त नाटकाबद्दल बोलणें निघाले.

मकरंद इंटर सायन्सच्या वर्गांत व मिलिंद इंटर आर्टसच्या वर्गांत असतांना मराठी वाङ्मय मंडळाच्या सभेमध्यें मिलिंदकुमारांनीं शेक्सपिअरच्या दुःखान्त नाटकांची फार सुंदर व मुद्देसूद स्तुति व तरफदारी केली होती. त्यांतील कांहीं मुद्यांची आतां आठवण होऊन मकरंद कल्पनेला म्हणाला, "कल्पने, तूं शेक्सपिअरच्या सुखांत नाटकांची बाजू उचलून धरते आहेस खरी पण निव्वळ छायेला कवटाळण्यासारखें आहे तें."

"म्हणजे रे काय दादा?"

"अग, जगामध्यें दुःख आहे म्हणून सुखाला किंमत आहे. तेव्हां दुःख हें प्रकाशासारखें आहे आणि सुख म्हणजे प्रकाशाचा अभाव–छाया!" आपल्या वक्तृत्वामध्यें मिलिंदकुमारांनीं असलाच कांहींतरी मुद्दा योजला होता हें अर्धवट आठवून मकरंद म्हणाला.

त्यावर कल्पना म्हणाली, "वाः दादासाहेब, मग तुमचेंच बोलणें फिरवून असें नाहीं कां म्हणतां येणार कीं, प्रकाश म्हणजे छायेचा अभाव. छाया असते म्हणून प्रकाशाला किंमत लाभते. तेव्हां सुख आहे म्हणून माणसांना दुःखाची तमा वाटते!"

कॉलेजांतील वक्तृत्वसभेंत सडेतोड वाटलेला मिलिंदकुमाराचा मुद्दा मांडतांना आपलें कुठें तरी चुकलें असें वाटून मिलिंदकुमाराला याबद्दल काय वाटलें तें पहाण्यासाठीं मकरंदानें त्याच्याकडे वळून बघितलें.

पण काय ! मिलिंदाचें मकरंदाकडे किंवा मकरंदाच्या भाषणाकडे मुळीं लक्षच नव्हतें. हंसरी मुद्रा करून तो कल्पनेच्या मुखचंद्राकडे पहात होता.

एक कृत्रिम निःश्वास सोडून मकरंदानें कल्पनेकडे बघितलें. त्याबरोबर ती म्हणाली, " हं महाराज, ऐकूं द्या कीं, आपले पुढले मुद्दे. "

" सांगतों कीं, जरा थांब, " असें म्हणून पूर्वीं ऐकलेल्या मिलिंदाच्या भाषणांतील आणखी मुद्दे मकरंद आठवूं लागला त्याला एक मुद्दा चटदिशीं आठवला सुद्धां.

विजयी मुद्रेनें तो म्हणाला, "कल्पने, दुःखान्त लिखाण आपल्या मनावर अधिक खोल व चिरस्थायी परिणाम करतें. शिवाय जगामध्यें 'सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें' असेंच आपल्याला आढळून येतें. तेव्हां जगांतील दुखःप्रधान घटनांचें चित्र ज्यांत काढलेलें आहे असें दुःखान्त लिखाणच आपल्या अंतःकरणाला अधिक भिडतें. दुःखान्त लिखाणच त्यामुळें अधिक टिकाऊ ठरणार।"

मिलिंदकुमारानीं पूर्वीं सर्व श्रोतृवृंदाला उत्तम रीतीनें पटविलेला हा मुद्दा मकरंदानें आतां जवळ जवळ त्यांच्याच शब्दांत मांडला.

मिलिंदकुमार पक्के निराशावादी होते. जगामध्यें खरोखरीच सुख जवापाडें असून दुःख मात्र पर्वताएवढें आहे असें त्यांना वाटत असे. ते ४।५ वर्षांचे असतांना त्यांची आई वारली. व वडिलांचें दुर्लक्ष्य आणि वर्षाभरांतच घरीं प्रस्थापित झालेल्या सावत्र आईची होणारी

निष्प्रेम वर्तणूक ह्याचा त्यांच्या बालमनावर अतिशय परिणाम झाल्या-मुळें त्यांचें अंतःकरण कठोर, रुक्ष बनलें हें मकरंदाला ठाऊक होतें.

तारुण्यसुलभ मजा किंवा आनंद करण्याची आवड मिलिंदांच्या हृदयाला कधींच वाटत नाहीं, त्यांचें हृदय त्या बाबतींत निरसलेलें आहे हेंहि मकरंदाला माहिती होतें.

त्यामुळें ह्या बाबतींत तरी मिलिंदांचा व कल्पनेचा खास मतभेद होणार असें त्याला वाटलें.

कारण कल्पना पक्की आशावादी होती. कल्पना म्हणजे जणूं सदा आनंदी, सदा उत्साही फुलपांखरूं. तेव्हां सुखान्त लिखाणाची आवड तिला वाटावी हें साहजिक होतें. त्याचप्रमाणें मिलिंदकुमारांच्या स्वभावानुसार त्यांच्या अकालवृद्ध वृत्तीला दुःखान्त लिखाणच रुचावें हेंहि साहजिकच होतें.

अशा रीतीनें ह्या दोघांची ह्या बाबतींतील परस्परविरुद्ध वृत्ति नीट ठाऊक असल्यामुळें आतां त्यांचा कसा मतभेद होतो हें पहा-वयास मकरंद उत्सुक झाला.

त्याच्या भाषणावर कल्पनेनें लगेच उत्तर न दिल्यामुळें तिला आपले मुद्दे बिनतोड वाटले असें समजून तो पुनः त्यांचा जोरानें उच्चार करणार इतक्यांत कल्पना म्हणाली, " दादा, जगांत सुखा-पेक्षां दुःखच अधिक असें म्हणतोस ना तूं ? ठीक आहे. आपण तसंच धरूं या. पण म्हणूनच माझं म्हणणं असं आहे कीं, मनुष्यमात्राला आपापल्या दुःखाचा जरा तरी विसर पाडण्यासाठींच सुखान्त लिखा-णाची आवश्यकता आहे. दुःखी, कष्टी जीवाला सुखान्त नाटकाच्या

किंवा कादंबरीच्या वाचनानें किंचित् तरी विरंगुळा वाटतो. दादा, पडलेल्याला मारूं नये म्हणतात हें ठाऊक आहे ना तुला? मग तोच न्याय इथेंहि लागूं करावयाचा. आधींच दुःखाच्या गर्तेत पडलेल्या जीवांना दुःखी जीवनाचेंच चित्र दाखवून आणखी दुःखी करण्यांत कसला मनुष्यपणा नि कसली सयुक्तता? पण तसं कशाला दादा, आपण मिलिंदकुमारांचें मत विचारूं या ना."

मकरंदालाहि तेंच हवें होतें. त्यानें कल्पनेच्या ह्या विचाराला माननेंच संमति दिली.

त्याबरोबर कल्पना मिलिंदकुमाराकडे वळली व त्यांनीं आपल्याच बाजूनें निकाल द्यावा ह्या इच्छेनें त्यांच्याकडे मोहकपणें हंसून पहात ती म्हणाली,

"आतां सांगा बरं आपलं मत. आपल्याला शेक्सपिअरची दुःखान्त नाटकें आवडतात कीं सुखान्त नाटकें आवडतात? 'रोमिओ अँड ज्युलिएट,' 'ऑथेल्लो,' 'ज्यूलियस सीझर' वगैरे शोकपर्यावसायी नाटकें वाचून मनावर विषण्णतेचें दडपण पाडावयाला आवडतें कीं, 'ए मिड्समर नाइट्स्, ड्रीम' 'ए कॉमेडी ऑफ एरर्स,' 'टेमींग ऑफ दि श्रू' ह्यासारखीं विनोदी नाटकें वाचून मन उल्हसित व्हावें असें वाटतं? अं! कोणतीं नाटकें आवडतात आपल्याला?";

मोठ्या हुरूपानें कल्पना हें बोलत असतां मिलिंदकुमार ज्या एकाग्रतेनें तिच्याकडे पहात होते ती लक्षांत घेतां ते खात्रीनें आपल्या मतांवरं आतां तिलांजलि देणार हें मकरंदानें ओळखलें. व

त्यामुळें मिलिंदकुमारांनीं मोठ्या तत्परतेनें, "मलासुद्धां शेक्सपिअरची सुखान्त नाटकेंच आवडतात" असें उत्तर देतांच त्याला अतिशय हंसू आलें. आणि कल्पनेचें किंवा मिलिंदांचें त्याच्याकडे मुळींच लक्ष नसल्यामुळें त्याला आपलें हंसूं सहज आवरतां आलें.

त्यानंतर असाच एकदां गवई लोकांच्या शास्त्रोक्त गायनाबद्दल प्रश्न निघाला.

मिलिंदकुमार गाण्याचे अतिशय शोकी होते. ते चटदिशीं म्हणाले, "गाणें ऐकावयाचें तर खानदानी गवयांचेंच ऐकावें. बरोबर तंबोऱ्याचा नाद आणि तबल्याची सांथ असलेलें गाणें म्हण-जेच खरें गाणें नाहींतर ना ताल ना सूर असलीं गाणीं काय ऐका-वयाचीं ? अं ! तुमचं मत असंच आहे ना ?"

मिलिंदकुमारानीं कल्पनेला हा प्रश्न करितांच मकरंदाला फार गंमत वाटली. कारण कल्पनेला गाण्याची मुळींच आवड नाहीं; विशेषतः तालसुरयुक्त गवई पद्धतीच्या गाण्याचा तर तिला कंटाळाच आहे हें त्याला ठाऊक होतें. आवाजाच्या नैसर्गिक माधुरीमुळें हिरा-बाईचें गाणें मात्र कल्पनेला आवडतें आणि मिलिंदकुमारांनीं तर कल्पनेच्या मतें जाडे, भरडे आवाज असलेल्या मुसलमान व हिंदु गवयांची तारीफ केलेली. तेव्हां कल्पना ह्यावर उत्तर काय देणार ?

पण मकरंदाला हा प्रश्न पडला तरी कल्पनेला तो मुळींच पडला नाहीं. मकरंदाच्या नजरेला नजर देण्याचें बरीक तिनें साफ टाळलें व ती मिलिंदकुमारांना म्हणाली, "होय बाई, मलासुद्धां शास्त्रीय पद्धतीचं गाणं फार आवडतं. पण मला तसलं गाणं नाहीं येत."

# निर्हेतुक मैत्री?

“ मग त्यांत कुठें चुकलं? माझं मत तर असंच आहे कीं, शास्त्रशुद्ध गाणं हें आपण गावयाचं नसतं, बड्या गवयांनीं गायलेलं आपण ऐकावयाचं असतं ! ” व मिलिंदकुमारानीं केलेल्या ह्या विनोदावर तीं दोघेंहि मनापासून हंसलीं.

आणि तें पाहून मकरंद ह्या दोघांना मनांतल्या मनांत हंसला. बाकी, नाटकें, गायन, काव्य, सिनेमा वगैरे हरेक विषयासंबंधीं एकमत करण्यासाठीं त्या दोघांची ही धडपड पाहून मकरंदाला हंसूं येत असे; तरी तितकाच आनंदहि होत असे.

व म्हणून त्यामध्यें आपण प्रत्यक्ष भाग न घेतां जेव्हां तशी गरज भासेल तेव्हांच तो ह्या त्यांच्या धरसोडीला धडपडीला हातभार लावीत असे.

## प्रकरण ७ वें .... .... .... अपेक्षा ढांसळली !

अशा रीतीनें ४-५ महिनें गेले. मिलिंदकुमारांनीं रोज संध्याकाळीं मकरंदाच्या घरीं यावयाचें हा आतां ३।३॥ महिनें नित्यक्रमच झाला होता.

मोहिनी बाळंतपणासाठीं माहेरी सोलापूराला गेली असल्यामुळें हल्लीं मकरंद ह्या सायंक्रमामध्यें मनापासून भाग घेत असे.

आणि एक दिवस सकाळीं उठल्याबरोबरच कल्पनेला थंडी भरून ताप आला. ताप एकाएकीं आला तसाच एकाएकीं जावा अशी कल्पनेची भारी इच्छा होती. कारण सायंकाळचा फिरण्याचा कार्य-क्रम चुकूं नये असें तिला वाटत होतें.

पण तो ताप बेटा अगदींच अरसिक ! मिलिंदकुमार येण्याच्या वेळीं कमी होण्याऐवजीं तो वाढलाच. व त्यामुळें कल्पना नाराज होऊन स्वतःशींच फुरंगटली. आणि एवढ्यांत तिच्या मनांत विचार आला, आपण आजारी असल्यामुळें मिलिंदकुमार फिरण्याचा कार्यक्रम खास रहित करतील व दादा आणि ते आपल्याकडे गप्पा मारीत बसतील.

ह्या विचार मनांत येतांच कल्पनेला जरा बरें वाटलें.

नेहमींप्रमाणें संध्याकाळीं ६। वाजतां मिलिंदकुमार आले व नेहमींप्रमाणें रस्त्यावरूनच कल्पनेची नजरानजर होईल ह्या अपेक्षेनें त्यांनीं वरती गॅलरींत बघितलें. पण त्या रोजच्या ठिकाणीं कल्पना न दिसतांच त्यांना चुकल्यासारखें वाटलें; व तसें वाटतांच त्यांच्या मनाला मोठाच धक्का बसला.

कल्पनेची व त्यांची रोज भेट होत असल्यामुळें तिच्या भेटीची आपल्या मनाला वास्तविक किती ओढ वाटत असतें हें मिलिंदाच्या ध्यानांत आलें नव्हतें. आणि आतां अशा आकस्मिक रीतीनें तें ध्यानांत येतांच त्यांना चमत्कारिकच झालें.

सत्याकडे डोळेझांक करण्याची संवय लावून घेतली असली म्हणजे अकस्मात् सत्याचें दर्शन झालें कीं डोळे साहजिकच दिपून जातात.

मिलिंदकुमारांची स्थिति अशीच झाली. सत्याच्या दर्शनानें त्यांचे डोळे दिपलें. व त्यामुळें कावरेबावरे होऊन ते दिवाणखान्यांत अस्वस्थ मनानें येरझाऱ्या घालूं लागले.

५।१० मिनिटांच्या आंत मकरंद तेथें आला व काळजीयुक्त स्वरांत म्हणाला, “ मिलिन, कल्पनेला ताप आला आहे रे. आतां १०३ आहे. रात्रीपर्यंत उतरतोय कीं नाहीं कोण जाणें !”

मकरंदाच्या ह्या शब्दांनीं मिलिंदकुमार फार अस्वस्थ झाले.

कल्पनेविषयीं आपल्याला निव्वळ स्नेह वाटतो आहे ही आपली समजूत अगदीं फोल आहे हें त्याच्या ध्यानांत आल्यामुळें त्यांना

स्वतःचा फार राग आला. असला हा दुर्बळपणा तिरस्करणीय आहे असें त्यांनीं लगेच स्वतःच्या मनाला धमकाविलें.

त्यांच्या चर्येवर होणारे हे फेरफार मकरंदाच्या लक्षांत आले. व त्यांचा आपल्याला अनुकूल असा अर्थ लावीत तो सलगीच्या स्वरांत म्हणाला, " मिलिन, येतोस आंत कल्पनेला पहावयाला ?"

मकरंदानें किती हंसून, प्रेमळपणें ही सूचना केली. पण मिलिंदकुमार अगदीं तुटक स्वरांत उत्तरले, "अंह ! नाहीं बुवा. मला दुसरीकडे जावयाचे आहे. अं—अं आज मला फिरावयाला येण्याचे जमणार नाहीं असें कळवावयालाच आलों होतों मी."

मिलिंकुमारांचें हें उत्तर ऐकून मकरंदाला फार राग आला.

आज जवळजवळ पांच महिने मिलिंद आपल्या घरीं येत आहे. त्याच्या व कल्पनेच्या लग्नाविषयीं कुणी उघड बोललें नसलें तरी आपल्या सामाजिक पद्धतीनुसार अविवाहित तरुण—तरुणींचा नुसता निर्हेतूक स्नेह क्वचितच दिसून येतो. त्या स्नेहाची विवाहांतच परिणति होत असते ! आणि असें असून मिलिंद कल्पनेविषयीं इतकी बेपर्वाई दाखवितो ?

मकरंदाला भान राहिलें नाहीं. मिलिंदकुमाराकडे स्पष्ट बोलून टाकणें इष्ट कीं अनिष्ट ह्याचा विचार करण्यासहि न थांबतां तो खोंचक स्वरांत म्हणाला, " म्हणजे, मिलिंद, ह्याचा अर्थ काय ? कल्पना आजारी आहे हें कळलें असून तिचा समाचार घेण्याचीसुद्धां तुला पर्वा वाटत नाहीं ?"

" मकरंद, कल्पना अविवाहित तरुणी आहे. ती आजारी

असतां माझ्यासारख्या त्रयस्थ तरुणानें तिच्या शय्यागृहांत जाणें गैर नाहीं कां दिसणार ?" नेहमींच्या संथ स्वरांत मिलिंदकुमार उत्तरले.

" असं ? आणि कल्पनेबरोबर हिंडायला जाणें नाहीं कां गैर दिसत ?"

" वा: ! अरे, आम्ही दोघेच कधी तरी जात होतो काय ? मी तुझ्याबरोबर जात होतो नि तूं आपल्या बहिणीला आपल्या बरोबर आणीत होतास. सिनेमाला जाण्याच्या बाबतींतहि तसेंच झालें. तूं मला सिनेमा पहावयाला नेलेंस, तेव्हां मला त्याची. परत-फेड करणें भाग पडलें. व म्हणून जितक्या वेळा तूं मला नेलेंस तितक्या वेळां मी तुला व तुझ्या बहिणीला नेलें.

मिलिंदकुमाराच्या ह्या तर्कपद्धतीची व शिष्टाशिष्टत्व विचारसरणीची मकरंदाला भारी चीड आली. रागाच्या भरांत तो अपशब्द उच्चार-णार होता पण तेवढ्यांत त्यानें मन आवरलें.

मिलिंदकुमार अहंमन्य असला, हेकेखोर तिरसट असला तरी खरा सभ्य गृहस्थ आहे हें त्याला ठाऊक होतें. प्रेमाच्या नांवाखालीं कांहीं पुरुष तरुण मुलींना आपल्या नादी लावतात व नंतर आपण जणूं त्या गांवचे नसल्याचा आंव आणतात. परंतु मिलिंदकुमार असल्या हृदयशून्य पशूंच्या वर्गातील नाहीं ही मकरंदाची खात्री होती.

पण हा मिलिंदाचा आडमुठेपणा कसला ? त्यांच्या ह्या रुक्ष, अनैसर्गिक वृत्तीचे मकरंदाला आकलनच होईना !

कल्पना त्याची बहीण होती म्हणून नव्हे, ती इतर कुणाची बहीण असती तरीहि, रूप, गुण, विद्वत्ता, स्वभाव वगैरे सर्व बाजूंनी

कुणाहि अविवाहित तरुणाला विलोभनीय वाटण्यासारखीच ती आहे हें मकरंद ओळखीत होता. मग असें असतां, आजवर अनुकूल वाटणाऱ्या मिलिंदकुमाराच्या भावनांनीं आतांच अशी कलाटणी कां घेतली ?

मकरंद व्यवहारचतुर व मनुष्यस्वभावाची पारख करण्यांत हुषार होता तसा थोडासा मानसशास्त्रज्ञहि होता. पण कठीण गणलेल्या गणितशास्त्रांतील गुंतागुंतसुद्धां मानशास्त्रांतील गुंतागुंतीपेक्षां सोपी असते !

आतां मिलिंदकुमारांच्या मनोभावनांमध्यें अशीच विचित्र गुंतागुंत झाली होती. त्यांच्या भावनांना आडवेतिडवे पीळ पडले होते. आणि मौज अशी कीं, आपल्या भावनांची ही गुंतागुंत जिथें प्रत्यक्ष मिलिंदकुमारांनाही नीटशी कळून आली नव्हती तिथें मकरंदाला ती कशी कळणार !

त्यामुळें मकरंदाला मिलिंदकुमाराच्या ह्या अजब वर्तनाचा साहजिकच राग आला व त्या भरांत तो म्हणाला, " मग मिलिंद् तुझा विचार तरी काय आहे ? कल्पनेशीं तूं विवाह करणार आहेस कीं नाहीं ?"

" विवाह ? नाहीं बुवा. माझा विवाह करण्याचा विचारच नाहीं. मकरंद, असा रागावूं नकोस. पण माझा हा विचार तुला पूर्वीपासूनच ठाऊक होता. मला तशीच समर्पक कारणेंहि आहेत."

" कारणें ? कसलीं कारणें ! ऐकूं दे तरी ती एकदां."

" मकरंद, मी अहंमन्य आहे असें समजूं नकोस. पण बघ, विवाहेच्छू तरुणींच्या दृष्टीनें मी स्पृहणीय वर असल्यामुळें माझी

ओळख झाल्याक्षणींच माझ्याशीं विवाह करण्याची आवड त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न होते. म्हणजे त्यांना मी ह्या व्यक्तीबद्दल आकर्षण न वाटतां माझ्या बाह्य आवरणावरच त्या भुलतात. अर्थांतच, त्यांना माझ्याविषयीं खरें प्रेम मुळींच वाटत नाहीं. केवळ, हा सुस्थितींतील देखणा, विद्वान तरुण आहे; ह्याच्याशीं विवाह केल्यानें समाजांत आपल्याला चांगला मान मिळेल ह्याच विचाराचा पगडा त्यांच्या मनावर असतो ! आणि हेंच मला पसंत नाहीं. माझ्या त्रासिक लहरी मनःस्थितीची ओळख पटूनहि, माझ्या अंगांतील दोषांची नीट माहिती असूनही ज्या तरूणीला मी हवासा वाटेन तिच्याशींच मी लग्न करीन."

मिलिंदकुमारांचें हें लांबलचक स्पष्टीकरण ऐकून मकरंदाचा राग बराचसा निवळला. मात्र रागाऐवजीं त्याला आतां मिलिंदाची एक प्रकारें कींव आली. वडील माणसांकडून लाभणाऱ्या प्रेमळ सहानुभूतीच्या अभावीं मिलिंदाचें हृदय असें कृत्रिम व बोजड बनलें आहे, त्यांचा मुद्दा थोडा फार विचारणीय असला तरी अव्यवहार्य आहे हा विचारच प्रामुख्यानें मनांत आल्यामुळें मकरंद सौम्य स्वरांत म्हणाला, " मिलिन, तुझीं हीं मतें आपल्या समाजांत काय कामाचीं? तूं म्हणतोस तसें वरसंशोधन व्हावयाला अविवाहित तरुण-तरुणींचा पुष्कळ वर्षे दृढ सहवास असला पाहिजे ! आणि तरी सुद्धां हें जमेल कीं नाहीं कोण जाणें ! फक्त नात्यांतील तरुण तरुणींना परस्परांची अशी पारख करणें शक्य होईल. मात्र ' अति परिचयात् अवज्ञा ' होण्याचाहि त्यांत संभव आहे ! पण हा संभव दूर सारला तर

पारशी व मुसलमान ह्या जातिप्रमाणें विवाहाच्या गांठी, त्याच त्या काढण्यांच्या इथल्या, तिथल्या दोरांनींच मारीत राहिलें पाहिजे!"

"ही उगीच चेष्टा आहे तुझी मकरंद. मी म्हणतों तें इतकें हास्यास्पद मुळींच नाहीं."

"इतकें हास्यापद नाहीं म्हणजे थोडें हास्यास्पद आहे हें तुलाहि पटतें तर एकूण? बरं, तें राहूं दे. मिलिन, तुला आतां स्पष्टच विचारतों मी,कल्पनेबरोबर विवाह करण्याची तुझी इच्छा नाहीं ना?"

"इच्छा नाहीं असें नव्हे मकरंद, मला अद्यापि तशी इच्छा झाली नाहीं."

"अस्सं अस्सं! बरं पण काय रे मिलिन्, एखाद्या विशिष्ट तरुणीला तुझ्या अटीबरहुकूम खरें प्रेम तुझ्याविषयीं वाटतें आहे कीं नाहीं ह्याबद्दल तुझी खातरजमा होण्यापूर्वीच तुला जर तिच्याविषयीं प्रेम वाटूं लागलें तर तूं काय करशील? दुष्यन्ताप्रमाणें 'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः' हा न्याय लढवून, ज्या अर्थी तुला तिच्याविषयीं खरें प्रेम वाटत आहे त्या अर्थी तिलाहि तुझ्याविषयीं तसेंच प्रेम वाटत असणार असें धरून चालशील?"

मकरंदानें खोंच तर बरोबर मारली. त्याचा हा प्रश्न ऐकून मिलिंदकुमारांची मुद्रा उतरली. पण लगेच स्वतःला सांवरीत ते म्हणाले,

"ही भलती वाटाघाट हवीच कशाला? तसा प्रश्न मुळीं उद्भवलेलाच नाहीं."

# अपेक्षा ढासळली !

गंभीर मुद्रेनें मकरंद ह्यावर म्हणाला, " ठीक आहे. पण ह्यांत दुसरीहि एक भानगड आहे कीं, बुद्धीचा कीस काढून मग प्रेम बसविण्याच्या तुझ्या ह्या दिरंगाईच्या पद्धतीमुळें एकाद्या वेळीं असें होईल कीं, ज्या तरुणीवर तुझें असें विचारपूर्वक प्रेम बसेल तिचें कदाचित् त्या कालावधींत दुसऱ्या कुणाबरोबर लग्नसुद्धां होऊन जाईल ! फार कशाला ! आमच्या कल्पनेवर आज कांहीं तुझें प्रेम नाहीं असें तूं म्हणतोस. समजा, वर्षा दोन वर्षांत तुझें तिच्यावर प्रेम बसलें नि तेवढ्यांत इथें कल्पनेचें दुसऱ्या कुणावर प्रेम जडलें तर तुझ्या ह्या चालढकली प्रेमाची वाट काय ! "

" मकरंद, ज्या गोष्टींचा आज संबंध नाहीं त्याबद्दल शंकाकुशंका काढा कां ? बरं, मी जातों हं आतां— अं— अं— मीं आलों होतों असें सांग क— अं—तुझ्या बहिणीला " असें म्हणून मिलिंदकुमार निघून गेले.

पण ह्या शेवटल्या प्रश्नोत्तराच्या वेळीं त्यांची मुद्रा जी बदलली ती पाहून मघांपासून चिंताव्याप्त व खिन्न दिसणाऱ्या मकरंदाच्या मुद्रेवर हास्याची अंधुक रेषा उमटली.

आपली मात्रा बरोबर लागूं पडणार, कल्पनेबरोबर विवाह करण्याची अनिच्छा मिलिंदकुमारांनीं आतां प्रदर्शित केली असली तरी पुढेंमागें त्या अनिच्छेंतूनच उत्कट इच्छा प्रादुर्भूत होईल अशी आशा मकरंदाच्या मघां निराश झालेल्या मनाला वाटली !

मिलिंदकुमारांना स्वतःच्या हृदयाची पारख झाली नसली तरी प्रीतीच्या दिव्यांतून हल्लींच पार पडलेल्या व त्यामुळें ह्या बाबतींत

तज्ञ असलेल्या मकरंदाला ती थोडी फार झाली. व मिलिंदकुमारांनीं दिलेल्या निराशाजनक उत्तरार्शी ती विसंगत वाटल्याकारणानें त्याला आशेचा एक सूक्ष्म तंतू आढळून आला !

मकरंदाची मिलिंद–कल्पनेच्या मीलनाविषयींची अपेक्षा जरी ढांसळली तरी त्या ढांसळलेल्या अपेक्षेंतूनच पुनः नवीन अपेक्षा निर्माण झाली !

## प्रकरण ८ वें .... .... दुःख सहजीं गिळत नसतें.

परंतु झालेली हकीकत कल्पनेला कशी कुठल्या शब्दांत सांगावी हा मकरंदाला मोठा विचार पडला. व म्हणून तो उगीचच दिवाणखान्यांत रेंगाळत बसला.

शेवटीं उमाबाईनीं हांक मारल्यामुळें त्याला कल्पनेच्या खोलींत जाणें भाग पडलें. आणि त्याला तिथें बसावयास सांगून उमाबाई कामासाठीं घरांत गेल्या.

कल्पना आजारी असतांना तरी तिला वस्तुस्थिति कळवूं नये अशी मकरंदाची इच्छा असल्यामुळें तिला दुसरी कसली तरी मौजेची आनंदाची बातमी सांगण्यासाठीं तो डोकें खाजवूं लागला पण त्याला कांहीं सुचेना.

इतक्यांत कल्पनेनें विचारलें, " दादा, आज मिलिंदकुमार कसे आले नाहींत ? "

कल्पनेच्या ह्या प्रश्नावर मकरंदानें एकच क्षण विचार केला व कल्पनेला खरी हकीकत सांगून टाकणेंच योग्य आहे; शिवाय, ती सांगतांना मिलिंदकुमारांच्या अहंमन्य, हेकट स्वभावाची शक्य तेवढी

निंदा करून तो तिच्या मनांतून उतरेल असें करावें असें मकरंदानें ठरविलें. व तो तुच्छतापूर्ण स्वरांत म्हणाला, "मिलिन ना? तो बेटा येऊन गेला कीं मघां, जातिवंत चक्रम् प्राणी तो! त्यांतून आणखी घमेंडखोर! मग काय विचारतां? स्वारी सदा आपल्याच मिजाशींत गर्क! अग उद्यांपासून त्यानें इथें मुळींसुद्धां ढुंकून पाहिलें नाहीं तरी त्याबद्दल मला आश्चर्य वाटणार नाहीं, पक्का एककल्ली आणि तिरसट म्हणून पहिल्यापासून तो प्रसिद्ध आहेच ना!"

हें बोलतांना मकरंद लक्ष्यपूर्वक कल्पनेच्या चर्येकडे पहात होता. पण त्याच्या अपेक्षेप्रमाणें तिच्या चर्येवर निराशा किंवा दुःख त्याला मुळींच आढळलें नाहीं.

पण त्याला काय ठाऊक कीं, तो हें बोलत असतांना कल्पना जी ४।६ वेळां खोंकली ती तिला खरोखरीच खोंकल्याची उमळ आल्यामुळें नव्हे, तर आपल्या चर्येवर होणारा भावनांचा आविर्भाव लपविण्यासाठीं तिनें मुद्दाम खोंकण्याची बतावणी केली होती!

आणि ह्या तिच्या बतावणीमुळें मकरंद फसला तशी अण्णासाहेब व उमाबाईहि फसलीं.

मकरंदाचें लग्न झाल्यानंतर व मिलिंदकुमाराची ओळख होण्यापूर्वीं कल्पना मधूनमधून त्रासिक, चिडखोरपणें वागे. मध्यंतरी ४।५ महिने मात्र ती विद्यार्थीदशेंतील अल्लड, आनंदी उत्साहानें वागत होती. पण आतां, मकरंदाच्या अटकळीप्रमाणें मिलिंदानीं त्या दिवसांपासून त्यांच्या घरीं येणें वर्ज्य केलें असतांहि, कल्पना पूर्वींपेक्षांसुद्धां अधिक उत्साहानें वागूं लागली.

आणि ह्या तिच्या वर्तनानेंच मकरंद फसला. त्यानें कल्पनेकडून खिन्न औदासिन्याची व वाढत्या त्रासिकपणाची अपेक्षा केली होती. त्याच्या अगदीं उलट होणारें हें तिचें वर्तन पाहून मकरंदाला आश्चर्य वाटलें व कौतुकहि वाटलें.

त्याला आतां खात्रीपूर्वक असेंच वाटूं लागलें कीं, कल्पनेचा आजन्म अविवाहित रहाण्याचा मनःपूर्वक व प्रामाणिक हेतू आहे. मध्यंतरीं मिलिंदाच्या मैत्रीमुळें हा हेतू ढांसळूं पहात होता. व तें कल्पनेच्या लक्षांत आलें असलें तरी निसर्गापुढें तिचें चालूं शकलें नाहीं. पण आतां मिलिंदाची मैत्री एकाएकीं तुटतांच त्याबद्दल दुःख वाटण्याऐवजीं आपल्या प्रतिज्ञेला आतां धोका नाहीं असें वाटून तिला एकप्रकारें निर्धास्त वाटलें व त्यामुळेंच ती इतकी उल्हसित बनली आहे.

पण अमुक एका घटनेमुळें आनंद वाटणें किंवा दुःख वाटणें हें असें आपल्या हातांत कां असतें? मनावर ताबा ठेवणें इतकें सोपें आहे काय? मन म्हणजे जणूं कांहीं एकादी पेटी असून हव्या त्या भावना आंत भरून नको त्या बाहेर टाकावयाच्या व झांकण गच्च बंद करून घ्यावयाचें हें शक्य तरी आहे काय?

पण मकरंदाला वाटलें कीं, आपल्या बहिणीनें हें अशक्य शक्य केलें आहे. आपल्या प्रतिज्ञेबद्दल अत्यादर वाटत असल्यामुळें त्या प्रतिज्ञेला बाध आणूं शकणाऱ्या मिलिंदकुमाराविषयींच्या भावना दूर सारून कल्पनेनें आपल्या मनःकरंडकाचें झांकण बंद करून घेतलें आहे असा मकरंदाचा आतां समज झाला.

अण्णासाहेब ह्या मिलिंदकुमाराविषयींच्या भानगडींत कधींच पडले नव्हते. मिलिंदकुमाराशीं कल्पनेची खूप मैत्री जडली आहे हें त्यांनीं पाहून ठेंविलें होतें. पण मैत्रीच्या ह्या फुलापासून विवाहाची फल-निष्पत्ति होईल असा तर्क त्यांच्या मनांत आला असला तरी कल्प-नेच्या विवाहाच्या बाबतींत स्तब्धता धारण करण्याचें ठरविलें असल्या-मुळें त्यांनीं त्यामध्यें विशेष मन घातलें नव्हतें.

उमाबाईंना मात्र आतां लेकीचा विवाह होणार अशी आशा वाटूं लागली होती. त्यामुळें मिलिंदकुमाराचें येणेंजाणें एकदम थांबतांच त्यांना फार धक्का बसला व त्यांनीं मकरंदाकडे त्याबद्दल विचार-पूस केली.

बेपर्वाईचा आंव आणून मकरंदानें उत्तर दिलें, " मिलिंद होय ? अग, सहा महिन्यांपुरतीच त्याची इथें बदली झाली होती. आतां तो गेला असेल नाशीकला. सत्ताधारी, बेजबाबदार माणसं तीं ! त्यांचं काय सांगावं ? आणि त्यांतून मिलिंद तर अतिशयच लहरी आहे ! "

ह्यावर कांहीं उत्तर न देतां उमाबाईंनीं एक खोल निःश्वास सोडला. त्यांच्या मातृहृदयाला होणाऱ्या निराशेच्या वेदना ह्या निःश्वासांत भरून राहिल्या होत्या. व मकरंदाला त्या स्पष्ट कळल्या; पण तो तरी काय करणार ?

भोंवतींच्या निराशाजनक अंधकारांत त्याला बारीकसा आशा-किरण सांपडला होता खरा पण त्याबद्दल आतांच उमाबाईंकडे कशाला बोला ? मिलिंदकुमार कल्पनेच्या बाबतींत औदासिन्य

दाखवीत आहे व कल्पनाहि त्याबाबत उदासीनच दिसते! तेव्हां उगीच नसती आशा उमाबाईंना दाखवा कां? असें वाटून मकरंद गप्प बसला.

आणि कल्पना? हं! बिचारीची स्थिति भारी अनुकंपनीय झाली होती. मिलिंदकुमारांना आपल्याबद्दल नुसती मैत्री वाटत नाहीं अशी तिची हल्लीं खात्री पटली होती.

आपली व मिलिंदाची मैत्री म्हणजे निर्हेतूक स्नेहाचा पांढरा शुभ्र मणी नसून प्रीतीच्या गुलाबी रंगानें चमकणारें तें सुंदर, जातीवंत मोती आहे अशी तिच्या हृदयानें तिला ग्वाही दिली होती. आणि असें एकाएकीं हें काय झालें?

जें मोतीं म्हणून वाटलें तें पांढरा मणीहि न ठरतां भेंड्यांतील टाकाऊ बीं निघावें ना?

हृदयाची खूण हृदयाला पटत असतें! कल्पनेच्या हृदयाला मिलिंदकुमारांच्या हृदयाची खूण पटली होती! आणि तिला स्वतःच्या हृदयाचीहि पारख झाली होती.

भरतीच्या लाटेबरोबर वाहून जाणाऱ्या वाळूच्या ढिगाप्रमाणें आपली अविवाहित रहाण्याची प्रतिज्ञा मिलिंदांच्या सहवासामुळें हल्लीं ढांसळत चालली आहे हें तिच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. व ह्या ढांसळण्याला बांध घालण्याची शक्ति आपल्या हृदयामध्यें नसल्यामुळें आतां निसर्गापुढें मान वांकविण्याला ती तयार होणार होती—

आणि एवढ्यांत सारेंच संपलें!

मिलिंदकुमारांची मैत्री म्हणजे अकालीं विरलेलें एक गोड स्वप्न ठरलें!

आपला अनैसर्गिक कठोरपणा सोडून मृदु होऊं लागणाऱ्या कल्पनेच्या हृदयावर मिलिंदकुमारांच्या ह्या वर्तनाचा फारच परिणाम झाला !

पहिला आठवडाभर ती अगदीं बेचैन झाली होती. संध्याकाळीं शाळेंतून घरीं आल्यावर मिलिंदकुमारांची वाट पहात गॅलरींत उभें रहावें असें तिला वाटे. पण आतां त्या वाट पहाण्यांत अपेक्षेची गंमत नव्हती. त्यामुळें हुरहुरत्या अंत:करणानें ती परत दिवाणखान्यांत येई. व दिवाणखान्यांतील ज्या उंच पाठीच्या खुर्चीवर मिलिंदकुमार राज बसत त्या खुर्चीकडे ती अनिमिष लोचनांनीं पहात राही.

मिलिंदकुमार इथें बसत, असें पहात, तसें बोलत वगैरे बारीक-सारीक गोष्टींचा विचार करीत रहाण्याचा तिला नादच लागला. पण असें असूनहि आपल्या हृदयांतील हें गुपित तिनें आपला भाऊ, आई व वडील ह्यांपासून चांगलेंच लपवून ठेविलें.

आणि मग त्यामुळें जात्या स्वाभिमानी, कांहींसा दुरभिमानीच असलेला तिचा मूळ स्वभाव हळुंहळूं वर डोकें काढूं लागला.

तिनें विचार केला, मिलिंदकुमारांना जर आपली पर्वा नाहीं तर आपण तरी त्यांची एवढी पर्वा कां बाळगा ? बस्स ! आपल्याला आजन्म अविवाहित रहावयाचें हेंच खरें !

आणि मग ह्या उसन्या बेपर्वाईचा जोर कायम रहावा म्हणून ती अधिकच पुरुषी थाटानें वागूं लागली.

मोहिनी माहेरीं असल्यामुळें हल्लीं मकरंद ऑफिस सुटल्यावर मित्रांबरोबर भटकून जसा उशीरा घरीं येई तशी कल्पनासुद्धां घरीं लौकर

येण्याचा ओढा आतां नसल्यामुळें शाळा सुटल्यावर इतर मास्तरणींबरोबर हिंडून फिरून उशीरा घरीं येऊं लागली.

उमाबाईनीं हल्लीं तिला रागावण्याचें सोडलेंच होतें. नि ह्याच सुमाराला अण्णासाहेबांची बदली झाली व ह्या उतार वयांत त्यांना नोकरांवर विसंबणें प्रशस्त न वाटून उमाबाईहि त्यांच्याबरोबरच पुण्याला गेल्या.

हें कळतांच पुरे दोन महिनेसुद्धां होण्याच्या आधींच मोहिनी छोट्या अरुणाला घेऊन मुंबईला आली.

पण आतां कल्पनेनें आपल्या मनाची चांगलीच तयारी केली असल्यामुळें मोहिनी आपलें गुपित ओळखील ही भीति तिला वाटत नव्हती. शिवाय दिवसभर अरुणाच्या तैनांतीत गढून गेलेल्या मोहिनी-वहिनीला कल्पनावन्संशीं हितगुज करावयाला वेळ तरी कुठें होता!

मिळून कल्पना आपल्या हृदयाची जखम लपवून ठेऊं शकली. पण हृदयांतील दुःख लपलें म्हणून त्या जागीं ती आनंद कसा निर्माण करूं शकणार?

पहिल्यांदा तिनें आनंदाचा उसना आव आणला पण दीड, दोन महिन्यानंतर ह्या फसवणूकीचा तिला कंटाळा आला. तिच्या तरुण हृदयाला आनंदाची आस लागली!

पण दुःख सहजीं गिळत नसतें आणि आनंद सहजीं मिळत नसतो हेंच खरें आहे.

ह्यामुळें मिलिंदकुमारांची ओळखहोण्यापूर्वीं कल्पनाजशी भाविकबनली होती तशीच—किंबहुना त्याहूनहि अधिक भाविक ती आतां बनली.

पण आपल्या छोट्या संसारांत गढून गेल्यामुळें मकरंदाला व मोहिनीला ह्याची जाणीवच झाली नाहीं !

आणि कल्पनेचें हृदय हल्लीं असें कांहीं हळुवार व बदलतें बनलें होतें कीं, स्वतःच्या संसारांत गुरफटल्यामुळें दादा वहिनीला आपलें गुपित ओळखूं न आल्याबद्दल तिला एकाद्या वेळीं बरें वाटे तर त्यामुळें त्यांच्याकडून सहानुभूति मिळूं शकत नसल्याबद्दल एकाद्या वेळीं तिला खेद वाटे !

वाऱ्याच्या झुळुकीसरशी इकडे तिकडे उडणाऱ्या कागदाच्या कपट्याप्रमाणें तिचें हृदय उलटसुलट दिशांना हेलकावत होतें ! व लगाम हातांतून सुटल्यामुळें बेफाम धांवणाऱ्या घोड्याप्रमाणें कांहीं वेळीं अनावर होणाऱ्या ह्या आपल्या हृदयाला कसें आंवरावें तें कल्पनेला कळत नाहींसें होई !

## प्रकरण ९ वें .... .... .... अपूर्णतेची हुरहुर !

ईश्वरानें मानवी मनोरचना अशी मजेदार केली आहे कीं, आपल्याला काय हवें आहे तें आपल्यालाहि कळून येत नाहीं !

मिलिंदकुमारांची मैत्री तुटल्यामुळें कल्पनेला चुकल्या चुकल्यासारखें खूप वाटलें तरी त्यांच्यावर आपलें प्रेम जडलें आहे असें ती स्वतःशींहि कबूल करीत नव्हती. कारण हल्लीं तर तिला मिलिंदकुमारांचा फार राग येऊं लागला होता. पण ह्या रागाच्या मुळाशीं प्रच्छन्न अनुराग आहे हें तिला सारखेसें कळून आलें नव्हतें.

मात्र मकरंदमोहिनीचा सुखाचा संसार पाहून आपल्या एकलकोंड्या जीवनांत कांहींतरी उणीव आहे काय असें तिला हल्लीं वाटूं लागलें होतें. आणि पुष्कळदां असेंच होतें कीं, आपल्याला खरोखरी कशाची आस लागली आहे हें आपल्याला एरवीं कळून न आलें तरी दुसऱ्याला तें सुख मिळालेलें पाहिल्याबरोबर आपल्याला तें समजून येतें !

मकरंदमोहिनीची परस्पर वागणूक कुणालाहि हेवा वाटण्यासारखीच होती. त्यांच्या लग्नाला आतां वर्ष होऊन गेलें होतें; त्यांच्या प्रीति-

लतिकेला अपत्याच्या रूपानें सुंदर कलिकाहि आली होती तरी प्रणयानुनय करणाऱ्या प्रेमिकांसारखे त्यांचें परस्पराशीं वागणें होतें.

आण्णासाहेब व उमाबाई मुंबईत असतांना त्यांचें हें प्रेमाराधन चोरून चाले. पण आतां तें बंधन दूर झालें होतें व शिवाय, आपल्या प्रीतीच्या छोट्या साक्षीदाराला—अरुणाला—अनुलक्षून प्रेमविनोद करण्याची त्यांना आतां छान सोय होती. त्यामुळें त्यांचें प्रीतिकाव्य साहजिकच कल्पनेच्या नजरेला पडे. आणि कधीं कधीं आपल्या लाडक्या दादावहिनींच्या ह्या मधुर प्रीतिकाव्याचा ती कौतुकानें आस्वाद घेई.

—पण कधीं कधीं त्यामुळें तिच्या हृदयाला अपूर्णतेची हुरहुर लागे. व मग ह्या प्रीतिकाव्याला मधुर सुवास येण्याऐवजीं उग्र दर्प आल्यासारखें तिला वाटे. व त्यांच्या प्रणयाचे तुषार शीतल वाटण्याऐवजीं तिच्या हृदयाला कढत पाण्याच्या वाफेसारखे त्रासदायक वाटत! व मग ती दादावहिनींवर, छोट्या अरुणावर, स्वतःवर, साऱ्या जगावरच चिडून जाई!

आज तसेंच झालें. संध्याकाळीं ५॥। वाजतां ती अगदीं दमून शाळेंतून आली. आज एक शिक्षकीण गैरहजर होती व तिचा तास कल्पनेलाच घ्यावा लागल्यामुळें तिला एकहि पिरिअड् मोकळा नव्हता. त्यांतच, आज शिकवितेवेळीं ती फारशा प्रसन्न मन:स्थितींत नसल्यानें कीं काय, मुलींना आज कुठलाच विषय समजेना. ह्या दगदगीमुळें कल्पना आज भारीच मेटाकुटीला आली होती.

# अपूर्णतेची हुरहुर

आतां घरीं गेल्यावर स्वयंपाक्याच्या किंवा वहिनीच्या हातचा गरमसा चहा मिळेल एवढीच उमेद तिच्या मनाला वाटत होती.

पण ती घरीं जाते तों स्वयंपाकी तापानें पडलेला व एकसारख्या, अकारण रडणाऱ्या अरुणाला समजवितांना मोहिनीवहिनी रंजीस आलेली.

अरुण सतत तासभर रडत होता. त्याला तशा स्थितींत डॉक्टरांकडे नेणें अशक्य व घरांत गडी नवा असल्यामुळें त्याच्याकरवीं डाक्टरांना आणणेंहि अशक्य.

त्यामुळें कल्पना शाळेंतून येतांच मोहिनी लगेच म्हणाली, " वन्सं, आलांत एकदांच्या. जरा अशाच आपल्या डॉक्टर मोघ्यांकडे जाऊन त्यांना बोलावून आणा बरं. "

कल्पना आधींच फार त्रासली असल्यामुळें आतां पुनः डॉक्टरांकडे जाण्याचा तिला कंटाळा आला. व त्या भरांत ती म्हणाली, " मी दिवसभर डोकंफोड करून अगदीं गळून गेलें आहे नि आतां कुठें जाऊं डॉक्टरांकडे ! "

हातपाय ताडून तारस्वरांत रडणाऱ्या अरुणाला समजावितांना मोहिनी स्वतः रडकुंडीला आली होती. त्यामुळें आतां कल्पनेचा हा नकार ऐकतांच ह्या घाबरलेल्या मनःस्थितींतसुद्धां तिला फार राग आला. व ती झटक्यानें म्हणाली, " बरोबरच आहे. पुरुषासारख्या सडेसोट तुम्हीं. भावाच्या संसाराची नि बायकामुलांची तुम्हांला काय पर्वा ! "

झालं ! मोहिनीनें मारलेला हा टोमणा कल्पनेला मनस्वी झोंबला. आपल्या अविवाहित रहाण्याच्या निश्चयाची वहिनीनें टवाळी

केली हं असह्य होऊन ती म्हणाली, " हो, हो, अविवाहित रहा-वयाला तसाच मनोनिग्रह लागतो बरं ! वाटेल त्याला नाहीं तें साधणार ! "

अरुणाच्या अश्रूंत आपले अश्रु मिसळणाऱ्या मोहिनीनें ह्यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. घाबरून गेल्यामुळें तिला आतां रडूं येत होतें. मोठ्या प्रयासानें तें आवरून तिनें अरुणाला तसाच खांद्यावर टाकला व ती डॉक्टरांकडे जावयास निघाली.

आणि तेवढ्यांत मकरंद घरीं आला.

आतां मोहिनी त्याला सर्व हकीकत सांगणार व मग तो आपल्याला अधिक उणं बोलणार असें कल्पनेला वाटलें. व निदान तें आपल्या समक्ष व्हावयाला नको असें वाटून ती आपल्या खोलींत गेली. तिचे कान मात्र बाहेरील संभाषणाकडे होते.

मकरंदाला पहातांच अश्रूंमधून हंसण्याचा प्रयत्न करीत मोहिनी म्हणाली, " अरुण किनई मघांपासून उगीचच असा रडतो आहे. जरा डॉक्टर मोघ्यांना बोलावून आणा बरं. "

अरुणाला गप्प करण्याचा एकवार निष्फळ प्रयत्न करून मकरंद त्याच पावलीं डॉक्टरांकडे गेला.

अरुण सारखा रडतच होता. पण आतां मोहिनी रडत नव्हती. तिला पुष्कळ धीर आला होता व ती बोबड्या स्वरांत अरुणाला अश्वासन देत होती,

" छोन्या, उगी हं, आतां बाबा डॉक्टराला घेऊन येतील. मग

डॉक्टर माझ्या लाजाला गोलगोल औषद देऊन चलं कलनाल."
वगैरे मोहिनीचें बोलणें कल्पनेला ऐकूं येत होतें.

मात्र ती तशीच आंतल्या खोलींत स्वतःशीं कुचंबत बसली होती. केव्हांपासून हवा असलेला चहा तिला अद्यापि मिळाला नव्हताच पण आतां त्याचा तिला पार विसर पडला होता.

शाळेंत दिवसभर त्रास केल्यावर संध्याकाळीं थकल्यासारखें वाटणारच. पण मध्यंतरीं मिलिंदकुमार जेव्हां रोज संध्याकाळीं येत होते तेव्हां हा थकवा कसा नाहींसा होत होता? नंतर पायीं फिरावयाला जाण्याइतपत उत्साह तिला कसा वाटत होता?—

हे विचार कल्पनेच्या मनाला मधूनमधून चिमटे घेत होते. त्याचप्रमाणें आपण वहिनीला तसें तुटक उत्तर द्यावयाला नको होतें ही जाणीवहि तिच्या मनाला होत होती. मिळून ते २।३ दिवस कल्पनेनें अवघडलेल्या मनःस्थितींतच काढले.

मात्र तिला राहून राहून एका गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत होतें. त्यानंतर २।३ दिवस अरुणाची प्रकृति जरा नादुरुस्त होती. त्यामुळें मकरंद व मोहिनी त्याच्या शुश्रूषेंत गुंग होतीं. पण ह्या निमित्तानें तीं सकाळीं व संध्याकाळीं कितीतरी तास एकत्र असतांहि मोहिनीनें त्या दिवशींच्या कल्पनेच्या वागणुकीचा उल्लेख मकरंदाकडे मुळींच केला नाहीं. व ह्याचेंच कल्पनेला आश्चर्य वाटलें.

कल्पनेनें त्या दिवशीं दिलेल्या उत्तराचा मोहिनीला त्यावेळीं किती राग आला होता. पण नंतर मकरंद घरीं आला, त्यानें डॉक्टरांना आणलें व अरुणाला योग्य ते उपचार डॉक्टरांकडून पोहोंचले.

त्यामुळें निश्चित वाटतांच मोहिनीचा कल्पनेवरील राग ओसरला काय ? कीं पतिप्रेमाच्या आधारावर विसंबणाऱ्या व अपत्यवात्सल्यांत गुरफटून गेलेल्या पत्नीला बाहेरील जगाची फारशी पर्वा नसतेच ?

शिवाय पुण्यास जातेवेळीं उमाबाईंनीं कल्पनेला मकरंद मोहिनी-कडे सोंपविली होती व आजवर तीं दोघें कल्पनेचें हवें नको कसोशीनें पहात होतीं. पण आतां अरुण आजारी पडतांच असल्या इतर जबाबदाऱ्यांची त्या उभयतांना मुळीं आठवणच राहिली नाहीं.

तेव्हां पतिपत्नीप्रेम आणि अपत्यवात्सल्य ह्या दोन भावना इतक्या तीव्र व व्यापक असतात काय कीं त्यांच्यापुढें इतर साऱ्या भावना जणूं लुप्तच होतात !— इतर कर्तव्यांची जणूं जाणीवहि रहात नाहीं !

अण्णासाहेब व उमाबाई ह्या जोडप्याचें परस्परांवर फार प्रेम होतें पण ह्या पतिपत्नीप्रेमांत अप्रत्यक्षरीत्या व तज्जन्य अपत्यवात्सल्यांत प्रत्यक्ष रीत्या कल्पनेचा अंतर्भाव असल्यामुळें त्याबद्दल तिला आजवर विशेष कुतूहल वाटलें नाहीं.

पण आतां मकरंद मोहिनीच्या प्रेमाची गोष्ट वेगळी होती. त्या उभयतांच्या परस्परप्रीतीमुळें कल्पना आपल्या दादाच्या ममतेला व मैत्रिणीच्या स्नेहाला पारखी झाली होती. त्यामुळें त्यांच्या पतिपत्नी प्रेमाबद्दल व अपत्यवात्सल्याबद्दल कल्पनेला फार कुतूहल वाटत होतें.

आणि आतां कल्पनेची पूर्ण खात्री झाली कीं, विवाहित स्त्रीला पतीच्या प्रेमांत व अपत्यवात्सल्यांत सारें जग सांठल्यागत वाटत असतें ! ह्या दोन प्रेमाचा आधार असला कीं तिला एवढें सुसंरक्षित वाटतें

कीं तदितर प्रेमाविषयीं वा इतरांच्या निष्प्रेम वर्तनाविषयीं ती सारखीच निरपेक्ष असते!

पति व अपत्यें ह्यांच्याशिवाय इतरांच्या प्रेमाचीहि तिला पर्वा वाटत नाहीं किंवा अप्रेमाचीहि पर्वा वाटत नाहीं!

एरवीं झाल्या, विवाहित स्त्रियांच्या असल्या परावलंबी मनोवृत्तीची कल्पनेनें चेष्टा केली असती. आपल्या व्यक्तित्वाचाहि लोप करून आपल्या पतिपुत्रांत गुरफटून जाणाऱ्या विवाहित स्त्रीच्या लवचिक हृदयाची तिनें कींव केली असती! पण—

पण कल्पनेनें तसें स्वतःशींसुद्धां कबूल केलें नाहीं तरी मिलिंदकुमारांच्या सहवासापासून तिच्यामध्यें पुष्कळ फरक झाला होता!

पूर्वीं तिला विवाहित स्त्रियांची कींव येत असे पण आतां स्वतःच्या एकलकोंड्या जिण्याची तिला मधूनमधून कींव येऊं लागली. व विवाहित स्त्रियांची चेष्टा करण्याऐवजीं आपल्या हृदयाच्या एका विशिष्ट कोपऱ्यांत दडलेली एक भावना इतरांना कळली तर आपली चेष्टा होईल ह्याचीच दरकार तिला अधिक वाटूं लागली!

कारण कल्पना कितीहि शिकली, बेछूट स्वातंत्र्याची, आर्थिक स्वावलंबनाची तिला कितीहि आवड असली तरी ती भावनाप्रधान, कोमल हृदयाची स्त्री होती व अशी जातिवंत नारीहृदयी तरुणी निसर्गाच्या नियमाना कायमची अपवाद कशी होऊं शकेल?

## प्रकरण १० वें .... 'विद्यार्थीदशेचा काळ सुखाचा !'

मौज अशी कीं, मिलिंदकुमारांच्या मैत्रीमुळें आपल्या मनोवृत्तींत तफावत घडून आली हें कल्पनेला मधूनमधून जाणवत असलें तरी ती तें कबूल करूं इच्छित नव्हती. एवढेंच नव्हे तर मिलिंदांची इतकी पर्वा कां बाळगावयाची असेंच ती आपल्या मनाला शिकवूं लागली—म्हणजे शिकविण्याचा प्रयत्न करूं लागली.

व ह्या प्रयत्नाला मदत म्हणून कॉलेजांतील वर्गभगिनींच्या मैत्रीचे मध्यें सुटलेले धागे पुनः उचलण्याचा तिनें विचार केला.

आणि माळ्यावरील ट्रंकेंत असलेला सीनियर बी. ए. च्या वर्गातील सर्व वर्गबंधूभगिनींचा ग्रुप फोटो तिनें पाडूकडून काढला.

ह्या फोटोमध्यें दक्षिणी विद्यार्थिनी एकंदर सहाच होत्या. पैकीं, एक कल्पना व दुसरी मोहिनी आणि इतर चौघी.

ह्या चौघींची नांवें कल्पनेला पटदिशीं आठवली पण त्यांचे पत्ते वगैरे आठवेनात त्याचप्रमाणें साधारणच तोंडओळख असलेल्या विद्यार्थ्यांची तर नांवेंहि तिला धड आठवेनात.

तेव्हां तो फोटो घेऊन ती मोहिनीच्या खोलींत गेली.

## विद्यार्थी दशेचा काळ सुखाचा

हातपाय हालवून पाळण्यांत खिदळणाऱ्या अरुणाशीं लांब लांब गप्पा मारीत मोहिनी लोंकरीचा छोटा कोट विणीत होती.

कल्पनेला खोलींत आलेली पाहून तिनें म्हटलें, "वन्सं, तुमचा भाचा बघा कसा खिदळतो आहे तें. घ्या तरी त्याला उचलून."

त्यावर आश्चर्यव्यंजक स्वरात कल्पना उद्गारली, "अग, अरुण जर चांगला खेळतो आहे तर त्याला कशासाठीं उचलायचं? रडावयाला लागला तर बरीक घेतला पाहिजे उचलून."

कल्पनेच्या ह्या उद्गारानें मोहिनीला मुळींच खेद वाटला नाहीं. त्या दोघी समवयस्क मैत्रिणी असल्या तरी ही पत्नी व माता बनल्यामुळें मोहिनीला जगाचा अधिक अनुभव आला होता.

कल्पनेंचं स्त्रीहृदय एरवीं कोमल, हळुवार असलें तरी वात्सल्याच्या बाबतींत अद्यापि मुक्या कळीप्रमाणें मिटतें आहे; त्यामध्यें मातृप्रेमाचा खळखळाट अद्यापि सुरूं झालेला नाहीं हें तिनें ओळखलें.

ती मृदु स्मित करीत म्हणाली, "वन्सं, आपल्या रडणाऱ्या मुलाला तर आई उचलून घेतेच. पण हंसणाऱ्या खिदळणाऱ्या मुलाला हृदयाशीं आंवळण्याचा मोह आईच्या हृदयाला किती अनावर होत असतो ह्याची तुम्हांला अजुनि कल्पना नाहीं. अरुण जन्मल्यापासून त्याला रात्रंदिवस हृदयाशीं कवटाळूनच बसले असतें मीं. पण अशानें मूल बाळसं घेत नाहीं असें बोलून, बोलून आईनें मला त्या मोहापासून परावृत्त केलं. वन्सं, तुम्हीं आई झाल्यावर तुम्हांला ह्यांतलं मर्म कळेल!"

एवढें बोलून मोहिनी किंचित् थांबली. व आपल्या स्पष्ट

" आणि त्याच्या ह्या बाह्य बावळटपणामुळें प्रीव्हियसच्या पहिल्या टर्ममध्यें मुलांनीं त्याची खूप टवाळी केली. नि मग सहामाही परीक्षेमध्यें तो सर्व विषयांत पहिला आला तेव्हां कशी सर्वांची फजिती उडाली ! प्रोफेसर्सनांसुद्धां आश्चर्याचा मोठाच धक्का बसला नाहीं ? "

"तर, मोठीच गंमत झाली ती. त्यानंतर मात्र मुलांनीं त्याच्या बावळटपणावरून चेष्टा केली नाहीं. पण नांव काय त्याचं ? "

"नांव ? —कोंकणांतल्या एका कुठल्याशा गांवानें सुरवात आहे त्याच्या नांवाची. "

" हो, नि शेवटीं 'कर' आहे. "

" अग, चिपळूणकर. "

" होय, हो, होय ! विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणें हाहि कुणीतरी प्रचंड विद्वान होणार म्हणून मुलं त्याला कधीं कधीं 'शास्त्री-बुवा' नसत का म्हणत ?—हं, आतां आठवलं सारं—"

आणि त्यानंतर आठवतील त्या इतर विद्यार्थ्यांची खानेसुमारी त्या दोघींनीं केली.

त्यावेळचे प्रोफेसर्स, शिकविण्याची प्रत्येकाची कांहीं विशिष्ट लकब, कॉलेजांत दरवर्षीं होणारें संयुक्त संमेलन, त्यावेळचा आनंद, उत्सुकता व धुमाकूळ, परीक्षांची धामधूम वगैरे साऱ्या बारीक बारीक गोष्टींची त्यांनीं आठवण काढली.

वनवासाचा चित्रफलक पहाण्यामध्यें सीतादेवी अशी गढून गेली

होती तशा विद्यार्थीदशेच्या स्मृतिपटांत कल्पना व मोहिनी अगदीं गुंगून गेल्या होत्या.

मोहिनीचें लग्न झाल्यानंतर आज पहिल्यांदाच त्या इतक्या प्रेमानें व इतका वेळ एकमेकींशीं बोलत राहिल्या. मोहिनीच्या लग्नामुळें त्या दोघींच्या मैत्रींत जो एक प्रकारचा निर्जीवपणा आला होता तो आज बराचसा नष्ट झाला.

आणि मुख्य म्हणजे, मिलिंदकुमारांच्या चमत्कारिक वर्तनामुळें कल्पनेच्या हृदयाला जी जडता आली होती तीहि बरीचशी कमी झाली !

विद्यार्थीदशेचा काळ सुखाचा तर असतोच पण त्याची आठवण-सुद्धां पुढील आयुष्यांत सुखदायक वाटते !

म्हणजे स्वतः पवित्र असून इतरांना पावन करणाऱ्या अग्नि व गंगोदक ह्या दोन वस्तूंप्रमाणें बालपण व विद्यार्थीदशा हे मानवी जीवनांतील दोन कालखंडहि स्वतः सुखमय असून सुखदायकहि असतात !

## प्रकरण ११ वें .... .... मैत्रीणींचा पाठलाग.

पुढल्या आठवड्यांत एक दिवस शेवटला पिरिअड् मोकळा असल्यामुळें पावणेचार वाजतांच कल्पना घरीं जावयास मोकळी झाली.

पण कॉलेजांतील वर्गभगिनींपैकीं एकीचा तरी आज पाठलाग करावयाचा असें तिनें ठरवून टाकलें होतें. त्यामुळें शाळा सुटल्या-वर ती आंग्रेवाडींत सुशीला देसाई हिच्या घरीं गेली.

बाहेरील खोलींत सुशीलेची आई तिला दिसली. कॉलेजांतील संमेलनाला ह्या बाई २।३ वेळां आल्या असल्यामुळें कल्पना त्यांना ओळखीत होती.

तिनें हंसून प्रश्न केला, " सुशीला आहे कां घरांत ? "

"अगबाई, म्हणजे ती इतक्यांत बाहेर कशी जाणार हो !" सुशी-लेच्या आईनें दिलेल्या ह्या प्रश्नात्मक उत्तराचा कल्पनेला बोध न होऊन तिनें म्हटलें, " कां ! सुशीला आजारी होती कीं काय ? "

" अहो, छे, बाळंतीण आहे ती. आज पंधरावा दिवस. "

" असं ! तिचं लग्न झाल्याचासुद्धां मला पत्ता नव्हता. "

"गेल्या वर्षी आम्ही कोंकणांत गेलों होतों नि तिथें अचानक योग जुळून आला नि लगेच आठां दिवसांत लगिन झालं सुद्धां—"

"हं, तरीच! बरं, आंत जाऊं कां मी?"

"चला ना."

जरा गोंधळलेल्या चित्तानें कल्पना आंतील खोलींत गेली.

ही बाळंतिणीची खोली आधींच अंधारी होती. त्यांतून सारी अर्धीच खिडकी उघडी होती.

बाजेवर सुशीला झोंपली असून तिच्या कुशींत फडक्यांत गुंडाळलेलें एक लहानसें मूल होतें.

कल्पना आली आहे हें कळतांच सुशीला उठून बसली, व म्हणाली, "किती दिवसांनीं भेटते आहेस ग. ये ना अशी आंत."

बाचकत कल्पना बाजेच्या बाजूला असलेल्या खुर्चीवर बसली.

व इकडे तिकडे पहात तिनें म्हटलें, "तुझं लग्न झालेलं सुद्धां मला ठाऊक नव्हतं त्यामुळें मग्रां माझी मोठी गडबड उडाली."

"होय कां! हा बघ ना तुझा भाचा."

आतां कल्पनेच्या लक्षांत आलें कीं, सुशिलेला मुलगा झाला आहे कीं मुलगी ह्याची आपण चौकशीहि केली नव्हती.

पुढें वांकून सुशीलेच्या हातांतील त्या वीतभर लांबीच्या, अशक्त अर्भकाकडे मोठ्या आवडीनें पहाण्याचा कल्पनेनें प्रामाणिक प्रयत्न केला.

पण तें मूल इतकें रोड होतें व त्याच्या अंगावर म्हाताऱ्याप्रमाणें

इतक्या सुरकुत्या पडल्या होत्या कीं त्याला उचलून घेण्याची इच्छा कांहीं तिला होईना.

परंतु सुशीलेची मुद्रा अतिशय प्रेमळ व साभिमान दिसत होती. आणि तिनें अतिशय आनंदानें आपल्या मुलाला कल्पनेच्या पुढें केल्यामुळें नाइलाजास्तव कल्पनेनें त्याला मांडीवर घेतला.

तिची स्थिति भारी अवघडल्यासारखी झाली होती. इतक्यांत त्या मुलानें हळूहळूं रडावयाला सुरवात केली. त्यासरशीं सुशीला हात पुढें करून घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, " दे, दे, बाई त्याला इकडे. मावशीची ओळख नसल्यामुळें लबाड रडावयाला लागला हं."

वाईट दिसेल म्हणून चहा घेईपर्यंत कल्पना तिथें थांबली व उशीर झाल्यास वहिनी काळजी करील ही सबब पुढें करून ती घरीं परतली.

त्यानंतर इतर मैत्रिणींचा पाठलाग करण्याबद्दल कल्पनेला विशेष उत्सुकता वाटेना. परंतु एकलकोंडेपणाचा कंटाळा आल्यावेळीं तिला पुनः प्रयत्न करावा असे वाटे.

शेवटीं पुढील आठवड्यांत दोन प्रहरच्या सुट्टींत ती परवानगी घेऊन मिस् मदरलँडच्या खासगी खोलींत गेली व टेलिफोन डिरेक्टरीवरून तिनें काशी देशपांडे हिच्या वडिलांच्या फोनचा नंबर कांढला.

तो नंबर फिरवून तिनें रिसीव्हर कानाला लावला आणि तिच्या मनांत आलें, लग्न होऊन ही सुद्धां जर सासरीं गेली असली तर ? तर निदान तिचा सासरचा पत्ता तरी विचारतां येईल असें तिनें ठरविलें.

फोनमधून आवाज आला, " हॅलो,..."

कल्पना म्हणाली, "हॅलो, मला काशीताईशीं बोलावयाचें आहे."

फोनमधून प्रश्न आला, " आपलें नांव काय ? "

" कल्पना बापट. "

ह्यावर कल्पनेला जरा थांबण्याची सूचना देऊन फोनवरील मनुष्य निरोप कळविण्यासाठीं आंत गेला.

चांगल्या पांच, सात मिनिटानंतर फोनमधून कोण्या आवाजांत आव्हान झालें, " हॅलो-"

उत्सुक स्वरांत कल्पनेनें विचारलें, " कोण ? काशी ? "

" अंहं, मी तिची धाकटी बहीण-काशीताईनें सांगितलें आहे कीं, आपल्याला फोनवर येतां येत नाहीं. तिची तीन महिन्यांची मुलगी गोंवरानें आजारी आहे. आतां बरें आहे पण...पुढील बोलणें ऐकण्याची कल्पनेला आवश्यकता वाटली नाहीं.

काशीची बहीणच सांगते कीं, मुलगीचें आतां बरें आहे आणि तरीसुद्धां दोन वर्षें न भेटलेल्या मैत्रिणीकडे दोन शब्द बोलावें असेंहि तिला वाटलें नाहीं ना !

" बरं. " एवढाच शब्द उच्चारून कल्पनेनें मध्येंच फोन बंद करून टाकला.

काशीच्या ह्या वर्तनाचा कल्पनेला भारी राग आला. लग्न झालें, मूल झालें म्हणून मैत्रिणीचा व साध्या माणुसकीचाही विसर पडावा ?

ह्यानंतर २।४ दिवस कल्पना पुनः असल्या भानगडींत पडली नाहीं.

पण टोपीवाल्याच्या चाळींत रहाणाऱ्या कमल दामलेची हालहवाल पहाण्याचा तिला नंतर मोह पडला.

व शनिवारीं दोन प्रहरीं ती कमलच्या घरीं गेली. पूर्वीं २।३ वेळां हळदीकुंकवाच्या निमित्तानें ती कमलच्या घरीं आलेली होती.

पण त्या बिऱ्हाडावर दामल्यांच्या नामफलकाऐवजीं एस्. डी. गोगटे, बी. ए. एलएल. बी. अशी पाटी आतां झळकत होती.

क्षणभर, काय करावें तें कल्पनेला कळेना.

दामल्यांच्या जागीं हे गोगटे वकील आले आहेत. मग दामले कुठें गेले ?

चाळींतील इतर अनोळखी स्त्रियांना ही माहिती विचारण्याऐवजीं गोगट्यांचाच दरवाजा ठोठावून आंतील मंडळींना विचारावें असें तिनें ठरविलें.

व हलकेंच दारावर थाप मारली.

किंचित् वेळानें दार उघडलें. कमल दामलेच दारांत उभी होती.

सानंद विस्मयानें कल्पनेनें प्रश्न केला, " हें काय, दारावर पाटी तर गोगट्यांची आहे नि तू कशी इथें ? "

" अग, मी मिसेस् गोगटे आहे. सहा महिन्यापूर्वीं आमचा विवाह झाला. ही जागा लहान व सोईस्कर म्हणून आम्हांला देऊन माझ्या माहेरची मंडळी समोरील घरांत मोठी जागा घेऊन राहिली आहेत. " कमलनें हंसत हंसत स्पष्टीकरण केलें.

" अस्सं. " एवढाच कल्पनेनें उद्गार काढला. कमल मिसेस गोगटे आहे हें कळण्याऐवजीं ती अद्यापि कमल दामलेच असून यश

मंडळींनीं बिऱ्हाड बदललें आहे असें कळतें तर कल्पनेला ह्याहून बरें वाटलें असतें; मात्र ती असें उघड बोलली नाहीं.

जरा वेळानें कमल म्हणाली, "कल्पने, तूं अद्यापि अविवाहित आहेस वाटतं! खरं सांगूं तुला, लग्न करून छोटा संसार थाटण्यांत कांहीं अपूर्वच आनंद असतो. मी पूर्वी आनंदांतच होतें पण कल्पने, विवाहाचें स्वातंत्र्य वेगळेंच असतें!"

"स्वातंत्र्य? हं! वेडे, विवाहाचें पारतंत्र्य म्हण कीं—" कल्पनेनें म्हटलें.

"अंहं, तुझी चुकी आहे. कल्पने, पतिपत्नीच्या अंतःकरणाची नीट जुळणी झाली असली म्हणजे संसारांत पत्नीला पूर्ण स्वातंत्र्यच लाभतें! कल्पने, चुकते आहेस तूं. अजुनि आपली चुकी सुधार—"

झालं! मोठ्या हुरुपानें कल्पनेनें कमलेचा पाठलाग केला! पण कमल खूप बदलली आहे असें तिला आढळून आलें.

कल्पनेच्या मनाचा सुंभ अद्यापि जळला नसल्यामुळें कमलच्या उपदेशाचा तिला राग आला.

आतां शांता पाटकरवरच काय तो कल्पनेचा सारा भरंवसा राहिला.

आणि दुसऱ्याच दिवशीं कल्पना शांताकडे गेली. शांता पूर्वींप्रमाणें अद्यापि डोंगरे बिल्डिंगमध्येंच रहात असून अजूनि मिस् पाटकरच होती.

कल्पनेला पहातांच आनंद व्यक्त करीत तिनें म्हटलें, वाः तूंहि अद्यापि अविवाहितच आहेस तर! छान! ह्या बाबतींत आपलं दोघींच एकमत आहे हं."

नंतर पुनः ह्याच विषयावरून शांता म्हणाली, " विवाह म्हणजे पारतंत्र्य नाहीं कां ? लग्नाची बेडी म्हणतात तेंच खरं ! मी नाहीं बाई कधीं ही बेडी अडकवून घेणार आणि कल्पने, तूंहि नको घेऊस. तर काय ! पुरुष कितीहि शिकले, सवरले तरी आपल्या पत्नीची गळेचेंपी करण्याचा मोह त्यांना पडतोच. पण म्हणावं आमचे गळे एवढे वर नाहीं आले. आम्हीं लग्नच नाहीं करणार. कल्पने, तूं आणि मी मिळून ह्याबाबत प्रचंड प्रसार करूं या. "

पण मौज अशी कीं तिचें हें बोलणें कल्पनेला पटलें नाहीं. विवाह म्हणजे स्वातंत्र्य असें कमलनें म्हटलें तेंहि तिला पटलें नाहीं आणि विवाह म्हणजे पारतंत्र्य असें शांता म्हणाली तेंहि तिला पटलें नाहीं !

प्रकृति नादुरुस्त असली म्हणजे भूक लागल्यासारखेंहि वाटतें आणि अन्नावर वांछा नाहीं असेंहि वाटतें.

थेट अशी कल्पनेची स्थिति झाली होती !

आपल्या स्नेहशून्य जिण्याला कंटाळल्यामुळें तिनें मैत्रिणींचा पाठलाग सुरूं केला पण त्यानें तिच्या अंतःकरणाला समाधान कांहीं वाटलें नाहीं.

अशा बेचैन मनःस्थितींतच तिनें कांहीं दिवस काढले. आणि नंतर तिला आपल्या एका परम प्रिय मैत्रीणीची आठवण झाली. ही मैत्रीण-चंपू आठवले व कल्पना इंग्रजी पहिलीपासून बरोबर शिकल्या पुढें वडिलांची नौकरी गेल्यामुळें इंग्रजी सहाव्या इयत्तेंत शाळा सोडून ती मंडळीबरोबर उमरावतीला गेली. जातांना तिनें

कल्पनेला आपला पत्ता दिला होता. व त्या पत्त्यावर कल्पनेनें १।२ पत्रें पाठविलीं. पण पुढें मॅट्रिकच्या गडबडींत व नंतर कॉलेजांतील नाविन्यांत गढल्यामुळें कल्पनेला तिचा विसरच पडला.

आतां कॉलेजांतील मैत्रीणींच्या बाबतींत ती निराश झाली; त्यांतील कुणाहिबरोबर विशेष मैत्री ठेवावी असें तिला वाटलें नाहीं. त्यामुळें आतां चंपूची आठवण तिला झाली.

जुन्या कागदपत्रांमधून तिनें चंपूचा पत्ता शोधून काढला व तिला पत्र पाठविलें.

चौथ्या दिवशीं चंपूकडून उत्तर आलें. तिनें लिहिलें होतें.

तूं मला मुंबईला आपल्याकडे बोलावलेंस. पण मी कशी येणार ? माझा मोठा मुलगा हल्लींच शाळेंत जाऊं लागला आहे. त्याच्या पाठची मुलगी जरा अशक्त आहे. व नंतर एक मुलगा आणि एक मुलगी आहे. चौघां मुलांना घेऊन इतक्या दूर प्रवास कसा करूं मीं ?

शिवाय सध्यां माझी प्रकृतीहि जरा बरी नाहीं. त्यापेक्षां तूंच इकडे ये ना. तूं अद्यापि लग्न केलें नाहींस ! कां बरं ! विचारच नाहीं काय ! असं नको करूंस. संसार व मुलंबाळं ह्यांचा आनंद अवर्णनीय असतो !

जास्ती लांब पत्र लिहावयास वेळ नाहीं. माझी धाकटी मुलगी सिंधू आजारी असल्यामुळें सारखी किरकिरते आहे. तेव्हां पुरें करतें. उत्तर पाठीव......"

चंपूच्या ह्या पत्रानें कल्पनेची पुनः निराशा झाली. तिला

कुणीतरी जिवाभावाची मैत्रीण हवी होती. पण चार मुलांच्या संगोपनांत सर्वस्वी गढून गेलेली चंपू तिची ही गरज कशी भागविणार होती !

झालं ! हाहि प्रयत्न अयशस्वी झाला. आतां मात्र कल्पना भारी वैतागली व पुनः ह्या फंदांत न पडण्याचा तिनें ठाम निश्चय केला.

## प्रकरण १२ वें "बालक व्हावें मौजेंत पुन्हां खेळावें–"

पुढें ८–१० दिवसांनी शाळेला दिवाळीची सुटी होतांच कल्पना तावडतोब पुण्याला आईवडिलांकडे गेली.

मैत्रीणींचा पाठलाग करितांना खूप ठेंच लागल्यामुळें पुन: त्या वाटेला जाणें नको असें तिनें ठरवून टाकलें होतें.

परंतु सुटींत मुंबईलाच राहिल्यास एकलकोंडेपणाचा कंटाळा आल्यामुळें कदाचित् हा पाठलाग 'पुढें चालूं' करण्याचा मोह पडेल असें वाटून ती पुण्याला पळाली.

बऱ्याच दिवसांनीं आईवडील भेटल्याकारणानें कल्पनेला फार आनंद झाला. शिवाय पुण्याची हवा आतां सुरेख असल्यामुळें तिच्या प्रकृतीला व मनाला खूप हुपारी वाटूं लागली.

एकंदरींत कल्पनेला बऱ्याच दिवसानंतर पुन: हुरूप वाटूं लागला. आपण जणूं लहानच असल्यागत ती आईवडीलांशीं हंसून खेळून वागूं लागली.

'बालकं व्हावें मौजेंत पुन्हां खेळावें' अशी हौस तिला वाटूं

लागली. आणि खरोखरीच विद्यार्थी दशेतील अल्लड, भावनाविरहित कल्पनाच जणू पुनः सध्यां निर्माण झाली होती.

आण्णासाहेब ऑफिसांत जाईपर्यंत ती त्यांच्या जवळपास लुड-बुड करीत राही. व नंतर दिवसभर आईच्या भोंवतीं हिंडत राही.

आईला तिनें मुंबईच्या गोष्टी सांगितल्या. पण त्या बहुतेक साऱ्या एकाच तऱ्हेच्या असत. म्हणजे दादा वहिनी व अरुण आणि X X मिशन् स्कूल एवढेच विषय त्यांत असत. स्वतः कल्पने-विषयीं त्यांत फारच थोडी हकीकत असे.

पुण्याला गेल्या दिवशींच दोन प्रहरीं मायलेकी पलंगावर पडल्या असतां उमाबाईंनीं म्हटलें, "कल्पने, तुझी प्रकृति कशी असते ग ? जरा रोड झाल्यासारखी दिसते आहेस. प्रकृति बरी आहे ना ?"

" हो तर आई, माझी प्रकृति छान आहे. नि आई, आपल्या अरुणानें किती सुंदर बाळसं घेतलं आहे म्हणून सांगू. अगदीं वर्षाच्या मुलाएवढा दिसतो लबाड !"

नंतर एकदां उमाबाईंनीं विचारलें, " अग, दोनप्रहरीं शाळेंत चहा किंवा दूध घेतेस कीं नाहीं ?"

" अं ? दोन प्रहरीं होय ? आई, एक मजा सांगते हं तुला दोनप्रहरीं चहा घेण्याबद्दलची — अग, मॅट्रिकच्या क्लासमध्यें हल्लीं एक नवी विद्यार्थिनी आली आहे. तिचं नांव सुंदर. अगदीं नांवा-प्रमाणें सुंदर आहे बघ. नि तितकीच हुषार. पण बाई, भारी लाज-वट. दुपारच्या सुटींत चहा प्यायला सुद्धां लाजते ती ! नि ह्याबद्दल कानांवर आल्यामुळें मी वर्गांत तिला एकदां विचारलें तर एवढी भोंवळली म्हणून सांगू ! लाजेनें तिचे गाल लाललाल झाले ग !"

लेकीच्या ह्या अवास्तव बडबडीवरून उमाबाईनीं ओळखलें कीं, शाळेंत दोनप्रहरीं ती कांहीं खात, पीत नसणार व तें उघड सांगणें भाग पडूं नये म्हणून हें आडवळण तिनें घेतलें!

त्याचप्रमाणें उमाबाईनीं म्हटलें, "आणि तूं संध्याकाळीं फिरायला जातेस कीं नाहीं?"

संध्याकाळच्या फिरण्याचा केव्हांहि उल्लेख झाला कीं त्या विशिष्ट फिरण्याची तिला आठवण येई. व तिच्या प्रयत्नांना न जुमानतां तिचें हृदय विव्हळ होई.

आतांहि तसेंच झालें! पण तिनें मोठ्या प्रयत्नानें स्मित तोंडावर आणीत उत्तर दिलें, " हं. जातें कीं. दादा, वहिनी मात्र रोज रात्रीं जातात,"

" आणि सिनेमा पहावयाला जातेस कीं नाहीं?"

" सिनेमाला? अं— नाहीं बाई!"

कल्पनेला सिनेमा फिल्म्स पहाण्याची फार आवड होती हें उमाबाईंना ठाऊक असल्यामुळें तिच्या ह्या नकारात्मक उत्तराचें त्यांना आश्चर्य वाटलें.व कदाचित् आपल्या पत्नीपुत्रांत गुरफटल्यामुळें मकरंद तिला सिनेमाला नेत नसेल असें वाटून त्यांनीं म्हटलें, "कां ग? दादा नाहीं तुला नेत?"

" अं. तसं नाहीं. तो चल म्हणतो कीं, पण मीच नाहीं जात, माझं—माझं—किनई सिनेमा पाहिल्यानें डोकें दुखूं लागतें—"

" होय! अगबाई! मग डॉक्टरांना विचारूं नयेस ग?" उमा-बाई कळवळ्यानें म्हणाल्या.

त्यामुळें कल्पनेची स्थिति कठीण झाली. तिनें डोकेंदुखीची सबब उगीच पुढें केली होती. पण आतां तसें कबूल कसें करणार?

खरंच. असत्यभाषण ही सुद्धां एक कलाच आहे! इतर कला-प्रमाणें ह्या कलेलासुद्धां अभ्यासाची आवश्यकता असते! आणि कल्पनेला आजवर ही कला अवगत नव्हती. पण मिलिंदकुमाराच्या त्या विचित्र वागण्यापासून कल्पनेला हें असत्य भाषणाचें शास्त्र परि-चित होऊं लागलें होतें!

मिलिंदकुमाराची आपल्याला पर्वा नाहीं अशी ती आपल्या व इतरांच्याहि मनाची आतां फसवणूक करूं लागल्यामुळें त्या अनु-षंगानें तिला वेळीं प्रसंगी असें थोडें फार खोटें बोलणें भाग पडूं लागलें होतें!

वस्तुत: तिला सिनेमा फिल्म पहाणें फारच आवडत असे. अमे-रिकन् फिल्म्स व त्यांमधील सुविख्यात नट, नटी, ह्यांबद्दल तिला अद्ययावत् माहिती असे. व इंग्रजी चित्रपट पहाण्याचा मिलिंदकुमा-रांनाही तेवढाच नाद असल्यामुळें ते, कल्पना व मकरंद आठवड्यांतून दोन वेळां तरी सिनेमाला जात.

आणि मिलिंदकुमारांबरोबर गप्पा मारीत, चित्रपटाच्या गुणदो-षांची चर्चा करीत तो पहाण्याची गंमत तिला और वाटत असे. व त्यामुळें नंतर जेव्हां मकरंद मोहिनी व ती अशी तिघें एका चित्र-पटाला गेलीं तेव्हां तिला फार चुकल्यासारखें झालें. तिला मिलिंद-कुमारांची वारंवार आठवण येऊं लागली व म्हणून तेव्हांपासून तिनें चित्रपट पहाणें जवळजवळ वर्ज्यच केलें.

पण हें खरें कारण उघड सांगावयाचें नसल्यामुळें तिनें डोकें-दुखीचें निमित्त सांगून दिलें व मग डॉक्टरांचा सल्ला घेण्याची उमाबाईंनीं सूचना करतांच तिला पुनः असत्याचा अवलंब करणें भाग पडून ती म्हणाली " मी विचारलं एकदां डॉक्टर मोघ्यांना." ते म्हणाले डोळ्यांच्या डॉक्टरांकडून तपासणी करण्याची आवश्यकता नाहीं. दिवसभर शाळेंत डोकंफोड केल्यामुळें डोकं दुखत असणार.

ह्यावर " मग दिवसभर अशी डोकंफोड करावी कां " असें विचारण्याची उमाबाईंना इच्छा झाली. पण तेवढ्यांत त्यांना आठवण झाली कीं, हा विषय वर्ज्य आहे. त्यामुळें त्या गप्प राहिल्या.

आईकडे असत्यभाषण केल्याची जाणीव होत असल्याकारणानें कल्पनेला जरा ओशाळे वाटलें. व म्हणून केल्या अपराधाचें जणूं परिमार्जन करावें म्हणून ती आईकडे मग कितीतरी अघळपघळ बोलली.

पुण्यांत उमाबाईंच्या कुणाशी ओळखी झाल्या; त्या फिरावयाला वगैरे जातात काय ! वगैरे चौकशा तर तिनें केल्याच. पण आई, वडील व आपण मिळून काय, काय पहावयाचें, कुठें जावयाचें, कशी मजा करावयाची हें सुद्धां तिनें बोलून टाकलें.

फक्त स्वतःविषयींची खरी वस्तुस्थिती खेरीज करून कल्पना आईशीं व वडिलांशी पूर्ण मोकळेपणानें व लहानपणींच्या लडिवाळ-पणानें वागत होती.

एवढेंच नव्हे तर दिवाळी ८ दिवसांवर आल्यामुळें उमाबाईंनीं

फराळाच्या जिनसा बनवावयाला सुरवात करतांच कल्पना म्हणाली, "आई; आपण दोघी मिळून छान छान पक्वान्न करूं या हं."

आणि तिचा हा उद्‌गार ऐकून उमाबाईंना सानंद आश्चर्य वाटलें.

कारण आजपर्यंत कल्पनेनें स्वयंपाकाच्या बाबतींत कधींच मन घातलें नव्हतें. तिला त्यांत कमीपणा वाटत होता असें नव्हे. पण तिचें वागणेंच जरा पुरुषी थाटाचें असे. त्यामुळें आतां एकदम तिला ही स्फूर्ति होतांच उमाबाईंनां आश्चर्य वाटलें, आनंदहि वाटला. पण त्यांच्या मनांत आलें, साधा स्वयंपाकसुद्धां करण्याची जिथें हिला संवय नाहीं, तिथें अशी पक्कानें करणें कसें जमणार !

पण कल्पनेनें तें उत्तम जमवून दाखविलें.

लाडू, काप, अनारसे, चिरोट्या, चकल्या, कडबोळी वगैरे सारे पदार्थ आईच्या हाताखालीं तिनें सुरेख केले. व ते पाहून उमाबाईंना लेकीचें अतिशयच कौतुक वाटलें. आणि लेकीकडे तिच्या विवाहाचा उल्लेख करावयाचा नाहीं ह्या निश्चयाचा विसर पडून त्या उद्गारल्या; " माझी बाळ नुसती अभ्यासांतच हुषार नाहीं बरं. पहा म्हणावं ह्या जिन्नसा. माझी पोर कसा ठाकठीक संसार करील पण देव नाहीं ना तिला तशी बुद्धि देत."

आपल्या आजवरच्या वर्तनाला अनुसरून कल्पनेनें वास्तविक आईच्या ह्या भाषणाचा निषेध तरी केला असता किंवा तिकडे दुर्लक्ष तरी केलें असतें. पण तिनें ह्यांपैकीं कांहींच केलें नाहीं.

स्वतःच्या पाककुशलतेबद्दल तिला समाधान वाटलें होतेंच. व आईनें त्या विषयीं कौतुक करतांच तिला आनंद झाला; परंतु तिनें त्यासाठीं आईचें हें बोलणें ऐकून घेतलें असें नव्हे.

हल्लीं तिच्या मनोवृत्तींत थोडाथोडा फरक पडत चालला होता. आतां तिनें उमाबाईंचा हा उद्गार तर ऐकून घेतलाच पण त्यावर ती हंसून म्हणाली, " पण आई, मी लग्न करणार नाहींच असें कशावरून ? करीनसुद्धां कदाचित्."

आणि ह्या तिच्या उत्तरानें तर उमाबाई स्तिमितच झाल्या. जहाल पक्षाचा पुढारी एकाएकीं मवाळ पक्षाला सामील झाला हें कळल्यानें जेवढें आश्चर्य वाटणार नाहीं तेवढें आश्चर्य कल्पनेच्या ह्या उत्तरानें उमाबाईंना वाटलें !

आजन्म आपण अविवाहित रहाणार असें घोकणाऱ्या कल्पनेच्या तोंडून असें शब्द बाहेर पडले ?—

परंतु उमाबाई शहाण्या होत्या, त्यांना जगाचा अनुभव होता. त्यामुळें त्या ह्यावर कांहींच बोलल्या नाहींत,

आणि मौज अशी कीं, थोडक्या अवधींत आपल्या निश्चयांत पडलेल्या ह्या फरकाची कल्पनेला जणूं जाणीवहि नव्हती !

मनुष्यस्वभावाचा हा धर्मच आहे ! दुसऱ्याच्या वर्तनांतला किंवा बोलण्यांतला धरसोडपणा माणसाच्या लगेच लक्षांत येतो. आपल्या अंगांतील तेच दोष मात्र त्यांच्या गांवींहि नसतात !

बाकी म्हणूनच मनुष्याचें स्वत बद्दल उच्च मत असूं शकतें, कारण दुसऱ्यांच्या बाबतींत उपयोगाला आणलेली, काटेकोर दोषान्वेषणपद्धति जर प्रत्येक मनुष्य स्वतःच्या बाबतींत लावील तर त्याला आपल्यामध्यें दोषच दोष दिसूं लागतील व मग स्वतःबद्दल

त्याला इतकी तुच्छता वाटूं लागेल कीं त्याच्या हातून कांहींच पराक्रम होऊं शकणार नाहीं.

तेव्हां चोरून दूध पितांना डोळे झांकून घेण्याच्या मांजराच्या वृत्तीप्रमाणें स्वतःच्या दोषाकडे न कळत डोळेझांक करण्याची भावना ईश्वरानें माणसाच्या अंतःकरणांत मुद्दामच उत्पन्न केली असणार !

नाहींतर कल्पनेच्या तोंडून तो उद्गार निघालाच नसता ।

## प्रकरण १३ वें .... मोहिनीनें केलेला मैत्रीचा प्रयोग !

पुण्याला आईवडिलांच्या सहवासांत पंधरा दिवस घालवून कल्पना मुंबईला आली. तिची मनःस्थिति आतां खूप सुधारली होती. ती जणूं पुनः लहान बालिका बनली होती. व आतां मुंबईला दादा, वहिनी व अरुण ह्यांच्या संगतींत खूप रहावयाचें, घर व शाळा ह्याव्यतिरिक्त जग नाहींच असें मानावयाचें वगैरे सर्व तिनें ठरवून टाकलें होतें.

पंख फुटलेला पक्षी घरट्याबाहेर भरारी मारूं पहातो. त्याप्रमाणें तरुण वयांत मानवी हृदयालाही पंख फुटतात व घराबाहेरील जगांत भरारी मारण्याची त्याला आवड वाटते. मध्यंतरीं कल्पनेच्या हृदयालाही अशी आवड वाटत होती. पण आपल्याला अद्यापि पंख फुटले नाहींतच, तारुण्याऐवजीं आपण अद्यापि बाल्यांतच विहरत आहों असें मानण्याचा तिनें निश्चय केला. व त्याबरोबरच आपापल्या संसारांत गुरफटलेल्या मैत्रिणींचा पाठलाग करण्याच्या भानगडींत पुनः पडावयाचें नाहीं हेंही तिनें ठरविलें होतें.

पण मानवी आशा विरुद्ध देवाची इच्छा हें जेवढें खरें आहे

तेव्हढेंच आपली आशा विरुद्ध नातलगांची इच्छा हेंही खरें आहे. आतां कल्पनेच्या आशेविरुद्ध मोहिनीची इच्छा जोरदार ठरली !

मुंबईला आल्यावर आपल्या नव्या निश्चयानुसार कल्पना मोहिनी-कडे चांगली हंसून, खेळून वागूं लागली. दादा, वहिनी व अरुण ह्या तिघांमध्यें ती अगदीं रंगून गेली.

आणि नंतर ३।४ दिवसांनीं एक अपरिचित हस्ताक्षरांतील पत्र तिच्या नांवें आलें.

लिफाफ्यावरील हस्ताक्षराकडे ती क्षणभर कुतूहलानें पहात राहिली.

चटदिशीं तिच्या मनांत आलें, मिलिंदकुमारांकडून तर हें पत्र आलें नसेल ना ?

पण ही कल्पना तिनें लगेच धुडकावून लाविली.

कारण मिलिंदकुमारांचें हस्ताक्षर जरी तिनें पाहिलें नव्हतें. तरी ह्या लिफाफ्यावरील बारीक, किरपिट अक्षर त्यांचें असेल असें तिला वाटेना !

शेवटीं ही 'भवति न भवति' थांबवून तिनें लिफाफा फोडला व आंतील पत्रावर ओझरती नजर टाकून आधी सही वाचली.

यशवंत गणपत चिपळूणकर.

ही सही वाचून कल्पना स्तंभितच झाली.

वाय्. जी. चिपळूणकर म्हणजे त्या चौघां विद्यार्थ्यांमधील चौथा पण ह्यानें आज पत्र कां पाठविलें ? गिचमिट अक्षरांचें तें पत्र कल्पनेनें वाचून संपविलें व सार काढलें कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं

८ वाजतां ह्या चिपळूणकराची स्वारी आपल्याला भेटावयाला येणार आहे.

ह्या बातमीनें कल्पनेला मुळींच आनंद किंवा उत्सुकता वाटली नाहीं. पण आतां हा गृहस्थ जर आपण होऊन येतो आहे व तेंहि दुसऱ्या दिवशीं सकाळीं, तर त्याला नको कसें म्हणणार !

तेव्हां कल्पना 'आलिया भोगासी सादर' झाली.

तिनें मोहिनीला ह्या पत्राबद्दल कळविलें. पण तें पत्र वाचतांच कल्पनेला जेवढें आश्चर्य वाटलें तितकें मोहिनीला वाटलें नाहीं. परंतु दुसऱ्या दिवसाबद्दल विवंचना करण्यांत गढल्यामुळें कल्पनेच्या तें लक्षांत आलें नाहीं.

शेवटीं एकदांचा दुसरा दिवस उजडला. आठ वाजले. सव्वा आठ झाले. व साडे आठ वाजतां चिपळूणकर उगवला.

त्याला पाहतांच कल्पनेच्या अंगावर शहारेच आले.

कॉलेजमध्यें अंगानें काटकोळा व दिसावयाला बावळट असणारा हा स्कॉलर आतां जरा तरी सुधारला असेल असें वाटलें तिला.

पण चिपळूणकरांमध्यें सुधारणा !—हं ! त्याचें शरीर म्हणजे निव्वळ अस्थिपंजर होतें. पाठीला पोंक आलेलें, छाती आंत गेलेली, वीतभर उंच मानेचा कांटा, डोक्याला भलं थोरलं टक्कल, डोळ्यांना जाड भिंगाचा चष्मा व बगळ्यासारखे बारीक, किरकोळ पाय, हें सारें ध्यान पाहून कल्पना थक्क झाली.

अकालीं वार्धक्य आलेला हा नामधारी तरुण आपला सहाध्यायी होता, तो आपला समवयस्क आहे ही घटना तिला अजब वाटली !

काय बोलावें तें तिला सुचेनाच.

पण चिपळूणकरानें ह्या संकटांतून तिला सोडविलें. डोळे मिचमिच करीत तो म्हणाला, " हें बघा, मिस् बापट, मला वेळ थोडा आहे. हल्लीं मी संस्कृत शिलालेख, ताम्रपट वगैरेंचें संशोधन करीत असतों. मोठ्या त्रासाचें कठीण काम असतें तें. वेळ फारच लागतो. तेव्हां अधिक प्रस्तावना न करितां मीं मुख्य विषयाकडे वळतो."

ह्या स्वारीचा मुख्य विषय काय असेल ह्याचा कल्पनेला अंदाज करितां येईना.

पण तिला फार वेळ विचारांत न ठेवतां चिपळूणकर म्हणाला, " मिस् बापट, माझी तुमच्याशीं विवाह करावयाची इच्छा आहे."

" काऽऽय ! " विस्मयोच्च स्वरांत कल्पना उद्गारली.

वास्तविक, कॉलेजमध्यें असतांना चिपळूणकराची ही इच्छा होती हें तिला ठाऊक होतें. पण त्यावेळीं सुद्धां तिला त्याची ही इच्छा संमत नव्हतीच. पण आतां तो अगदीं खप्पड व पोक्त दिसत असतांहि त्याची ही इच्छा कायम आहे हें ऐकून तर तिला फार आश्चर्य वाटलें. त्याची ही इच्छा तिला हास्यास्पद वाटली.

आणि त्याच क्षणीं तिच्या डोळ्यासमोर मिलिंदकुमारांची मूर्ति उभी राहिली. व ते आणि चिपळूणकर ह्या दोघांमधील विलक्षण तफावत ध्यानांत येतांच त्याच्या ह्या इच्छेचा तिला राग आला.

आपला आवाज शक्य तेवढा स्थिर ठेविण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली, " पण मी तुमच्याबरोबर विवाह करीन असें वाटण्याचें कारण काय ? "

# मोहिनीनें केलेला मैत्रीचा प्रयोग!

" कारण ? म्हणजे त्याचें असें झालें, चार दिवसापूर्वी मला एक निनावी पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें कीं, मिस् बापटबरोबर लग्न करण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्ही त्यांना तसें कां सांगत नाहीं ?—तेव्हां मला वाटलें कीं, पहावा प्रयत्न करून. "

" आणि आजवर नाहीं तुम्हाला असं वाटलें ? "

" वाटलं हो. पण तुम्ही विवाह करणार नाहीं असें आधीं म्हणत होतां नि नंतर ऐकलं कीं, मिलिंदकुमार पटवर्धन ह्यांच्याबरोबर तुमचा विवाह होणार... "

कल्पनेची शांतता आतां ढळली. चिडक्या स्वरांत ती म्हणाली, " मला लग्न करावयाचेंच नाहीं, समजलांत ? "

" बरं, येतो तर मी. " चिपळूणकरानें लगेच म्हटलें.

तो निघून गेल्यावर कितीतरी वेळ कल्पना स्वतःशीं विचार करीत बसली होती. चिपळूणकर, त्यानें घातलेली मागणी व त्याला आलेलें निनांवी पत्र ह्या तिन्ही नव्या घटना होत्या. पण कल्पनेचें विचारचक्र त्याच्याभोंवतीं फिरत नव्हतें.

तिचे विचार मिलिंदकुमारामध्यें केंद्रीभूत झाले होते. आणि विशेषतः " नंतर ऐकलं कीं, तुमचा मिलिंदकुमाराबरोबर विवाह होणार... " हें चिपळूणकराच्या तोंडचें वाक्य तिला पुनः पुनः आठवत होतें.

खरं म्हटलं तर कल्पनेच्या विचारांचा पल्ला मिलिंदकुमारांच्या बाबतींत इतका दूर क्वचित्‌च जात असे. तिच्या बोलक्या, सहवासप्रिय विनोदी वृत्तीला मिलिंदकुमारांच्या तसल्याच वृत्तीचें आकर्षण

वार्ट. हा सहवास अधिक दिवस टिकला असता तर त्याचें विवाहांत पर्यवसान व्हावें अशी ओढ तिच्या मनाला लागली नसतीच असें सांगतां येत नाहीं. पण अशी ओढ अद्यापि तिच्या मनाला पूर्ण वेगानें लागली नव्हती.

आतां चिपळूणकरानें तसा उल्लेख करितांच मात्र तो विचार तिच्या मनांत पुन: पुनः घोळूं लागला.

आणि मग मिलिंदकुमारांच्या स्वरूपाशीं व धिप्पाड देहबांध्याशीं चिपळूणकराच्या यथातथा रूपाची व काटकोळ शरीराची तुलना करण्यांत ती कितीतरी वेळ गढून गेली !

## प्रकरण १४ वें .... .... शिळ्या कढीला ऊत

त्या दिवशीं कल्पना जरा बेचैनच होती. शाळेंतून रजा घेऊन ती दोनप्रहरींच घरीं आली.

सकाळच्या चिपळूणकराच्या मुलाखतीविषयीं ती मोहिनीकडे कांहींच बोलली नव्हती. त्यामुळें तिला अवेळीं आलेली पाहून चकित झालेल्या मोहिनीनें विचारलें, " हें काय वन्सं, इतक्या लौकर शाळा सुटली ! "

" अंहं. मी लौकर घरीं आलें. मला आज जरा बरं वाटत नाहीं. "

" होय ! काय होतं आहे ! आज किनई हवाच खराब पडली आहे. मघां अरुणसुद्धां ४।५ वेळां शिंकला. "

जातिवंत माता होती मोहिनी ! नणंदेच्या प्रकृतीच्या चौकशी-वरून ती आपल्या मुलाच्या प्रकृतीकडे वळली !

किंचित् हंसत कल्पना म्हणाली, ' अंहं, अरुणाप्रमाणें मला शिंका बिंका नाहीं आल्या. माझं डोकं चढलंय जरा."

थोडें थांबून ती पुढें म्हणाली, " वहिनी, सकाळीं तो चिपळूणकर आला होता त्याला पाहिलास तूं ? "

" होय बाई. तरी मीं ओझरताच पाहिला. पण खोकं झालंय नुसतं. त्याला पाहून मीं थक्कच झालें. "

" नि त्याचं भाषण ऐकून आणखीच थक्क होशील. अग, त्यानें मला लग्नाची मागणी घातली. "

पण आणखी थक्क होण्यासारखी ही बातमी ऐकून मोहिनीच्या तोंडावर कल्पनेच्या अपेक्षेनुसार जादा आश्चर्य कांहीं व्यक्त झालें नाहीं.

तोंडाला पदर लावून मोहिनी हळूंहळूं हंसूं मात्र लागली.

तिच्या ह्या वर्तनाचा कल्पनेला उलगडाच होईना. मोहिनीला एवढें हंसावयाला झालें काय ?

शेवटीं किंचित् रागानें ती म्हणाली, " हें ग काय वहिनी अशी हंसतेस काय उगीच ? "

" अहो, हंसूं नको तर काय करूं ? वन्सं, चिपळूणकराचं हें शुक्लकाष्ट मींच तुमच्या मागें लावून दिलं. "

" म्हणजे ? " कल्पना आश्चर्यातिरेकानें उद्गारली.

" म्हणजे असं कीं, त्या दिवशीं आपला तो कॉलेजमधील फोटो तुम्हीं दाखविलांत नि त्यांतील आपल्या वर्गभगिनींच्या नांवाची चौकशी केल्यावर तुम्हीं पहिल्यांदा नेमक्या चौघा विद्यार्थ्यांच्या नांवाची चौकशी केलीत. त्यांत हा चिपळूणकर होता. तेव्हां माझ्या मनांत आलं कीं, हा चांगला हुषार आहे नि त्या दृष्टीनें तुमच्या योग्यतेचा आहे. "

" तें–तें–पाप्याचं पितर ? "

" अहो, पण तो अगदींच इतका काडी पहिलवान झाला आहे हें मला काय ठाऊक ? म्हटलं जर तुमचा लग्नाचा विचार असेल तर द्यावी त्याला एक संधि नि म्हणून धाडलं मीं त्याला निनांवी पत्र." मोहिनी हें हंसत हंसत बोलली. पण तिच्या शब्दागणिक कल्पनेच्या रागाचा पारा चढत होता.

चिरडीच्या स्वरांत कल्पना उत्तरली, " फार छान केलंत हं हें आपण. पण वहिनीसाहेब, सांगून ठेवतें आपल्याला, मला मुळीं लग्नच करावयाचं नाहीं. "

झालं ! कल्पनेच्या हटवादी स्वभावानें पुनः उसळी मारली !

लहान मुलें हट्टी नि लहरी असतात असें आपण म्हणतों. पण तरुणजन नि त्यांतून प्रेमी तरुणजन कितीतरी अधिक हट्टी नि लहरी असतात !

मध्यंतरीं किंचित् ओसरलेला कल्पनेचा अविवाहित रहाण्याचा निश्चय तिनें आतां पुनः दृढ केला.

क्षणिक लहरीला बळी पडून तिनें शिळ्या कढीला हा ऊत आणला !

बाकी हा ऊत नांवालाच होता ! तिच्या बडबडण्यांत आतां पूर्वींचा दम नव्हता. केवळ आतां असें न बोलल्यास आपला कमीपणा दिसेल असें वाटून ती हें बोलली.

अविवाहित रहाण्याबद्दलच्या तिच्या पूर्वींच्या निश्चयाचा अर्थ खरो-खरींच लग्न करणार नाहीं असा होता आणि आतांच्या ह्या निश्चयाचा

अर्थ मिलिंदकुमाराखेरीज कुणाबरोबर लग्न करणार नाहीं असा होता. बाकी हें तिनें कबूल केलें नसलें तरी ह्याची मनाला जाणीव असल्यामुळें वड्याचें तेल वांग्यावर ह्या नात्यानें तिनें मोहिनीवर राग धरला !

आतां ह्यांतील ' अंदरकी बात ' अशी होती कीं, आपल्याशीं लग्न करण्याची चिपळूणकराची योग्यता आहे असें गृहीत धरण्यांत मोहिनीनें मिलिंदकुमारांचा अपमान केला अशी चुणूक कल्पनेच्या मनाला जांचत होती !

पण मिलिंदकुमारांच्या मानापमानाशी तुझा संबंध काय असा प्रश्न जर कुणीं तिला विचारला असतां तर त्याचें उत्तर तिनें कसें दिलें असतें कोण जाणें !

शिवाय ह्यांत दुसरी अशी मख्खी होती कीं, इतर कुणाबरोबर आपला विवाह व्हावा हा विचार वहिनीच्या मनांत आला ह्याचा अर्थ मिलिंदकुमारांबरोबर आपला विवाह होणें शक्यच नाहीं असा निघतो हें कल्पना समजली. व वहिनीला म्हणजे पर्यायानें बहुतेक दादालाहि मिलिंदकुमारांविषयीं पूर्ण निराशा वाटत आहे असा ह्याचा अर्थ तिनें लाविला.

व त्यामुळें ती अतिशय निराश झाली. आणि मोहिनीवर फुरंगटून बसली.

वास्तविक मोहिनीची विशेष चुकी नव्हती. आणि हें कल्पनेला सुद्धां कळत होतें पण वळत नव्हतें.

आपला स्वभाव दिवसानुदिवस फार चिडखोर बनतो आहे हें तिला समजत होतें पण ती त्याला आळा घालूं शकत नव्हती.

फार काय ? एकाद्या वेळीं ती अजाण अरुणावर देखील चिडे.

अरुण हल्लीं फार खेळकर व खोडकर झाला होता. तो घरभर रांगत असे. आणि त्याच्या ह्या पराक्रमाला बाकी घर अपुरें पडल्यामुळें कीं काय हल्लीं रोज तो आपल्या आत्याबाईच्या खोलींत येई. व मग हाताला लागतील त्या वस्तु तो अस्ताव्यस्त पसरून टाकी.

पहिल्यांदा कल्पनेनें तिकडे दुर्लक्ष केलें, तो त्याला उचलून खोलीबाहेर ठेवी किंवा असा धुमाकूळ न घालण्याबद्दल त्याला बजावी. पण त्याला तिच्या खोलीबद्दल इतकें आकर्षण कां वाटत असें कोण जाणे !

कल्पनेच्या गैरहजेरींत तो अचूक तिच्या खोलींत जाई व तिनें व्यवस्थित ठेवलेले कागद व चोपड्या विस्कटून टाकी.

तेव्हां एक दिवस अर्धवट चेष्टेनें व अर्धवट मनापासून कल्पना मोहिनीला म्हणाली, " वहिनी, मीं घरांत नसतांना अरुणावर जरा लक्ष ठेवीत जा ग. मला व्यवस्थितपणाची फार आवड आहे नि हा गुलाम सारं विस्कटून टाकतो. "

" मुलं घरांत असलीं कीं असं व्हावयाचंच. " मोहिनी अभिमानानें उत्तरली.

ह्यावर कल्पना कांहींच बोलली नाहीं. कारण चिपळूणकर प्रकरणापासून तिच्या मनांत मोहिनीबद्दल पुनः अढी उत्पन्न झाल्याकारणानें ती हल्लीं तिच्याकडे वाजवीपेक्षा अधिक बोलत नसे.

दुसऱ्या दिवशीं घरीं येऊन कल्पना पहाते तर तिनें सकाळीं

काढून ठेविलेल्या संस्कृतच्या चार प्रश्नपत्रिका अरुणानें फाडून टाकलेल्या.

वास्तविक प्रश्नपत्रिकांच्या पुऱ्या चिंध्या झाल्या नव्हत्या. मधला थोडा थोडा भाग गहाळ झाला असला तरी साधारणपणें बराचसा मजकूर जुळवितां आला असता.

पण ७।८ तास खर्च करून केलेल्या श्रमांची ही अवस्था पाहून कल्पनेला फार वाईट वाटलें व राग आला.

तिनें कागदांचे ते तुकडे हातांत घेऊन आणखीच फाडून टाकले व उच्च स्वरांत मोहिनीला हांका मारल्या, " वहिनी, ए वहिनी. "

जवळजवळ धांवतच मोहिनी तिथें आली.

" वहिनी, " क्रोधकंपित स्वरांत कल्पना म्हणाली, " पाहिलास हा आपल्या लेकाचा पराक्रम ! "

" काय झालं वन्सं ? "

" काय झालं ? मोठ्या श्रमानें मीं संस्कृतचे चार पेपर्स काढून ठेवले होते नि अरुणानें ते फाडून टाकले. तूं त्याच्यावर लक्ष कां ठेवीत नाहींस ! "

" कुठवर लक्ष ठेवणार मीं एकटी ! नारायणाला पुनः मलेरीयानें आज गांठलं. त्यामुळें दोन प्रहरीं चहा व शिरा मींच केला. आणि रात्रीच्या जेवणाचीहि थोडी तयारी करून ठेवली. पांडूहि त्या-वेळीं कामांत होता. मग अगदीं डोळ्यांत तेल घालून कोण अरुणा-वर पहारा करणार ? त्यापेक्षां तुम्हींच आपले महत्त्वाचे कागद असे हातीं लागतीलसे ठेवावयाचे नव्हते. "

"हो, हो, सारी माझीच चुकी अरुणला माझ्या खोलींत तूं येऊं दिलंस ती तुझी चुकी नव्हे ना ?"

"अगबाई ! वन्स, एकटा एक भाचा तुमचा. त्याचं तुम्हीं कौतुक करावयाचं तें राहिलंच. नि तोच बिचारा तुमच्या खोलींत धांवत येतो तर तें देखील चालत नाहीं ना तुम्हांला ?" मोहिनीनें किंचित् खोंचून विचारलें.

त्याबरोबर कल्पना उसळून म्हणाली; "हो, हो, नाहीं चालत मला. मुलांचे भलते लाड करणं मला मुळींच आवडत नाहीं. मला व्यवस्थितपणाची फार आवड असल्यामुळें अरुणनें असा खोलींत पसारा केलेला मला नाहीं खपायचा."

"मग उद्यांपासून खोलीच्या दाराला कुलूप ठोकीत जा." मोहिनीनें सरळ मार्ग सुचविला. मात्र तो सरळ स्वरांत सुचविला नाहीं. अरुणच्या बाललीलांवर कल्पनेनें राग काढल्यामुळें तिच्या मातृहृदयाला आलेली चीड तिच्या स्वरांत ध्वनित होत होती.

आधींच चिडलेली कल्पना ह्यामुळें फारच रागावली व चिडक्या रडव्या स्वरांत उद्गारली, "त्यापेक्षां, तुम्हीं ह्या घरांत राहूं नका असंच सांग ना."

ह्यावर मोहिनी जरा मवाळपणें म्हणाली, "मीं कां तसं म्हणूं ? घर तुमच्या भावाचं आहे."

"नि तसं तुझ्या नवऱ्याचं आहे ना" कल्पना फुसफुसली.

तिचे डोळे पाण्यानें भरले होते. नाक व गाल रागानें लाल झाले होते व ओंठ थरथरत होते.

आतां अधिक न बोलणें योग्य असें वाटून मोहिनी बाहेर गे

त्याबरोबर कल्पनेनें दाराला कडी लाविली व ती पलंगावर पडून रडूं लागली.

रडण्याचा पहिला आवेग ओसरल्यावर मन असें अनावर होऊं दिल्याबद्दल तिची तिलाच लाज वाटूं लागली.

अरुणानें पेपर्स फाडल्यामुळें तिचे श्रम फुकट गेले, त्या दृष्टीनें तिचें नुकसान झालें तरी त्यासाठीं तिला इतकें रडूं येण्याचें कारण नव्हतें. असें आपल्याला काय झालें तेंच तिला कळेना !

कल्पनेनें मानसशास्त्राचा अभ्यास केला असता तर तिला कळलें असतें कीं, केवळ ह्या पेपर्सच्या घटनेमुळें आपल्या मनाचा बांध फुटला नाहीं. तर हल्लीं कांहीं महिने तिच्या मनाला कळत, नकळत जो पुष्कळ ताण पडला होता व तो बाहेर दिसूं नये म्हणून मनावर दाब देऊन ती कृत्रिम देखावा जो दाखवीत होती त्याचा—मनावर ठेविलेल्या अनैसर्गिक अतिदाबाचा--हा परिणाम आहे. त्यामुळें मन साहजिकच हळुवार व कमकुवत बनलें व त्याचा बांध फुटावयाला हें क्षुल्लक कारणसुद्धां आतां पुरें झालें !

पण कल्पनेनें आपल्या मनःस्थितीचा इतक्या कसोशीनें विचार केला नव्हता. किंबहुना ती तसा विचार करूं इच्छित नव्हती. त्यामुळें आपल्या कमकुवतपणाची तिला लाज वाटली व ' शेषं कोपेन पूरयेत् ' ह्या नियमानुसार ती मोहिनीवर आणखीच गरम झाली. व मकरंद मोहिनीचा नवरा—जणूं तो आतां तिचा कुणी नव्हताच-म्हणून ती त्याच्यावरहि घुश्शांत होती.

त्या रात्रीं मकरंद तिला सौम्य स्वरांत म्हणाला, " कल्पने, तुझे कामाचे कागद आज अरुणानें फाडले म्हणे ! आतां उद्यांपासून तुझ्या खोलीच्या दाराला बाहेर जातेवेळीं कडी घालीत जा म्हणजे झालं. "

किती सरळ, योग्य सूचना ! पण कल्पनेच्या कडवटलेल्या मनाला ती गैर व कडू वाटली व ती आपल्या दादावरहि अभिमानानें रागावून बसली.

तिच्या बोलक्या स्वभावाला हा अबोला जाचूं लागला, तरी हट्टानें ती तसेच दिवस ढकलीत होती !

मनुष्य अन्नपाण्यावर जगतो. पण कल्पनेसारखें दुरभिमानी माणूस निव्वळ अभिमानावरच जगत असतें !



क. ८

## प्रकरण १९ वें .... .... .... स्वतंत्र रहाणी !

अशा रीतीनें ४।५ दिवस कसेतरी संपले. कल्पनेला ह्या स्थितीचा आतां कंटाळा आला होता. विशेषतः मकरंद व मोहिनी ह्यांचे परस्परांशीं चेष्टाविनोद व अरुणाशीं लाडिक संवाद होत ते ऐकून तर तिला फारच चुकल्यासारखे वाटे.

झोंपेच्या खोट्या सबबीवर खेळांत भाग न घेणाऱ्या माणसाला इतरांचा खेळ पाहून झोंपूं नये असेंच वाटतें पण मग खेळण्याची आवड अनावर झाली तरी ती पुरी करण्याची लाज वाटते व त्यामुळें मन खट्टू होतें. कल्पनेचें मन असेंच खट्टू होई.

तिला हल्लीं शाळेला जाण्याचासुद्धां उल्हास वाटत नसे. आज तर तिला शाळेला जाऊं नयेसेंच वाटत होतें. शाळेची वेळ होत आली तरी ती उगीच इकडे तिकडे करीत होती. हेतू हा कीं, दादानें किंवा वहिनीनें शाळेला उशीर होतो असें तरी आपल्याला सांगावें. पण मकरंद किंवा मोहिनी आतां कां तिच्याशीं आपण होऊन बोलतील !

कल्पनेनें त्यांच्याशीं अबोला धरला तरी त्यांनीं तिच्याशीं बोलण्याचे

पुनः पुनः प्रयत्न केले. परंतु तरीहि कल्पना त्यांच्याशीं त्यावेळीं बोलली नाहीं मग आतां पुनः कां तीं तिच्या वाटेला जातील !

तेव्हां कल्पना शाळेला न जातां घरीं राहिली असती तरी तिला कंटाळवाणेंच वाटलें असतें व म्हणून ती शाळेंत जात असे.

आज शाळेंत गेल्याबरोबर तिथल्या शिपायानें तिला मिस् मदरलँडच्या खोलींत जाण्याबद्दल निरोप सांगितला. व तो ऐकून कल्पनेला बरें वाटलें. कारण मिस् मदरलँडची तिच्यावर फार ममता होती. पण इतर शिक्षकिणींना तें रुचणार नाहीं म्हणून ती होऊन मिस् मदरलँडकडे बोलावयाला क्वचित्च जात असे.

घरच्या अबोल्याला कंटाळून गेल्यामुळें आतां मिस् मदरलँडबरोबर कामासंबंधीं व नंतर इतर विषयांवरून गप्पा मारतां येतील असें वाटून कल्पना उत्सुकतेनें प्रिन्सिपॉलच्या खोलींत शिरली.

तिला आलेली पहातांच पोक्त मिस् मदरलँड हंसून म्हणाल्या, "आलीस कल्पना, बस इथें. माझं तुझ्याकडे थोडं काम आहे. हें बघ, आपल्या शाळेच्या वसतिगृहामधील हिंदुविभागाची–पहाणी करणाऱ्या राधाबाई नोकरी सोडून जात आहेत. माझ्या मनांत आतां त्यांच्या जागीं एकादी तरुण व सुशिक्षित स्त्री नेमावयाची आहे. वसतिगृहांतील मुलींच्या जेवणाखाणाची व्यवस्था आपली रखमा पाहील पण मुलींना शिस्त लावणें, त्यांच्या अडचणी विचारणें व निवारणें, ह्या वसतिगृहात थोडेंफार घरगुती वातावरण निर्माण करणें वगैरे कामें करावयाला एकादी सुशिक्षित तरुण स्त्रीच हवी. व माझी इच्छा आहे कीं त्याचा स्वीकार तूं घ्यावास. इथें दुसऱ्या

मजल्यावरील एक स्वतंत्र खोली तुला राहावयास मिळेल व तिथेंच तुला रहावें लागेल. कारण मुलींची जबाबदारी सर्वस्वीं तुझ्यावरच रहाणार, आणि हें काम करून दिवसभर शिकविणें तुला जर त्रासदायक वाटेल तर तुझ्या वांट्याचे एक किंवा दोन पिरिअड् मीं कमी करीन. सध्यां तुला ऐंशी रुपये मिळतात. पण बोर्डिंग सुपरिंटेंडेंट व शिक्षकीण म्हणून पगार शंभर रुपये व रहावयाला खोली आणि जेवण फुकट एवढें तुला मी देईन. आहे कां हें तुला पसंत ? ”

पसंत आहे कां ? हं ! कल्पनेला हें फारच पसंत झालें. दादा-वहिनीला आपली फारशी पर्वा वाटत नाहींच हल्लीं. मग त्यांच्या घरीं रहा तरी कशाला ? असा विचार लगेच तिच्या डोक्यांत आला.

बस्स ! स्वतंत्र राहणीचा मोका आयता चालून आला आहे त्याचा उपयोग करून घ्यावयाचा !

कल्पनेला अतिशय आनंद झाला. तिनें मिस् मदरलँडना ताबड-तोब होकार दिला. मात्र आईवडिलांची परवानगी मिळाल्यावर अगदीं नक्की करावयाचें असें तिनें सांगून टाकलें. व लगेच शाळें-तूनच तिनें पुण्याला अण्णासाहेबांना त्या मजकुराचें पत्र पाठविलें.

अण्णासाहेब सूज्ञ होते. कल्पनेच्या ह्या पत्रांतील सूर त्यांनीं ओळखला. आपण परवानगी देण्यांतच मोठेपणा आहे; नाहींतर ती कदाचित् आपल्या परवानगीची पर्वाही बाळगणार नाहीं हे कल्पनेनें पत्रांत लिहिलें नसतांहि त्यांनीं ओळखलें.

शिवाय ‘ प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ’ हें सुभाषित मुलांच्यांच नव्हे तर मुलींच्याहि बाबतींत अण्णासाहेबांनीं आजवर

आचरलें होतें. त्यांतून आतां कल्पना मिळवती झाली होती. बरं, मिस् मदरलँडनाहि अण्णासाहेब चांगले ओळखीत होते. ती बाई फार सुशील व प्रेमळ असल्यामुळें कल्पनेला तिच्या नजरेखालीं स्वतंत्रता देण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यांना वाटलें. तेव्हां सर्व बाजूंनीं विचार करून व तें रमाबाईंना पटवून अण्णासाहे- बांनीं कल्पनेला आपली संमति कळविली. व त्यानंतर कल्पनेनें ही बातमी मकरंदाला व मोहिनीला कळविली. पूर्वीं हरेक गोष्ट दादाला सांगणारी कल्पना आतां एवढी बदलली !

तारुण्याचा व निसर्गाचा जोडप्रभाव हा ! लहानपणीं एक- मेकांच्या गळ्यांत गळा घालणारीं भावंडें तरुणपणीं एकमेकांचीं गळ- चेपी करायलासुद्धां कमी करीत नाहींत हेंच खरें !

लहानपणीं दादाकडे सतत गुजगोष्टी करणाऱ्या कल्पनेनें आतां त्याच दादाला चार शब्दांनासुद्धां महाग केलें.

मिलिंदकुमारासारखा परका तरुण तिला आपला वाटूं लागला व ह्या आपुलकीच्या भावनेबद्दल दादाला सहानुभूति वाटत नाहीं असें वाटल्यामुळें तिला आपला दादा परका वाटूं लागला !

दुसऱ्या दिवसापासून बोर्डिंग सुपरिंटेंडेंट या नात्यानें शाळेमध्यें रहावयास जावयाचें इतका नक्की बेत झाल्यावर तिनें मकरंदाला व मोहिनीला कळविलें.

हें तिचें करणें गैर वाटल्यामुळें मोहिनी खिन्न स्वरांत म्हणाली, " वन्सं, आत्तां आम्हांला कळवितां ! "

पण तिला लगेच दाबीत मकरंदानें म्हटलें, "मग त्यांत काय झालं? नक्की झालं नव्हतं म्हणून नसेल कळविलें!"

किती सहजीं व आस्थापूर्वक मकरंदानें बहिणीची बाजू सावरली. त्याच्या ह्या करण्यांत कल्पनेविषयींचें प्रेम चांगलेंच दिसून येत होतें. त्यामुळें हे शब्द ऐकतांच कल्पनेचे डोळे पाण्यानें भरून आले. क्षणभर तिला वाटलें, किती प्रेमळ माझा दादा-नि त्याच्यावर वृथा अभिमान धरून मीं घरांतून निघून जाते अं—

पण दुसऱ्याच क्षणीं तिची लहर पालटली. आपल्या कमकुवतपणाची तिला लाज वाटली. भलत्यावेळीं नि उगीचच डोळ्यांत दाटणाऱ्या अश्रूंचा तिला राग आला. व मन घट्ट करून तिनें आपला बेत कायम केला. आणि स्वतंत्र राहणीचा उपभोग घेण्यासाठीं, आर्थिक स्वातंत्र्याच्या जोरावर फुटलेल्या पंखांनीं स्वैर भरारी मारण्यासाठीं कल्पना दुसऱ्या दिवसापासून शाळेंत रहावयास गेली.

## प्रकरण १६ वें .... .... .... एका हृदयाची तळमळ

एकादी गोष्ट आपल्याला अगदीं अंतःकरणापासून हवीशी वाटत असली म्हणजे ती मिळावी अशी अपेक्षा करण्यांतहि आनंद वाटत असतो आणि ती मिळाल्यानंतर तर तो आनंद वाढतच जातो. म्हणजे अपेक्षेचा आणि प्राप्तीचा असा दुहेरी आनंद आपल्याला लाभतो !

पण ती गोष्ट खरोखरी तितकीशी आकर्षक वाटत नसली तर ती मिळेतोंवर अपेक्षेचा आनंद लाभेल तेवढाच ! ती गोष्ट प्राप्त झाल्यानंतर तो आनंद वाढणें तर बाजूलाच रहातें पण हा अपेक्षेचा आनंदसुद्धां कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें एकेका कलेनें क्षीण होऊं लागतो !

अगदीं थेट अशीच कल्पनेची स्थिति आतां झाली. आजवर आईवडिलांच्या प्रेमळ छत्राखालीं ती वाढली. आणि आतां क्षणिक लहरीला व अभिमानाला बळी पडून तिनें ही नवी नोकरी व स्वतंत्र रहाणी पत्करली.

आपल्या आर्थिक स्वातंत्र्याचें आतां साफल्य झालें असें तिला

वाटलें. संपूर्ण स्वातंत्र्याची मौज आतां चाखावयाला मिळणार ह्या अपेक्षेच्या आनंदांत ती होती. पण जन्मतांच मृत्यू पावणाऱ्या बालकाप्रमाणें तिचा हा आनंद अत्यंत अल्पजीवि ठरला !

आपलें सामानसुमान घेऊन मोठ्या हुरूपानें ती XX मिशन स्कूलच्या बिल्डिंगमध्यें रहावयास गेली. पण तें मोजक्या एका खोलींत रहाणें तिला कसेंचेंच वाटूं लागलें.

तिची मनःस्थितीच हल्लीं अशी कांहीं चमत्कारिक झाली होती कीं, क्षणांत तिला ती खोली लहान, अपुरी वाटे; तर क्षणांत कुठल्या-तरी अफाट जागेंत आपल्याला एकटीला आणून टाकलें आहे असें वाटून ती कासाविस होई !

त्याचप्रमाणें आल्या दिवशींच तिनें शिस्तींत मांडून ठेविलेलें सारें सामान आतां जसेंच्या तसें रहात असे. व्यवस्थितपणाची आवड असल्यामुळें वास्तविक तिला ह्याबद्दल आनंद व्हावा. पण अरुणानें खोलीभर दंगा करावा, आपले कागद व पुस्तकें विस्कटावी अशी इच्छा आतां तिला होऊं लागली.

आपल्याला असें काय होत आहे तेंच तिला कळत नसें. स्वतःच्या हृदयाची तिला जणूं नीट ओळखच पटत नव्हती. आजवर न अनुभवलेल्या चमत्कारिक, परस्परविरोधी भावना तिच्या हृदयांत असें थैमान घालीत कीं, हें हृदय आपलेंच आहे कीं दुसऱ्याचें आहे अशी तिला त्यावेळीं भ्रांति पडे !

बिचारी कल्पना ! पैशाच्या स्वातंत्र्याच्या जोडीला आतां आपल्याला रहाणीचें स्वातंत्र्य मिळणार ह्या आनंदांत ती होती. पण हें

रहाणीचें स्वातंत्र्य शर्करावगुंठित क्विनिनच्या गोळीसारखें फसवें निघालें.

वरून दिसावयाला स्वातंत्र्य पण वास्तविक पुरें पारतंत्र्य ! पूर्वी तिला ११ ते ४ असें पांच तासच बंधन असे. पण आतां सकाळीं ६॥ पासून रात्रीं १० पर्यंत ती बांधली गेली होती. म्हणजे एवढें १५।१६ तास तिला सारखें काम करावें लागे असें नव्हे, पण त्या अवधींत तिला शाळेच्या बाहेर जाण्याला मज्जाव होता. फक्त रविवारीं व सुट्टीच्या दिवशीं मात्र सकाळीं १० ते ६ तिला सुट्टी मिळे.

असल्या परतंत्र स्वातंत्र्याचा कल्पनेला पहिल्या चार दिवसांतच कंटाळा आला. पण करणार काय ?

वडिलांनीं किंवा भावांनीं जर ही नौकरी लावून दिली असती तर पहिल्या दिवशींच त्रागा करून तिनें ती सोडली असती ! परंतु—

ह्या परंतुनेंच कल्पनेचा जीव हैराण झाला ! आणि मानवी हृदय तरी असें विचित्र असतें कीं, दुःखापुढें त्यानें एकदां नमतें घेतलें कीं, त्या दुःखावर विजय मिळविण्याचा मार्ग त्याला जणूं सांपडतच नाहीं. आणि मग 'दुःखं दुःखानुबंधि' ह्या न्यायानें आतांपर्यंत निद्रिस्थ असलेलीं इतर दुःखेंहि जागीं होऊन त्याचा पाठपुरावा करूं लागतात !

कल्पनेचें हृदय ह्या बेगडी स्वातंत्र्याला कंटाळलें. सुख म्हणून जवळ ओढलें तें दुःख ठरलें. नि ह्या दुःखामुळें हळुवार बनलेल्या तिच्या हृदयाला दुसरीं दुःखें सतावूं लागलीं.

तिला एकसारखी आईवडिलांची, दादावहिनीची, अरुणाची,

फार काय, तिच्या जन्मापासून त्यांच्या घरीं असलेल्या नारायण स्वयंपाक्याची, घरच्या कुत्र्यामांजराची, इतकेंच नव्हे तर घरांतील निर्जीव सामानसुमानाचीसुद्धां आठवण होऊन वाईट वाटूं लागलें !

आणि याहिपेक्षां, ज्या भावनेचा विसर पडावा ह्या हेतूनें ती हल्लीं उद्योगाच्या पाशांतच मन गुंतवूं पहात होती ती भावना, मिलिंदकुमारांची आठवण, आतां अधिकच उद्दीपित होऊन तिच्या हृदयाला कासावीस करूं लागली !

एकदां कमकुवत झालेल्या शरीराला निरनिराळ्या व्याधि जशा तेव्हांच जर्जर करून सोडतात त्याप्रमाणें आधींच कमकुवत झालेल्या तिच्या हृदयाला ही स्मृति अतिशय व्यथित करूं लागली !

वसतिगृहातील कांहीं विद्यार्थिनी तिच्या आवडत्या होत्या. संध्याकाळीं ती त्यांच्याशीं गप्पा मारीत बसे. नि कांहीं वेळीं बोलतां बोलतां कसल्या तरी विषयावरून तिला चटूदिशीं मिलिंद-कुमारांची आठवण येई नि तिच्या हृदयाची तळमळ होई !

अशाच एकदां मुलीमुलींच्या गोष्टी चालल्या असतां त्यांतील शकुंतला नांवाच्या एका मुलीला इतर मुलींनीं गाणें म्हणण्याचा आग्रह केला.

तिनें हंसून हळूंच 'ताई' कडे—कल्पनेला वसतिगृहांतील सर्व मुली 'ताई' म्हणत— पाहिलें. कल्पनेला गावयाला येत नसलें तरी गाणें ऐकण्याची आवड होती. व मिलिंदकुमारांना गाण्याची फारच आवड असल्याचें ऐकल्यापासून तिचीहि गाण्याची आवड अधिक वाढली होती असें मकरंदानें पाहून ठेविलें होतें. आणि हें

खरेंहि होतें. मिळून कल्पनेनें शकुंतलेला गाणें म्हणण्याबद्दल लगेच उत्तेजन दिलें.

शकुंतलेचा आवाज गोड व कसदार होता. क्षणभर स्वतःशींच गुणगुणून तिनें एक कविता गावयास सुरवात केली.

मोकळ्या व मृदु आवाजांत ती गाऊं लागली.

" किति गोड गोड वदला,
हृदयीं गुलाब फुलला.
खुडुनी तयां पळाला,
कांटा रुतून बसला ! "

शकुंतला घोंळवून घोंळवून हें कडवें म्हणत होती.

कल्पना तिच्या गाण्याच्या सुरेल व गोड पद्धतीपेक्षां त्या कवितेंतील अर्थामुळेंच अधिक मुग्ध बनली.

थोड्या चढ्या आवाजांत शकुंतला पुढें गाऊं लागली.

" स्मृतिचा सुवास येई,
जिवा हा उलून जाई.
कांटा हळूंच हाले,
कळ येइ जीव विवळे. "

आणि ह्या ओळी ऐकतां ऐकतां कल्पनेचे डोळे भरून आले. मिलिंदकुमारांच्या सहवासाच्या स्मृतिचा सुवास आल्यामुळें तिचा जीव उलून गेला. आणि तिच्या हृदयांत रुतलेला कांटा हळूंच हलला-हृदयांत कळ आली. तिचा जीव विवळूं लागला !

आपली ही स्थिति मुलींच्या लक्षांत येईल ह्या भीतीनें कल्पना फार गांगरली व एकदम आपल्या खोलींत पळाली.

पण तिकडेसुद्धां शकुंतलेच्या गाण्याचे आलाप तिच्या कानांत घुमत होते. ' आणि " काटा हळूंच झाले, कळ येइ, जीव विवळे." हे शब्द तिच्या हृदयाला कासावीस करीत होते !

ह्यानंतर त्या मुलींबरोबर अशा गप्पा मारीत बसण्याचीहि कल्पनेला चोरी झाली. व ती एकटी, एकटीच राहूं लागली ! व त्यामुळें तिच्या हृदयाची तळमळ आणखीच वाढूं लागली.

सारें जगच आपल्यावर उलटलें आहे अशी हल्लीं तिची भावना बनली होती. पण आपल्या हृदयाची व्यथा जर तिनें कुणाकडे उघड केलीच नाहीं तर तिला इतरांकडून सहानुभूति मिळणार कशी ! आणि सहानुभूतीच्या अभावीं तिचें हृदय आंतल्या आंत पिचत होतें.

## प्रकरण १७ वें .... .... तळमळणारें दुसरें हृदय !

आणि जी स्थिति कल्पनेच्या हृदयाची होती तीच मिलिंद-कुमारांच्याहि हृदयाची होती ! कल्पनेबरोबर विवाह करण्याची आपली तयारी नाहीं. असें मकरंदाला चक्क सांगून मिलिंदकुमार त्याच्या घराची पायरी उतरून गेले. व नंतर १५।२० दिवस मुंबईत असूनहि ते एकदांसुद्धां तिकडे फिरकले नाहींत.

पण म्हणजे कल्पनेला भेटण्याची इच्छा त्यांना होतच नव्हती असें नाहीं. त्यांना ही इच्छा होत होती. फार काय संध्याकाळ झाली कीं त्यांचे पाय आपोआप कल्पनेच्या घराकडे वळूं पहात. कल्पनेकडे जावें. तिच्याबरोबर गप्पाविनोद करावा, हिंडाफिरायला जावें अशी अनिवार उत्सुकता त्यांच्या हृदयाला वाटे आणि ते प्रयत्नपूर्वक ती दाबून टाकत.

आपली विद्वत्ता, मान्यता व सुस्थिति ह्या व्यतिरिक्त निव्वळ आपणांवर एकादी तरुणी प्रेम करूं शकेल असें त्यांना मुळींच वाटत नव्हतें ना ! तेव्हां अशा तरुणीच्या अभावीं इतर कुणांबरोबर लग्न करणें अयोग्य आहे असें त्यांनीं ठाम ठरवून टाकलें होतें.

मनुष्यप्राणी बुद्धिप्रधान व त्याबरोबरच स्वाभिमानीहि असणें नैसर्गिक आहे. पण ह्या स्वाभिमानाचें दुरभिमानांत रूपांतर होणें इष्ट नाहीं ! स्वतःच्या कार्यक्षमतेबद्दल माणसाला योग्य तो अभिमान असावा पण अतिअहंमन्यता असूं नये !

मिलिंदकुमारांच्या अंगांतील अनेक गुणांशेजारीं हा अहंमन्यतेचा दोष वास करीत होता. स्वतःसंबंधीं त्यांची कांहीं औरच कल्पना होती ! ह्या अहंमन्यतेपायीं त्यांनीं आजवर आजूबाजूच्या माणसांना गैररीतीनें वागविलें होतें. आणि आतां ह्या दुर्गुणापायीं त्यांनीं स्वतःचाच तोटा करून घेतला.

कल्पना सर्व बाजूंनीं त्यांना शोभेशी होती. आजन्म अविवाहित रहाण्याच्या तिच्या प्रतिज्ञेला मिलिंदकुमारांनीं जो थोडाफार डळमळीतपणा आणला होता तो केवळ त्यांच्या अंतःकरणाच्या व सहवासाच्या माधुरीला ती मोहित झाल्यामुळें !

पण आपल्या दुरभिमानामुळें डोळे असून आंधळा बनलेल्या मिलिंदकुमारांच्या हें लक्षांत आलें नाहीं.

अविवाहित तरूणींकडे पहाण्याची त्यांची दृष्टि कायमचीच पूर्वदूषित होती. त्याकारणानें कल्पनेची मैत्री तोडून टाकतांच त्यांच्या हृदयाला जरी चुकल्यासारखें वाटलें तरीं त्यांनीं तिथें दुर्लक्ष केलें.

व तेवढ्यांतच त्यांची नाशिकला बदली झाली.

आणि त्यांना वाटलें, बरेंच झालें, मुंबई सुटली कीं मुंबईशीं निगडित असलेले स्नेहसंबंध विसरले जातील.

पण छेः ! आत्म्याप्रमाणें स्मृतीलाहि देश, काळ किंवा परिस्थिति ह्यांपैकीं कसलेंहि बंधन असूं शकत नाहीं.

मुंबईहून नाशिक बरेंच दूर, शिवाय जवळजवळ महिनाभर कल्पनेची भेट झाली नव्हती. पण तरीसुद्धां मिलिंदकुमार कल्पनेला विसरूं शकले नाहींत.

आपला हा दुबळेपणा आहे असें त्यांना वाटत होतें. परंतु त्यावर उपाय मात्र ते करूं शकत नव्हते. शेवटीं त्यांनीं ठरविलें कीं, दिवसभर कामांत व्यग्र असूनहि कल्पनेची आठवण ज्याअर्थीं बुजत नाहीं त्याअर्थीं हा आपल्या एकलकोंड्या जीवनाचा परिणाम असणार !

व हा शोध लाविल्यामुळें त्यांनीं नागपूरला आपल्या वडिलांना पत्र लिहून आपला धाकटा सावत्र भाऊ पद्मनाभ ह्याला नाशिकला पाठवून देण्याबद्दल कळविलें.

मिलिंदकुमारांचें हें पत्र मिळतांच त्यांच्या वडिलांना विष्णुपंतांना फार आश्चर्य वाटलें. कारण आज जवळजवळ पांच वर्षें मिलिंदकुमार मुन्सफाच्या हुद्यावर गांवोगांव फिरत असूनहि त्यांनीं एकदांसुद्धां आपल्या मंडळींना आपल्याकडे बोलाविलें नव्हतें. फार काय, दोन वर्षांपूर्वीं त्यांची सावत्र आई टायफॉइडमधून उठली तेव्हां हवापालट करण्यासाठीं तिला सातान्याला मिलिंदकुमारांकडे पाठविण्याची विष्णुपंतांची इच्छा होती. परंतु त्यांनीं पत्रानें तसें कळवितांच मिलिंदांनीं उत्तर पाठविलें कीं, आतां लौकरच आपली बदली होणार आहे

तेव्हां आजाऱ्याला हवेचा कांहींच फायदा न मिळतां विनाकारण दगदग होईल !

त्यामुळें आतां एकाएकीं त्यांनीं पद्मनाभाला आपल्याकडे बोलवितांच ती मंडळी चकित झाली.

पद्मनाभ सध्यां नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्यें ज्युनिअर बी.ए. च्या वर्गांत होता व टर्म सुरू होऊन २ महिने झाले होते.

मिलिंदकुमारांचें वागणें एरवीं असें तऱ्हेवाईक असलें तरी त्यांच्या वडिलांना मुलाबद्दल फार अभिमान होता. शिवाय मिलिंद कुमार आपल्या पगारांतून दरमहा वडिलांना बरीच मदत करीत; त्यामुळें त्या दृष्टीनें नांव ठेवायला जागा नव्हती.

परंतु जगांत पैशापेक्षां प्रेम श्रेष्ठ असतें ! आतां मिलिंदाकडून त्या प्रेमाचा थोडासा लाभ होतांच विष्णुपंतांनीं पद्मनाभाला हिस्लॉप कॉलेजांतून काढून नाशिकला पाठवून दिला.

अर्थात्‌च त्यांच्या अपेक्षेप्रमाणें मिलिंदकुमारांनीं पुष्कळ खटपट करून पद्मनाभाला नाशिकच्या कॉलेजांत ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत प्रवेश मिळवून दिला.

अशा रीतीनें मिलिंदकुमारांच्या एकलकोंड्या जीवनांत पद्मनाभाचा प्रवेश झाला. पण तरी हा एकलकोंडेपणा नाहींसा होत नाहीं असें मिलिंदाच्या ध्यानांत आलें.

व त्याबरोबर हेंहि त्यांच्या लक्षांत आलें कीं, मकरंदाची आपली आज बरीच वर्षे मैत्री असूनहि त्याला सोडून गेल्यावर

आपल्या हृदयाची अशी तळमळ कधींच होत नव्हती व आपला एकलकोंडेपणा असा कधींच आपणाला जाणवत नव्हता.

तेव्हां ह्याला कारण कल्पनेचा सहवास—एका तरूण स्त्रीचा सहवास !

बस्स ! आतां ह्याला उपाय म्हणजे नागपुराहून सुधेला पद्म-नाभाच्या पाठच्या बहिणीला आणावयाचें.

आणि मिलिंदकुमारांनीं लगेच त्याप्रमाणें केलें.

नागपुराहून सुधा आली. मिलिंदकुमारांनीं नाशीकच्या हायस्कूल-मध्यें मॅट्रिकच्या वर्गांत तिचें नांव दाखल केलें.

त्यांना वाटलें, आतां आपल्या हृदयाची भुणभुण खास दूर होणार!

दिवसभर ते आपल्या कामांतच असत तेव्हां येऊन जाऊन संध्याकाळीं कल्पनेची आठवण सतावणार. त्यावर उपाय म्हणून संध्याकाळीं पद्मनाभ व सुधा ह्यांसह पायीं फिरावयास जाण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला.

मिलिंदकुमारांचा बंगला गांवाबाहेर होता. भावंडासह ते कधीं पांडवलेण्याच्या डोंगराच्या बाजूला तर कधीं गोल्फलिंक्सकडे फिरा-वयास जात.

मुंबईच्या मानानें नाशीकचें वातावरण किती शांत ! व नाशि-कचे रस्तेहि किती मोकळे ! आजूबाजूला किती रम्य वनश्रीची शोभा !

पण मुंबईच्या त्या कोलाहलमय वातावरणांत त्या गजबजलेल्या रस्त्यांमधून मकरंद व कल्पना ह्यांसह—वस्तुतः कल्पनेसह—फिरतांना जी गंमत वाटत असे ती मिलिंदांना आतां वाटेना.

मिलिंद बडे विद्वान्, बडे कायदेपंडित होते. कायद्यांतील बारीक खुसपटेंसुद्धां त्यांना कळून येत. पण स्वतःच्या हृदयांत भोंकसलेलें खुसपट त्यांना कळून येईना !

त्यांना वाटलें, एका तरुणीच्या सहवासामुळें मुंबईला आपल्याला इतका सुखानंद वाटत होता.

आणि म्हणून त्यांनीं सुधेला आणविण्याचा खटाटोप केला. पण कल्पनेबरोबर बोलतांना किंवा फिरतांना जी गोडी त्यांना वाटे ती न्यारीच !

पायीं फिरतांना एकाद्या वेळीं कल्पनेच्या कुरळ्या केसांच्या बटा वाऱ्यानें तिच्या तोंडावर येत. व मग एक मजेशीर मुरका मारून गाल फुगवून "काय बाई हा त्रास" असें पुटपुटत ती त्या हळुंच बाजूला सारी. नि मग आतां पुनः कधीं त्या सुटून तिच्या मुख-कमलाभोंवतीं शेवळाप्रमाणें विहरतील अशी उत्सुकता मिलिंदकुमारां-च्या मनाला वाटे. व त्यांची नजर पुनः पुनः त्या केशकलापावर व मुखकमलावर स्थिर होई !

आणि ही आठवण येऊन मिलिंदकुमार मुद्दाम आतां सुधेच्या केशकलापाकडे पहात. पण गच्च आंवळून बांधलेल्या सुधेच्या सडक केसांना ती कला कोठून अवगत असणार ?

त्याचप्रमाणें, चालतां चालतां क्वचित्, कल्पनेनें पायाला लावि-लेला सस्पेंडर सैल होऊन खालीं सरके व मग दिलगिरीप्रदर्शक मुद्रेनें मिलिंदकुमारांकडे पाहून ती रस्त्यांत क्षणभर थांबे व सस्पेंडर

चापून बसवी. अर्थात्च अशावेळीं मिलिंदकुमारांच्या भाषणांत व्यत्यय येई. पण त्याचा राग न येता त्यांना गंमतच वाटे !

तसेंच, कल्पना बोलूं लागली कीं ते किती लक्षपूर्वक ऐकत रहात. कारण ती काय बोलणार त्याची त्यांना आधीं कल्पना येऊं शकत नसे. व त्यामुळें तिचें साधें भाषणसुद्धां त्यांना चित्ताकर्षक वाटे.

आणि सुधेचें भाषण अगदीं शंभर टक्के चित्तापकर्षक वाटे. सुधेच्या भाषणांत मुळीसुद्धां आकर्षकता त्यांना वाटत नसे.

लहानपणापासूनच्या निकट परिचयामुळें त्यांना सुधेच्या कसल्याहि विषयावरील बोलण्यांत नाविन्य आढळतच नसे.

तिचें बोलणें म्हणजे जणूं लांबवर, सारखा पसरलेला समुद्र ! आणि कल्पनेचें भाषण म्हणजे वळणावळणाला नागमोडी विळखे घेणारी काव्यमय सरिता !

म्हणजे सुधेच्या सहवासामुळें कल्पनेची आठवण बुजणें बाजूलाच राहून उलट तुलनात्मक दृष्टीनें मिलिंदकुमारांना अधिकच आठवण येऊं लागली !

मुंबईला कल्पनेच्या हृदयाला तळमळ लागली होती आणि नाशि-कला मिलिंदकुमारांच्या हृदयाला तळमळ लागली होती !

आणि ह्या असल्या तळमळीची मौज ही असते कीं, परस्पराची तळमळ लागलेल्या दोन हृदयांनीं ती तळमळ जर एकमेकांकड उघड केली तर तत्काळ ती तळमळ बंद होऊन त्या दोन हृदयांचें मीलन होतें !

पण कल्पना व मिलिंदकुमार पडली पराकाष्टेची हट्टी व दुरभिमानी! आपल्या हृदयाला अशी तळमळ लागल्याचें जिथें त्यांनीं स्वतःशीं कबूल करण्याचीहि मारामार तिथें ती उघड करण्याचें नांवच कशाला!

## प्रकरण १८ वें : : एकाचा सुंभ जळाला !

परंतु प्रत्येक गोष्टीला सीमा असते ! शिवाय निसर्गाचा असा एक नियम आहे कीं, मानवी हृदयाला जर फार दिवस दृढ बंधनांत ठेवलें तर पुढें वेळ आल्यावर त्या बंधनांचें जूं किंचित् झुगारून न देतां तें हृदय त्या बंधनांना साफ पायदळींच तुडवितें !

आजवर मिलिंदकुमारांनीं आपल्या हृदयाला अतिशय बंधनांत ठेविलें होतें. आपल्या मतें सुयोग्य अशी तरूणी आढळणें कठीण, व इतर अयोग्य तरूणीबरोबर विवाह करणें आपल्याला कमीपणाचें अशीच स्वतःची समजूत त्यांनीं केल्यामुळें प्रीति व विवाह ह्या दोन्हीचा आपल्या हृदयाला स्पर्शसुद्धां होऊं नये म्हणून त्यांनीं आतांपर्यंत शिकस्त केली.

त्याचसाठीं त्यांनीं कल्पनेच्या मैत्रीचा पाश तोडून टाकला.

पण आजवर बुद्धीच्या बंधनांत राहिलेलें त्यांचें हृदय आतां अनावर झालें. बुद्धीच्या बंधनांना त्यांच्या हृदयानें झुगारून टाकण्याचें ठरविलें !

आजवर अति दाबांत ठेविलेल्या त्यांच्या हृदयांतील साऱ्या कोमल

भावना आतां जोरावल्या. आणि त्या भावनांपुढें मिलिंदकुमारांचा दुरभिमान नामोहरम झाला !

त्यांच्या बुद्धीचा सुंभ पार जळला ! निसर्गानें आपल्याला पराभूत केलें हें त्यांना पटलें.

व कल्पनेबरोबर विवाह करून ह्या पराभवाचें विजयांत रूपांतर करण्याच्या हेतूनें ते ईस्टरच्या सुटींत मुंबईस आले.

अकराच्या सुमाराला त्यांची गाडी बोरीबंदरावर पोंहोंचली. आजवर बुद्धिप्रधान असणारें त्यांचें हृदय आतां एवढें भावनाप्रधान बनलें होतें कीं, स्टेशनावरून सरळ कल्पनेच्या घरीं जाण्याचा त्यांना मोह पडला.

पण इतका उल्लुपणा बरा नव्हे, अशानें कल्पनेला आपल्याबद्दल आदर वाटणार नाहीं असें मनांत आल्यामुळें त्यांनीं मोठ्या प्रयासानें तो मोह आंवरला. व सरदार गृहामध्यें कसे तरी ४।५ तास काढून दोन प्रहरीं चाराच्या सुमाराला ते मकरंदाच्या घरीं आले.

कल्पना हल्लीं घरीं रहात नव्हती हें ठाऊक नसल्यामुळें जिन चढावयास प्रारंभ करण्यापूर्वीं त्यांनीं उत्सुकतेनें वरती गॅलरीकडे पाहिलें.

त्यांची वाट पहात कल्पना पूर्वीं गॅलरींत उभी रहात असे. व ती आठवण येऊनच मिलिंदांनीं आतां वर बघितलें.

परंतु त्यांच्या डोळ्यांना कल्पनेच्या दर्शनसुखाचा लाभ न झाला तरी त्यामुळें यत्किंचित्‌हि नाराज न होतां पट्‌दिशीं ते जिना चढून

वर आले. एकाद्या २०।२२ वर्षांच्या रसिक प्रेमवीराप्रमाणें त्यांचें हृदय उतावीळ झालें होतें.

मिलिंदकुमारांना पाहून मकरंदाला साहजिकच आश्चर्य वाटलें. तो हंसत हंसत म्हणाला, " मिलिन्, मोठाच अजब प्राणी आहेस बुवा तूं! सहा महिन्यापूर्वीं एकाएकीं आमचा संबंध सोडलास नि आज आपण होऊन कसा प्राप्त झालास?"

" काय करणार बाबा? आलिया भोगासी असावें सादर!" बळेंच गंभीर मुद्रा करून मिलिंदांनीं उत्तर दिलें.

" भोगासि? भोग कसला हा?"

" भोग नाहींतर रोग म्हण! मकरंदा, मला प्रीतिरोग जडला आहे."

मिलिंदकुमारांच्या ह्या स्पष्टोक्तीनें मकरंदाला अत्यानंद झाला. आणि त्यांत काय आश्चर्य?—

सहा महिन्यापूर्वीं मिलिंदांनीं कल्पनेशीं विवाह करण्याचें नाकारलें तरी त्यांच्या त्या नकारांतहि मकरंदाला त्यावेळीं जो एक सूक्ष्म आशा-तंतू आढळला होता त्याची आतां चांगलीच बळकट काढणी झाली असून त्या काढणीनें मिलिंदांना घट्ट आंवळून बांधलें आहे हें कळून येतांच मकरंदाला साहजिकच अत्यानंद होणार!

मिलिंदाच्या जवळ येऊन व त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन त्यांना हालवीत तो म्हणाला, " मिलिन्, प्रीतिरोग जडला आहे तुला! खरंच? आमच्या कल्पनेवर तुझं प्रेम जडलं आहे?"

आजपर्यंत कांहींसे गंभीर, रुक्ष गणले गेलेले मिलिंदकुमार आज

पुरतेच बदलले. त्यांना थट्टा करण्याची पोरकट लहर येऊन लटक्या चिंतायुक्त स्वरांत ते म्हणाले, " असं मला भय वाटतं आहे मित्रा ! मकरंदा, दीड, दोन वर्षांपूर्वी तुला ह्या प्रीतिरोगानें ग्रासलं होतं. तेव्हा त्या बाबतींत तूं ' जुना अने जाणिता ' आहेस व म्हणून मला सध्यां होणारीं लक्षणं मीं तुला प्रामाणिकपणानें सांगतों. नि त्या-वरून तूंच काय ती परीक्षा कर म्हणजे झालं. काय समजलास ? हं बघ, माझ्या हृदयाला हल्लीं सतत हुरहूर लागल्यासारखें वाटतें. कांहींतरी, कुठेंतरी कमी आहे असा भास होतो. मन कसं शून्य आणि उदास होतं. घटकेंत मनाला उत्साह वाटतो तर लगेच अगदीं निरुत्साह वाटतो ! हं ! काय, जमताहेत काय लक्षणं ? "

जणूं कांहीं एकाद्या शारीरिक रोगाची लक्षणें सांगत असल्यागत मिलिंदकुमार हें गंभीरपणें बोलत असतां मकरंदाला भारी हंसं येत होतें.

मिलिंदांचें बोलणें संपतांच तो मोठ्यांदा हंसूं लागला. त्याबरोबर मिलिंदांचें कृत्रिम गांभीर्य लगेच ढांसळलें व तेहि मकरंदाच्या हास्यांत सामील झाले.

नंतर जरा वेळानें त्यांनीं म्हटलें, " अरे पण मकरंद, कल्पना कुठें आहे ? आपलें हें सात मजली हंसें ऐकूनसुद्धां ती बाहेर कशी आली नाहीं ? "

" ती हल्लीं इथें नसते. "

मकरंदाचें हें उत्तर ऐकून मिलिंदांची चर्या झट्दिशीं उतरली. त्यांनीं एकदम विचारलें, " म्हणजे ! ती मुंबईत नसते ? "

"मुंबईतच असते रे. पण......." असें म्हणून कल्पनेच्या नव्या नौकरीबद्दल मकरंदानें सर्व हकीकत सांगितली व तो म्हणाला, "बाकी, तशी काळजी नको करावयाला. तूं आला आहेस अशी पांडूबरोबर तिला चिठ्ठी देतो पाठवून म्हणजे ती आत्तां येईल तुला भेटावयाला. वास्तविक शाळेला आज सुट्टी आहे. पण बोर्डिंगांतील मुली घरोघर गेल्या नसल्यामुळें तिला आजचा दिवस तिथें रहावें लागणार. उद्यां सकाळीं ती इथें येईल नि मग सोमवारीं परत जाईल. तूं सुद्धां सोमवारपर्यंत मुंबईत असशीलच. होय ना ?"

शेवटला प्रश्न मकरंदानें मुद्दाम चेष्टेनें खोंचून विचारला. तो ऐकून मिलिंदकुमार हंसले—आणि लाजले.

मकरंद हंसत हंसत आंत गेला व मोहिनीला सर्व हकीकत थोडक्यांत सांगून त्यानें पांडूबरोबर कल्पनेला चिठ्ठी पाठविली. व तो आणि मोहिनी दिवाणखान्यांत आलीं.

आतां मोहिनी आपली चेष्टा करणार असें मिलिंदकुमारांना वाटून ते किंचित् कावरेबावरे झाले.

पण चेष्टा न करितां मोहिनी गंभीरपणें म्हणाली, "मिलिंदकुमार, ईश्वरानें तुम्हांला वेळींच सद्बुद्धि दिली हें पाहून मला फार आनंद झाला!"

त्यावर मिलिंदकुमारांनीं हंसून म्हटलें, "बरोबरच आहे तें. तुमच्या कळपांत आलों ना आम्हीं."

अशा रीतीनें त्या तिघांच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या इतक्यांत

पांडू परत आला व त्यानें मकरंदाच्या हातांत चिठ्ठीचें उत्तर आणून दिलें.

मकरंद गंमतीनें म्हणाला, " आं ! उत्तर कसलें दिलें आहे हिनें ? आतां लगेच मीं धांवत येते हें लिहून कशाला द्यावयाला हवें ? " असें बोलत व हंसत त्यानें चिठ्ठी उलगडून वाचली.

आणि त्याचें हंसें पार मावळलें.

चमत्कारिक मुद्रा करून त्यानें चिठ्ठी मिलिंदकुमारांच्या हातांत दिली.

आणि मिलिंदकुमारांनीं वाचलें,—

" दादा,

मिलिंदकुमार आले आहेत हें कळलें. पण त्यांना भेटावयाची माझी इच्छा नाहीं.

कल्पना. "

बस्स ! एवढाच मजकूर !—

पण तो वाचतांच मिलिंदकुमारांची मुद्रा खाड्कन् उतरली. मोहिनीलाहि भारी खेद वाटला !

कल्पनेच्या ह्या अकल्पनीय करण्याचा त्या तिघांनाही साश्चर्य खेद वाटला !

## प्रकरण १९ वें : मकरंदाचें मानसशास्त्रावरील लेक्चर

कांहीं क्षण तीं तिघेंहि स्तब्ध होतीं. नंतर जरा वेळानें मोहिनी म्हणाली, " बाकी, पहिल्यापासूनच वत्सूचा लग्न न करण्याचा निश्चय होता !"

तिचे हे शब्द ऐकून मकरंद स्वतःशींच कांहीं तरी पुटपुटला व नंतर तो मोहिनीला म्हणाला, " हें बघ, तूं जरा आंत जातेस ? मला मिलिन्‌कडे थोडें बोलावयाचें आहे."

मोहिनी लगेच उठली व आतां ह्या विषयासंबंधीं बोलण्यासारखें आहे काय असें वाटून स्वतःशीं स्मित करीत ती आंत गेली.

आणि तिलाच काय ? मिलिंदकुमारांनाही तसेंच वाटलें. व ते उघड त्याबद्दल बोलणार इतक्यांत मकरंद म्हणाला, " मिलिन्, प्रेमशास्त्रांत मी तुझ्याहून अधिक पारंगत आहे असें मवां तूं म्हणाला आहेस. तेव्हां त्या बाबतींत माझा शब्द तुला मानलाच पाहिजे ! हें बघ, मिलिन, आमच्या कल्पनेला तूं थोडेच दिवस ओळखतोस. नि मी तिला आज २१ वर्षें ओळखतो आहे. पोरगी एरवीं सर्व बाबतींत चांगली आहे. पण पराकाष्ठेची हट्टी,

नव्हे, इत्यादी ! मॅट्रिक झाल्यानंतर तिनें नक्की ठरवून टाकलें कीं, लग्न करावयाचें नाहीं. बस्स ! अगदीं भीष्मप्रतिज्ञाच ना दुसरी ! नंतर ४-५ वर्षांत तिच्या ह्या प्रतिज्ञेला धक्का लागण्यासारखें कारणच उपस्थित झालें नाहीं. कॉलेजांत अगर समाजांत आढळणाऱ्या कुणाहि तरुणाविषयीं तिला आकर्षण वाटलें नाहीं. आतां ६-७ महिन्यापूर्वी तुझी व तिची ओळख मी करून दिली. पण तुम्ही दोघेहि पडला पक्की चेंगट ! बुद्धीच्या कलानें चालणार तुम्ही. हृदयांतील भावनांकडे मुळींसुद्धां लक्ष न देण्याचा जणू तुम्ही विडाच उचललेला ! तुम्ही दोघेहि त्या वेळीं आंधळ्या कोशींबिरीचा खेळ खेळत होता बघ. स्वतःच्या हृदयांतील भावना तुम्हांला दिसत नव्हत्या मग दुसऱ्याच्या हृदयांतील भावना कुठून दिसणार ? मिलिन्द, त्यावेळीं कल्पनेबरोबर विवाह करण्याविषयीं मी तुला विचारलं. नि तूं नाकारलंस. आणि त्यानंतर मी तुला एक प्रश्न विचारला तो आठवतो कां तुला !"

" होय तर. अरे बाबा, कुठल्याही परीक्षेच्या वेळीं प्रश्नपत्रिकेंतील मोठ्या कठीण प्रश्नानेंसुद्धां उडविली नाहीं एवढी त्रेधा त्या प्रश्नानें माझी उडविली बघ ! मकरंद, त्यावेळीं तूं मला विचारलंस कीं, एकाद्या तरुणीला तुझ्या अटीबरहुकूम खरें प्रेम तुझ्याविषयीं वाटतें आहे कीं नाहीं ह्याबद्दल खात्री वाटण्यापूर्वीच जर तुझें तिच्यावर प्रेम जडलें तर तूं काय करशील? तिच्या तुजवरील प्रेमाचीच छाननी करीत बसशील कीं, दुष्यन्ताप्रमाणें 'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ' हा न्याय लढवून, ज्याअर्थी तुला तिच्याविषयीं खरें

प्रेम वाटतें आहे त्याअर्थीं तिलाहि तुझ्याविषयीं तसेंच प्रेम वाटत असणार असेंच गृहीत धरशील ! काय, हाच ना तुझा प्रश्न !"

" वाहवा, मिलिन, त्यावेळचे माझे शब्द मी कांहीं इतके जसेच्या तसें उच्चारूं शकणार नाहीं बुवा ! तूं तर ते जणूं पाठच करून ठेविले आहेस."

" काय करणार बाबा ! तसेच जोरानें ते ठसले कीं माझ्या हृदयावर."

" छान ! आणि हें मी त्याचवेळीं ओळखलं व म्हणूनच तुझ्या-बद्दलची आशा मी सोडली नाहीं. आणि म्हणूनच तुझा नकार मी कल्पनेला कळविला नाहीं. आपल्या लहरी, नादिष्ट वृत्तीला अनुसरून तूं आमच्याकडे येणें बंद केलेस असेंच मी तिला सांगितलें, पण पोरगी मोठी हुषार ! तिनें सर्व कांहीं बरोबर ताडलें. आणि तेव्हां-पासून तिचा नूर पालटला. पहिल्यांदा तिनें बेपर्वाईचा खूप आंव आणला. पण तो उसना आंव कुठवर टिकणार ! नंतर ती पूर्वी-पेक्षांहि त्रासिक बनली. घरांत उगीचच चीडचीड करूं लागली. छोट्या अरुणाबरोबरसुद्धां भांडूं लागली. मोहिनीला ह्याबद्दल केव्हां केव्हां राग येई. पण कल्पनेच्या मनोवृत्तीची मला नीट पारख झाली असल्यामुळें मला तिचें हें वागणें बोलणें सयुक्तिकच वाटत होतें. पण मी तसें कांहींच बोलूं शकत नव्हतो. शेवटीं तिनें शाळेंतच रहाण्याची ही नोकरी स्वीकारली आणि दोन महिन्यापूर्वीं ती तिथें रहावयास गेली. पण मी तेव्हांच ओळखून ठेवलें आहे कीं ती पहिल्या दिवसापासूनच त्या नोकरीला कंटाळून गेली आहे."

" मग तिनें आतां तसें उत्तर कां पाठविलें ?"

" कां म्हणजे ! तुझ्या हटवादी, दुरभिमानी स्वभावाला शोभावयाला नको कां तिचा स्वभाव ?"

" म्हणजे ? मनांतून यावेसें वाटत असूनही ती आली नाहीं ?" कांहींशा अविश्वासदर्शक स्वरांत मिलिंदांनीं प्रश्न केला.

" अर्थात्च ! मिलिन, आपल्या आवडत्या माणसावरच आपण चिडतो व राग काढतो हा मानसशास्त्राचा सिद्धांत तुला ठाऊक आहे ना ? तोच इथे लागू करावयाचा. मिलिन, तूं तिची फार निराशा केल्यामुळें ती तुझ्यावर चिडली आहे. एकदां तूं तिला नकार दिलास आतां तिनें तुला दिला. तुझ्यावर हा प्रत्याघात करून आपला दुखविलेला स्वाभिमान तिनें पुनः प्रस्थापित केला ! आतां इथून पुनः प्रारंभ करावयास हरकत नाहीं."

" अरे पण, ती जर माझी भेट घ्यावयालासुद्धां तयार नाहीं."

" ह्या क्षणाला नाहीं, नव्हती. पण ही लहर ओसरल्यावर सारं ठीक होईल. मिलिन्, तूं कांहीं काळजी करूं नकोस. उद्यां कल्पना इकडे येणार आहे. तेव्हां तूंहि उद्यां सकाळी इकडे जेवावयालाच ये. आणि त्यावेळीं समेट करून टाक. मिलिन्, मानसशास्त्राचे सिद्धांत असेच उलटसुलट पेचाचें असतात !"

" मकरंदा, तुझी लाइन् चुकली बाबा. मानसशास्त्राचा प्रोफेसर उत्तम झाला असतास तूं."

" पण मिलिंद, तूं हें विसरतोस कीं, निव्वळ पुस्तकी ज्ञानाच्या बळावर माझें हें प्रोफेसरत्व आधारलेलें नाहीं. त्याला स्वानुभवाची

जोड आहे. माझ्या विवाहाच्या बाबतींत थोडासा असाच प्रकार झाला. मोहिनी कल्पनेच्याच तालमींतली. आजन्म अविवाहित रहाण्याची तिनेंहि प्रतिज्ञा केली होती. आणि त्यामुळें मी चांगलाच बाचकलों. पण मग प्रयत्न केला नि सफळहि झाला. परंतु मी आणि मोहिनी पडलों दुय्यम नायकनायिका तेव्हां आमचं प्रेमकाव्य म्हणजे छोटसं सुनीतच ठरलं. आतां तू आणि कल्पना आहांत नायक नायिका. तेव्हां तुमचं प्रेमकाव्य म्हणजे भलं जंगी खंडकाव्यच असावयाचं ! मग त्यांत असे climax ( सीमा ) anti-climax ( प्रति सीमा ) हवेच !"

"काय बुवा, बोलशील तेवढें थोडेंच. ५।६ महिन्यापूर्वीं आपल्या वधूपक्षाची जाणीव ठेऊन तूं नम्रपणें माझ्याकडे विवाहाचे बोलणें काढले होतेंस. पण तेव्हां वरपक्षाच्या घमेंडींत नकार देण्याची मला बुद्धी झाली."

"बरोबरच आहे तें. त्यावेळीं जर तूं होकार दिला असतास तर तुझें प्रेमकाव्यसुद्धां सुनीत वजाच झालें असतें ना ? मिलिन्द, स्पष्ट बोलतों म्हणून रागावूं नकोस. पण तुझी अहंमन्य वृत्ति सुखाच्या आड आली बरं ! कल्पना आपल्या योग्यतेची नाहीं असेंच तूं त्यावेळीं गृहीत धरलेस."

"पण आज कल्पनेने अचानकपणें हा टोला हाणल्यामुळें मींच तिच्या योग्यतेचा नाहीं कीं काय अशी शंका मला वाटूं लागली आहे !"

" अंह, हें खोटं कल्पनेनें खरोखरीच तुला नाकारलें तर तूं

तिला मूर्ख ठरवून मोकळा होशील ! आपण तिच्या योग्यतेचा नाहीं असें तुला वाटणें शक्यच नाहीं ! बाकी, जर क्षणभर तरी तुला तसें वाटलें तर फार उत्कृष्ट होईल ! तुझ्या अहंमन्यतेला थोडासा धक्का पोंचणेंच इष्ट आहे. मिलिन्द, तूं कल्पनेला नाकारलीस त्यावेळीं मला तुझी फार चीड आली. तूं त्यावेळीं कल्पनेच्या हृदयाचा–तिच्या भावनांचा अपमान केलास ! कळत असो कीं, नकळत असो, तूं तिला उत्तेजन दिलें होतेस नि तें ध्यानांत येतांच तसें कबूल करणें तुला लाजिरवाणें, अपमानकारक वाटलें. खरंच, त्यावेळीं तुला अस्सलपैकीं चार शिव्या मोजण्याचा मला फार मोह होत होता. पण म्हटलं, त्यामुळें कदाचित् तूं कल्पनेवर राग धरशील, तूं नाहीं तुझ्या भावानें मला शिव्या दिल्या होत्या असा मुद्दा लढवून कोंकराच्या व लांडग्याच्या धड्यांत लांडग्यानें जसा कोंकरावर राग काढला तसा तूं बिचाऱ्या कल्पनेवर काढशील ह्या भयानें मीं त्यावेळीं गप्प बसलों. नाहीं तर तुझ्या ह्या अहंमन्यतेवर चांगलें लेक्चर झोडलें असतें ! ”

“ बरं, बुवा, आजपासून मीं सारी अहंमन्यता सोडून देतों. मीं अगदीं कुण्णी नाहीं असें धरून चालतो. ” गरिबीच्या स्वरांत मिलिंद म्हणाले.

त्यांच्या त्या अविर्भावानें मकरंदाला फार हंसूं आलें. व हंसतच तो म्हणाला, “ हा काय रे पोरकटपणा ? अति अहंमन्यता जशी घातक तशी अतिलीनताहि घातक ! आणि अतिलीनतेपेक्षां अति अहंमन्यता पुरवली. अति अहंमन्य माणूस आपल्या ह्या दुर्गुणापायीं

हातचें सुख घालवून स्वतःचें जरी नुकसान करितो तरी समाजांत चांगला हुद्दा व मान मिळवून निदान आपल्या माणसांना तरी सुस्थितींत ठेऊं शकतो! अति लीन माणूस स्वतःहि पुढें येऊं शकत नाहीं आणि आपल्या माणसांनाहि पुढें आणू शकत नाहीं!"

"मग मीं अविलीन नको होऊं तर!"

"नको. तुझी आहे ती वृत्तीच ठीक आहे. कारण माझी खात्री आहे कीं, ह्यापुढें तुझी वृत्ति पूर्वीइतकी आढ्यतेखोर रहाणार नाहीं."

"हें अगदीं खरें आहे रे बाबा. आज तूं मला एवढें कडक लेक्चर दिलं आहेस कीं, ह्यापुढें माझ्या प्रत्येक आचाराच्या व उच्चाराच्या, फार काय, विचाराच्याहि वेळीं मला माझ्यामधील ह्या दोषांची आठवण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. व त्यामुळें हा दोष हळू हळूं निघून जाईल. मकरंद, लहान मुलांना शिक्षण देतांना तत्त्वाच्या निव्वळ घोषणेपेक्षां त्या तत्त्वांचें व्यवहारांतील निदर्शन अधिक परिणामकारक होतें म्हणतात तें खोटें नाहीं. एरवीं मला तूं माझ्या ह्या दोषाबद्दल कितीहि व्याख्यानें ओळीनें दिलीं असतीस तरी मला तें पटलें नसतें. पण आतां कल्पनेनें हा अनपेक्षित टोला हाणतांच मला तें उत्तम पटलं. पण खरं सांग मकरंद, तुला अजूनि आशा वाटते?"

"खात्रीनें वाटते. मिलिन्द्, तूं पूर्वीं साफ नकार दिलास तरी मीं आशा सोडली नाहीं नि माझ्या अपेक्षेनुसार ती आशा सफळहि झाली. तूं पुरुष असून तुला आपल्या एकलकोंड्या जीवनाचा जर कंटाळा आला तर जात्याच पुरुषाहून अधिक सहवासप्रिय

व संसारप्रिय असणाऱ्या स्त्रीला तसल्या जिण्याचा किती कंटाळा येईल ? मिलिन्द्, मनुष्यप्राण्याला शेवटीं निसर्गापुढें नमतें घ्यावेंच लागतें. ईश्वरानें निसर्गसृष्टीमध्येंसुद्धां द्वन्द्वें निर्माण केलीं आहेत. सागर—सरिता, वृक्ष-वेल, चन्द्र—चन्द्रिका वगैरे जोड्या माणसांना जो द्वन्द्वाचा धडा शिकवितात तो त्यांना केव्हां ना केव्हां गिरवावा लागतोच ! निसर्गाच्या विरुद्ध जाऊन एकलकोंडे जिणें आनंदानें घालविणारीं कांहीं माणसें असतात. पण तीं फारच विरळा ! शिवाय बहूतकरून कांहीं तरी अपरिहार्य कारणामुळें निसर्गाविरुद्ध असें बंड पुकारणें त्यांना प्राप्त होत असणार किंवा त्यांच्या हृदयाची ठेवणच मोठी अजब, अनैसर्गिक असली पाहिजे. आणि मीं खात्रीनें सांगतों कीं, कल्पनेच्या हृदयाची ठेवण अशी मुळींच नाहीं. तेव्हां त्याबद्दल काळजी नको. तूं आपला उद्यां सकाळीं ११ च्या सुमाराला इथें अवश्य ये.”

ह्याबद्दल मिलिंदकुमारांना आणखी आग्रह नकोच होता !

## प्रकरण २० वें .... पण दुसऱ्याचा पीळ कायम

जिच्या भावनांबद्दल मकरंदानें मिलिंदांना एवढा निर्वाळा दिला त्या कल्पनेच्या भावना वस्तुतः कशा होत्या ?

मिलिंदांच्या अहंमन्यतेचा सुंभ जळाल्यामुळें ते आपल्या घरीं आले आहेत हें मकरंदाच्या चिठ्ठीमध्यें वाचतांच कल्पनेला पहिल्यांदा आनंद झाला.

पण नंतर तेवढाच राग आला.

एकाएकीं, कारणावांचून आपल्या मैत्रीचा त्यांनीं त्याग केला ह्या आठवणीनें तिचा स्वाभिमान पुनः डिंवचला गेला.

व त्या भरांत तिच्या मनांत आलें, मिलिंदकुमार आले आहेत ! कशाला आले आहेत ! आपल्या मैत्रीचें मोहजाळ पुनः पसरून पुनः पूर्वीसारखा चटका लावून निघून जाण्यासाठीं ?

एकदां झालेल्या त्या निराशेची स्मृति अद्यापि आपल्या जीवाला जाळते आहे ' स्मृतिचा सुवास येई, जिव हा उलून जाई ' ! मग तो प्रयोग पुनः करण्याची संधि मिलिंदांना व त्यांच्याकरवीं दैवाला द्याच कां !

बस्स ! झाली तेवढी शोभा पुरे झाली !—आणि ह्या व अस-ल्याच विचारांचा पगडा मनावर बसल्यामुळें तिनें मोठ्या अभि-मानानें मकरंदाला कळविलें कीं, मिलिंदकुमारांना भेटण्याची आपली इच्छा नाहीं.

पण—पण ती चिठ्ठी घेऊन पांडू गेला आणि लगेच कल्पनेचा सारा अभिमान गळाला—सारा क्रोध मावळला.

मिलिंदांना भेटावयाला, त्यांची ती स्मितोज्ज्वल, तेजःपुंज मुद्रा पहावयाला, मंद गंभीर स्वरांतील त्यांचें बोलणें ऐकावयाला तिचें हृदय पर्युत्सुक झालें !—

पण—तिनें आपण होऊन तो मार्ग रोखून टाकला ना ?—

क्षणभर तिला वाटलें, असेंच आतां घरीं जावें व मिलिंदांना भेटावें—त्यांनीं पुनः आपला पूर्वीसारखा अपमान केला तरी पत्करलें पण आपल्या तहानलेल्या नेत्रांना त्यांच्या दर्शनाचें सुख तरी मिळूं दे.

परंतु क्षणभर—एकच क्षण—हा विचार टिकला.

लगेच तिचा अभिमान जागृत झाला. आपण येत नाहीं अशी चिठ्ठी पाठविली आहे तेव्हां आतां नाहींच जावयाचें असा तिनें निश्चय केला.

परंतु निश्चय करणें जेवढें सोपें असतें तेवढेंच तो पार पाडणें कठिण असतें !—

कल्पना असला हा अवघड निश्चय करून चुकली होती ! करून चुकली आणि मग आपण तो चुकून केला असेंच तिला वाटूं लागलें

शिवाय, नुसत्या निश्चयापरच ती थांबली नव्हती. त्या निश्चयाचा

तिनें उघड उद्गार केला होता. त्यामुळें आतां तो निश्चय बदलला तर आपल्यावर नाचरेपणाचा आक्षेप येईल अशी तिला भीति वाटली.

हं ! नाचरेपणाच्या आक्षेपाचा तिला बाऊ वाटला. आणि तिच्या हल्लींच्या वर्तनांतील अप्रामाणिकपणा, अनैसर्गिकपणा आक्षेपार्ह नव्हता काय ?

पण आपल्या वर्तनांतील हे दोष तिच्या लक्षांत येत नव्हते. केवळ मिलिंदकुमारांनीं केलेल्या आपल्या अपमानाचें थोडेसें तरी उट्टें काढावें या इच्छेनें तिनें स्वतःलाहि वस्तुतः न पटणारी ती चिठ्ठी लिहिली.

ती चिठ्ठी रवाना केल्यानंतर जसजसा वेळ जाऊं लागला तसतशी कल्पनेची उत्सुकता अधिकाधिक वाढूं लागली. आणि ह्या उत्सुकतेचा जय होऊन ती तशीच घरीं गेलीहि असती पण तितक्यांतच वसतिगृहांतील काहीं विद्यार्थिनी प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम् पहावयास निघाल्यामुळें त्यांच्याबरोबर जाण्याची मिस् मदरलँडनीं तिला सूचना दिली.

व कल्पनेनें लगेच होकार दिला.

तिला वाटलं, त्या निराळ्या वातावरणांत, विद्यार्थिनींच्या कलकलाटांत आपलें अस्वास्थ्य दूर होईल.

पण छे ! विचार म्हणजे अशी हातांत सांपडण्यासारखी वस्तु थोडीच आहे कीं नको असलेले विचार खुशाल घरीं ठेऊन आपल्याला बाहेर जातां येईल ?

म्युझियम्मध्यें जातेवेळीं कल्पनेच्या अंतःकरणांत थैमान घालणारे विचार तिच्याबरोबर गेले व तिच्याबरोबर तसेच परत आले.

वास्तविक मुलींची पालक म्हणून ती गेली होती. पण म्युझियम्-मधील प्रेक्षणीय वस्तु मुलींना दाखविण्यांत पुढाकार घेण्याचें तिला सुचलेंहि नाहीं. ती मुकाट्यानें मुलींच्या मागोमाग फिरत होती.

म्युझियम्मधील पुतळ्यांना व पेंढा भरलेल्या जनावरांना आजू-बाजूच्या वस्तूंचें जेवढें आकलन होतें तेवढेंच कल्पनेलाहि आकलन झालें.

मुलींनीं दोन चारदां तिच्याशीं बोलण्याचे प्रयत्न केले व ते निष्फळ झाल्यामुळें "ताईना आज बरें वाटत नसणार" असें आपापसांत पुटपुटून त्या पुनः तिच्या वाटेला गेल्या नाहींत.

अर्थात्च हेंसुद्धां कल्पनेच्या गांवींहि नव्हतें !

रात्रीं तिला जेवणहि धड गेलें नाहीं.

ती आतां स्वतःवरच चिडली होती. आपल्या अभिमानी वृत्तीचा तिला राग आला. तिला वाटलें, तशी चिठ्ठी पाठविण्याचा गाढव-पणा आपण केला तो केलाच, पण नंतर लगेच घरीं जावें असा सुविचार मनांत आला असून ह्या अभिमानापायीं तोसुद्धां अंमलांत आणला नाहीं !

मिलिंदकुमारांच्या अहंमन्यतेचा सुंभ जळला व पीळहि जळला. त्याप्रमाणें कल्पनेच्या अभिमानाचाहि सुंभ जळाला आणि पीळसुद्धां जळला होता. पण वस्तुतः जळलेला हा पीळ कायम असल्याचा आभास निर्माण करण्यासाठीं धडपडत होती ती !

मनुष्यस्वभावाची काय अजब रीत ही ! सुख मिळविण्यापेक्षां दुःख निर्माण करण्याकडेच त्यांचा अधिक कल असतो !

# पण दुसऱ्याचा पीळ कायम

आतां कल्पनेच्या अभिमानाचा पीळ वस्तुतः जळला असूनहि तें कबूल करावयाला ती तयार नव्हती.

आणि ह्या तिच्या करण्यामुळें तिच्या हृदयाला किती यातना झाल्या !

कल्पनेच्या अभिमानाचा अवशेष जर खरोखरीच जागृत असता तर त्याचें आविष्करण मकरंदाकडे व पर्यायानें मिलिंदाकडे केल्या बद्दल तिला समाधानच वाटलें असते !

पण वस्तुस्थिति तशी नव्हती. तिचा अभिमान आतां पुरा नामशेष झाला होता. मिलिंदकुमारांना आपल्या हृदयाचें दान देण्याची तिची पूर्ण तयारी होती. मात्र ह्या बाबतींत तिनें आपल्या भावनांची पूर्ण पारख कधींहि केली नसल्यामुळें, गाडून टाकलेल्या तिच्या अभिमानाचें भूत आयत्या वेळीं वर उसळलें व त्या भरांत तिनें ती चिठ्ठी खरडली !

आणि गेल्या ४।६ महिन्यांच्या अवधींत मिलिंदकुमारांच्या स्मृतीपायीं तिनें जेवढ्या मनोयातना भोगल्या त्याच्या कितीतरी पटीनें अधिक मनोयातना तिनें ह्या ४।६ तासांत भोगल्या.

कारण पूर्वींच्या त्या मनोयातनांना ती जबाबदार नव्हती. तिच्या अपराधावांचून तिला त्या भोगाव्या लागल्या.

आणि आतांच्या ह्या मनोयातनांना ती सर्वस्वीं कारणीभूत होती. त्यामुळें कल्पना फार बेचैन झाली.

रात्रीं बिछान्यावर पडल्यानंतर कितीतरी वेळ ती ह्याच विचारांत गुरफटली होती.

इतक्यांत एकदम तिच्या मनांत आलें, "आपण उद्यां घरीं येणार हें दादाला माहिती आहेच. मिलिंदकुमारांना गतघटनांबद्दल खरोखरीच वाईट वाटल्यामुळें त्यांना पुनः आपली मैत्री करण्याची जर इच्छा असेल तर ते पुनः संधि मिळविण्याचा अवश्य प्रयत्न करतील. आपल्या चिठ्ठीमुळें रागावून निघून जाणार नाहींत. आणि इतक्याउप्पर जर ते रागावून गेलेच तर--तर काय ? आपल्या. विषयीं त्यांना विशेष कांहीं वाटत नव्हतंच, केवळ पूर्वींच्या घटनेची पुनरावृत्ति करण्याच्या हेतूनेंच ते आले होते; लहर लागली म्हणून आले, लहर फिरली म्हणून गेले असंच समजावयाचं."

आणि हा विचार मनांत आल्यामुळें कल्पनेला पुष्कळ सुचिंत वाटलें.

दुसऱ्या दिवशीं घरीं गेल्यानंतर काय तें कळेलच असें मनाचें समाधान करीत ती झोपीं गेली.

## प्रकरण २१ वें .... .... .... कल्पनेची भरारी !

रविवारीं अगर सुट्टीच्या दिवशीं कल्पना एरवीं साधारण ११ वाजतां घरीं जेवावयास येत असे.

पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८ वाजतांच ती घरीं पोंचली.

आणि तिला कधीं नव्हे ती आज इतक्या लौकर आलेली पाहून मकरंदाला गंमत वाटली.

येणारें हंसूं दाबीत तो गंभीरपणें म्हणाला, " काय कल्पने, तुझें बोर्डिंग ठीक चाललें आहे ना ? "

कल्पना उत्तरली, " हो, ठीक चाललें आहे." नंतर किंचित् हंसून ती पुढें म्हणाली, " दादा, माझं बोर्डिंग काल खरंखुरं चाललं. काल किनई, बोर्डिंगांतील पंधरा मुलींना घेऊन मीं प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम् पहावयास संध्याकाळीं ट्रॅमनें गेले. आणि एम्पायर हॉटेलकडे आल्यावर ट्रॅमची लाइनच बंद पडली. जवळ जवळ १० मिनिटें आम्हीं वाट पाहिली नि मग मुली आणि मीं चालत म्युझियमपर्यंत गेलों. तेव्हां बोर्डिंग चाललंच नाहीं कां ? "

" हो तर काय ! "

मकरंदाच्या ह्या उद्गारानें कल्पनेची भारी निराशा झाली. तिनें बोर्डिंग नीट चाललें आहे ना ह्या त्याच्या प्रश्नामधील 'चालणें' ह्या क्रियापदावर मुद्दाम श्लेष रचला.

संध्याकाळीं आपण म्युझियमला गेलों होतों हें कळल्यावर दादा खात्रीनें कालच्या मिलिंदकुमारांच्या आगमनाचा व आपल्या चिठ्ठीचा विषय काढणार अशी तिची अपेक्षा होती !

पण दादासाहेब गप्पच !

जरा वेळ वाट पाहून कल्पनाच पुन: म्हणाली, " बरं कां दादा, म्हणूनच काल संध्याकाळीं मला यावयाला जमलं नाहीं. "

आणि ह्यावर मकरंदानें एक लहानसा हुंकार दिला.

कल्पना आतां भारी कंटाळली. मकरंदाकडे मिलिंदांचा स्पष्ट निर्देश करणें तर तिला अवघड वाटत होतें.

आतां इकडे येतांना तिच्या मनांत आलें. आपण काल न आल्याबद्दल दादा आपल्याला कदाचित् रागावेल.

व तसें झाल्यास आपण लटपट रागानें त्याला विचारूं कीं, " मला कांहींच किंमत नाहीं कीं काय ! तुझ्या त्या मिलिंदकुमारांच्या लहरीवर मी नाचायचं ? "

अर्थात्‌च हा नुसता तिच्या कल्पनेचा खेळ होता ! मकरंद तिला खरोखरीच रागें भरला असता तर तिनें असें रागीट उत्तर दिलें असतेंच असें कांहीं वाटत नाहीं. कदाचित् तिनें तसा आव आणण्याचा प्रयत्न केला असता एवढेंच !

पण आतां तिला वाटलें, कालच्या बाबतींत दादा रागावल

तरी पत्करलें. अगदीं मुकाट्यानें आपण तें ऐकून घेऊं पण एकदां कालची हकीकत तरी कळूं दे.

परंतु मकरंदानें तिचें सत्व पुरतें बघण्याचा निश्चय केला होता.

शेवटीं कल्पनेचा अगदीं नाइलाज झाला.

मोहिनीला शोधीत ती आंत गेली. मोहिनी नुकतीच अरुणाला आंघोळ घालून येऊन त्याचें अंग पुसत होती.

अरुणाकडे जरा वेळ बोबडं, लाडकं बोलून कल्पनेनें मोहिनीला जुजबी प्रश्न विचारले. परंतु तेवढ्यानें काम होईना.

तेव्हां कल्पनेनें सरळच प्रश्न केला, " वहिनी, काल मिलिंद-कुमार आले होते ! "

" होय. आले होते नि मग तसेच गेले." मकरंदाच्या तालमींत तयार झालेल्या मोहिनीनें रुक्ष स्वरांत उत्तर दिलें.

तिच्या ह्या उत्तरानें कल्पनेची फार निराशा झाली. एक आवंढा गिळीत ती म्हणाली, " मला.–अं–मला काल संध्याकाळीं याव-याला जमलं नाहीं."

" होय. तुमच्या चिठ्ठीवरून कळलं तें."

यावयाला जमत नाहीं असा मजकूर चिठ्ठींत नसून यावयाची आपली इच्छा नाहीं असा मजकूर होता हें उत्तर तोंडावर आलें असूनहि मोहिनीनें मुद्दाम दाबलें.

अगदीं अनन्यगतिक होऊन कल्पनेनें म्हटलें, " दादा काल रागावला काय माझ्यावर ! "

कल्पनेला वस्तुतः दादाच्या रागाची माहिती नको होती, मिलिंद-कुमारांच्या रागाची हवी होती. पण ती तसें स्पष्ट कसें विचारणार ?

पण तिच्या ह्या आडवळण घेण्याच्या खुब्या मोहिनीनें लगेच ओळखल्या. ती तुटकपणें म्हणाली, "छे बाई, रागावणार कशाला? हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न आहे."

आतां मात्र कल्पनेचें अवसान पुरेंच गळलें. मिलिंदांना भेटण्याची आपली इच्छा नाहीं असें आपण दादाला कळविलें होतें ह्याची आठवणही न राहून ती कंपित स्वरांत म्हणाली,

"माझी इच्छा होती ग—पण— मी— मी..."

पुढें काय बोलावें, कसें बोलावें तें तिला सुचेना. ती गांगरून क्षणभर थांबली व मग जवळ जवळ धांवतच आपल्या खोलींत गेली.

तिची ती अवस्था पाहून मोहिनीला कल्पनेच्या प्रिय मैत्रिणीला व प्रेमळ वहिनीला फार आनंद झाला. कल्पनेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात ती किंचित् हंसली व नंतर दिवाणखान्यांत जाऊन तिनें पतिराजांना ह्या संभाषणाची बित्तंबातमी दिली.

ती ऐकून मकरंदालाहि तिच्याचप्रमाणें आनंद झाला. आणि ११ वाजतां येण्याबद्दल बजाविलें असतां १० वाजतांच प्राप्त झालेल्या मिलिंदकुमारांना त्यानें ती बित्तंबातमी सांगितली व तो हंसत हंसत चोरटया पावलांनीं कल्पनेच्यां खोलीकडे गेला.

खिडकीशीं असलेल्या टेबलासमोर कल्पना बसलेली होती. तिच्या समोर एक उघडें पुस्तक होतें. पण ती वाचीत नव्हती खास, कारण तिची नजर खिडकीच्या पडद्याकडे, गजांवर, खिडकीबाहेरील निळ्या

आकाशाकडे, आकाशाच्या पार्श्वभागावर उठून दिसणाऱ्या ताडाच्या झाडांच्या हलत्या, हिरव्या फांद्याकडे, फार काय, पुस्तकाखेरीज समोरील इतर साऱ्या वस्तूंकडे भिरभिरी फिरत होती !

मकरंद तसाच परतला.

दिवाणखान्यांत येऊन तो मिलिंदकुमारांना विनोदानें म्हणाला, "हं, चल बुवा, रंगभूमि तयार केली आहे. विरहाकुळ नायिका तिथें एकटीच बसून सुस्कारे सोडते आहे. तेव्हां आतां नायकानें रंगभूमीवर प्रवेश करावा."

मकरंदाच्या ह्या चेष्टेनें मिलिंदकुमार हंसले खरे. पण इतक्या वर्षांमध्यें कधींच न केलेली ही गोष्ट आतां करावयाची ह्या कल्पनेनें त्यांचें हसूं लगेच मावळलें.

किंचित् घाबरत ते कल्पनेच्या खोलीकडे गेले, व तिच्या खुर्चीच्या मागें थांबून त्यांनीं हळूंच हाक मारली, "कल्पने—"

ती हांक ऐकतांच कल्पना केवढ्यांदा दचकली. तिनें आधीं बाहेर आकाशाकडे निरखून पाहिलें. जणूं कांहीं ही हांक मिलिंदकुमारांनीं स्वतः मारली नसून तो आपल्या कल्पनेचा खेळ आहे असेंच तिला वाटलें.

मिलिंदकुमार पुनः प्रेममृदु स्वरांत म्हणाले, "कल्पने—"

आतां कल्पनेनें चट्दिशीं मागें वळून पाहिलें.

क्षणापूर्वीं खिन्न व उदास दिसणारे तिचे टपोरे डोळे मिलिंदकुमारांची व तिची नजरानजर होतांच हंसूं लागले. त्यांच्या भेटीमुळें झालेला आनंद तिच्या मुद्रेवर नाचत होता.

आणखी पुढें येत मिलिंदकुमार चेष्टेनें म्हणाले, " अस्सं ? एकूण मला भेटण्याची इच्छा नाहीं असें काल कळविलेंस तें सारें ढोंगच तर ? "

त्यासरशीं कल्पनेच्या अभिमानाचें भूत पुनः वर उसळलें. मिलिंदकुमारांनीं केलेली ही चेष्टा तिला कुचेष्टाशी वाटली. तिच्या चर्येवरील हंसू मावळलें.

पण तितक्यांत मिलिंदकुमारांनीं बाज़ सांवरली. मृदु स्वरांत ते म्हणाले, " पण त्यामुळें काल मीं किती घाबरून गेलों; माझी केवढी निराशा झाली. वाटलं कीं, माझ्या आधळेपणानें पुरा घात केला. पण नाहीं. माझं नशीब तितकं कमजोर नाहीं."

किंचित् पुढें वांकून व आपला स्वर शक्य तर आणखीच मृदु करून ते म्हणाले, " कल्पने, मागें मीं तुझा अपमान केला; काल तूं त्याचं उट्टं काढलंस. आतां तो विषय तिथेंच संपला. दोनदां आपण भांडलों. आतां तिसऱ्या खेपेला कायमचा समेट करावयाचा. होय ना ? बोल कीं. अं ? "

मिलिंदकुमारांच्या ह्या प्रेमानुनयामुळें कल्पनेचा राग तर ओंसरलाच पण गेल्या ४।६ महिन्यांत अति ताण पडलेल्या तिच्या हृदयाला आनंदाचा हा आवेग सहन झाला नाहीं.

ती मट्कन् खुर्चीवर बसली. व आपल्या करसंपुटांत तोंड लपवून रडूं लागली.

असें कांहीं होईल ही कल्पनाहि नसल्यामुळें मिलिंदकुमार स्तंभित झाले।

आजन्म अविवाहित रहाण्याची प्रतिज्ञा करणारी कल्पना इतक्या हळुवार हृदयाची असेल असें त्यांना मुळींच वाटलें नव्हतें.

तर उलट, ती आपल्याला कदाचित् फडाफड उत्तरें देईल अशी भीतिच त्यांना वाटत होती. व मग शक्य तो प्रयत्न करून तिची दिलसफाई व दिलजमाई करावयाचीच असा त्यांचा विचार होता. पण झालें वेगळेंच !

आणि त्यामुळें ते अगदीं गडबडून गेले. काय करावें तेंच त्यांना सुचेना. पण ते मकरंदाचे पट्ट शिष्य बनले होते ना हल्लीं ! त्यामुळें त्यांना लगेच ह्यावर उपाय सुचला.

विवाह व प्रीति ह्या दोन्हीच्या वाटेला जावयाचेंच नाहीं असा मिलिंदकुमारांचा निश्चय असल्याकारणानें ते त्या बाबतींत आजवर उदासीन होते, पण आतां ह्या मार्गानें जावयाचें हें निश्चित होतांच ते प्रीतिशास्त्रांत लगेच निष्णात झाले, आतां काय केलें पाहिजे तें त्यांना चटूदिशीं कळलें.

ते आणखीच पुढें झाले. व त्यांनीं हळूंच कल्पनेचे हात तिच्या चेहऱ्यावरून दूर सारले. आणि—

आणि त्यांनीं तिला क्षणार्धांत हंसरी, लाजरी केली.

व मग हीं दोघें आपल्या मतें अर्ध्याच तासानें पण वस्तुतः पुऱ्या तासाभरानें बाहेर दिवाणखान्यांत आलीं.

मकरंद व मोहिनी तिथेंच चुळबुळत बसलीं होतीं.

मिलिंदकुमारांचा हंसरा, विजयी चेहरा व कल्पनेची सस्मित, सलज्ज चर्या पाहून त्या दोघांनींहि वस्तुस्थिति ओळखली. पण त्या

दोघांपैकीं कुणीतरी हें गुपित उघड करून सांगावें अशा पोरकट इच्छेनें मकरंद मुद्दामच न कळल्याचे सोंग घेऊन बसला.

कल्पना गालांत जीभ घालून तिरक्या नजरेनें दादा वहिनींकडे पहात होती. पण स्त्रीसुलभ विनयाचा पगडा तिच्या वाचेवर बसला असला तरी मिलिंदकुमारांची वाचा अगदीं अनिर्बंध होती.

आपल्या विजयाचा झेंडा अटकेपार लावावयाला ते अगदीं उतावीळ झाले होते. त्यामुळे दिवाणखान्याच्या उंबऱ्याची अटक ओलांडतांच ते मकरंदाला म्हणाले, " मकरंद, पुण्याला अण्णासाहेबांना तार केली पाहिजे रे. "

" तार ? ती कशासाठीं ? " मकरंदानें मुद्दामच विचारलें.

" कशासाठीं म्हणजे ? वैशाखांतल्या पहिल्या मुहूर्तावर कल्पनेबरोबर माझा विवाह होणार आहे त्याला हजर रहाण्याची सूचना त्यांना देण्यासाठीं. "

" अस्सं होय ? वाहवाः, वरराज, आपण तर खूपच उतावीळ झाला आहांत— "

मकरंदानें केलेल्या ह्या चेष्टेवर मोहिनी म्हणाली, " ते तर झालेतच उतावीळ. पण मला वन्संची गंमत वाटते. म्हटलं वन्सं, आजन्म अविवाहित रहाण्याची प्रतिज्ञा होती ना तुमची ? मारे एवढी उंच, उंच भरारी मारलीत तिची काय वाट ? "

ह्यावर कल्पना काय उत्तर देणार ? वहिनीने केलेल्या ह्या मस्करीनें ती लाजली तरी खिजली नाहीं. ही चेष्टा सोज्ज्वळ आहे हें

तिला आतां कळूं शकत होतें. तरीसुद्धां तिला अर्थातूच जरा अवघडल्यासारखें झालें.

तिच्याकडे एकाग्र दृष्टीनें पहात असलेल्या मिलिंदकुमारांच्या लक्षांत हें आलें व ते मोहिनीला म्हणाले, " पण वहिनी, तुम्ही हें विसरतां कीं, हिनें ती भरारी कितीहि उंच मारलेली असली तरी ती कल्पनेची भरारी होती. मग तिला व्यवहारांत अस्तित्व कसं असणार ? "

मिलिंदकुमारांनीं दिलेल्या ह्या श्लेषात्मक, मजेशीर उत्तराची सर्वांनाच गंमत वाटली.

आणि आपल्याविषयीं त्यांनीं दाखविलेली ही आपुलकी कल्पनेला तर इतकी विलोभनीय वाटली कीं, त्याबद्दल प्रेमळ कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या नजरेनें मिलिंदांकडे पाहिल्याशिवाय तिला रहावेना.

व तिच्या मुद्रेवरील हे मधुर भाव पाहून मिलिंदकुमार तर वेडावल्यासारखे होऊन तिच्याकडे पहातच राहिले.

त्यांची ही प्रेमचेष्टा पाहून मकरंदाला व मोहिनीला सानंद कौतुक वाटलें. व मोहिनी हंसत हंसत म्हणाली, " अगबाई, अशी हरघटकीं वन्संची बाजू सांवरावयाला एवढे बडे कायदेपंडीत असे तत्पर असल्यावर आमचा काय बाई पाड लागणार ? "

पण तिच्या ह्या उद्गाराकडे त्या प्रणयीयुग्माचें लक्ष होतें कुठें ?

एकमेकांकडे प्रेमानें पहाण्यांत, एकमेकांचें कौतुक करण्यांत, एकमेकांविषयीं आदर प्रकट करण्यांत तीं दोघें गढलीं होतीं.

व तें पाहून मकरंद हलक्या स्वरांत मोहिनीला म्हणाला,

" मोहिनी, आपल्यावरून जगाची पारख करावी. बघ, दोन वर्षांपूर्वी आपलीहि स्थिति अशीच बाह्य जगाविषयीं निर्विकार झाली होती. आणि आपणा दोघांचेंच जग असावें असेंच आपल्यालाही त्यावेळीं वाटत होतें. आतां ह्या दोघांची तशीच स्थिति आहे. तेव्हां चल, आपण आंत जाऊं या. "

आणि मिलिंदकल्पनेच्या प्रेमसमाधीचा भंग होऊं नये म्हणून मकरंद व मोहिनी अगदीं हलक्या पाऊलांनीं आंत गेलीं.

बाकी त्यांनीं इतकी काळजी घेण्याचें कारणच नव्हतें. कारण हृदयाची खूण हृदयाला पटणाऱ्या ह्या प्रथमक्षणीं मिलिंद–कल्पनेला परस्परांशिवाय इतर व्यक्ति दिसत नव्हती, इतरांचें भाषण ऐकूं येत नव्हतें. फार काय इतरांच्या अस्तित्वाची सुद्धां जाणीव नव्हती !

स म्पू र्ण